

शापित कोझाकीण

टस्तयेवस्की

फ्योदर दस्तयेवस्की

शापित

कोझाकीण

अनुवाद
अशोक प्रभाकर डांगे

कॉन्टिनेन्टल

प्रकाशक :
अनिरुद्ध अनंत कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
विजयानगर. पुणे - ०३०.

मुद्रक :
कुमार प्रिंट्स
१३८, शनिवार पेठ,
पुणे - ४११ ०३०

मुखपृष्ठ :
अनंत सालकर

प्रकाशन क्रमांक : १६१

प्रथमावृत्ती : १९८५
द्वितीयावृत्ती : २००७

किंमत : ६० रुपये

प्रास्ताविक

'कोझाक्या' (Khozakya) ही दस्तयेवस्कीची कादंबरिका (१८४७) त्याच्या सुरुवातीच्या कादंबऱ्यांपैकी एक आहे. त्याची पहिली कादंबरी 'गरीब माणसं' (The Poor Folk) ही फारच गाजली. तिने दस्तयेवस्कीला नाव मिळवून दिले. दुसरी कादंबरी 'दि डबल' मात्र लोकप्रिय होऊ शकली नाही. 'कोझाक्या' ह्या तिसऱ्या कादंबरिकेने मात्र दस्तयेवस्कीच्या साहित्यिक सामर्थ्याचा पुन्हा एकदा प्रत्यय आणून दिला. त्याची पूर्वीची लोकप्रियता त्याला परत मिळवून दिली.

सैबेरियात तुरूंगवास भोगण्यापूर्वीच्या कालखंडात दस्तयेवस्कीने ही कादंबरिका लिहिली. मानवी मनातल्या एकूण गुंतागुंतीचे चित्रण त्याने कोझाक्यात केले आहे. पण प्रखर अध्यात्मिकता आणि सखोल तत्वचिंतन ही दस्तयेवस्कीच्या त्या नंतरच्या मोठ्या कादंबऱ्यातून आढळून येणारी वैशिष्ठये मात्र इथे तितक्या प्रभावाने दिसत नाहीत. कॅथरीन ही एक सुंदर तरुणी, तिचा वयस्क पालक मूरीन आणि आयुष्यात भरकटत चाललेला एक विमनस्क तरुण ओर्दिनोफ ह्यांच्यातल्या संबंधांची ही कथा आहे.

मात्र ही कथा म्हणजे नेहमीचा प्रेमाचा त्रिकोण म्हणता येणार नाही. कॅथरीनवरचे आपले स्वामित्व कायम राखण्याचा मूरीनचा अट्टाहास आणि तिला त्याच्या तावडीतून सोडवण्यासाठी ओर्दिनोफने केलेली निष्फळ धडपड असा हा संघर्ष आहे. ह्या साऱ्या प्रयत्नात ओर्दिनोफ अयशस्वी ठरतो. आणि आयुष्यांत अधिकच विस्कटून जातो. ह्या संघर्षामुळेच कादंबरीतल्या कित्येक प्रसंगात नाट्य निर्माण होते. पण ह्या नाट्यावरही उदास गूढतेचे एक सावट पसरलेले आहे. कादंबरीत ही गूढता मुख्यतः मूरीन--कॅथरीन यांच्यातल्या नात्यामुळे, संबंधामुळे निर्माण होते. हे नाते, त्यांच्यातले संबंध खऱ्या अर्थानं कधीच स्पष्ट होत नाहीत.

कॅथरीन खरोखरीच वेडी आहे की हळव्या मनाची एक संवेदनाशील तरुणी आहे? की मूरीनने स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी वेडेपणाचा शिक्का

तिच्या व्यक्तिमत्वावर मारलाय ? मूरीनने तिला पळवूनच आणलंय की ती स्वतःहून त्याच्या मागे चालत आलीय ? त्या दोघांचे शरीरसंबंध आहेत की तो नुसतीच तिच्या पालनकर्त्याची भूमिका बजावतोय ? कॅथरीनचे पूर्वायुष्याबद्दलचे निवेदन एक सत्य आहे की नुसतंच स्वप्न ? मूरीन एक भला माणूस आहे की दुष्टात्मा ? त्याची धार्मिकताही खरी आहे की खोटी ? मूरीन आणि ओर्दिनोफ बद्दलही कॅथरीनच्या मनात नेमक्या कोणत्या भावना आहेत ? आणि कॅथरीनवर एवढा जीव जडल्यावर, ती वेडी असल्याचं लक्षात येताच, ओर्दिनोफने लगेचच तिथून माघार तरी का घ्यावी ? पण दस्तयेवस्कीच्या कादंबरीत ह्या प्रश्नांची उत्तरे विचार करूनही सापडत नाहीत.

मग, एकीकडे धर्म आणि तत्त्वज्ञान आणि दुसरीकडे मानवी मनातल्या प्रकृती-विकृतींच्या आधाराने आपल्या कादंबऱ्यांचे भव्य इमले उभारणारा दस्तयेवस्की ह्या 'कोझाक्या'मधून नेमके काय सांगू पहात आहे ? ओर्दिनोफच्या जीवनधारणेच्या संदर्भात अगदी सुरुवातीलाच तो मूळच्या सुसंस्कृततेवर मात करणाऱ्या मानवी मनातल्या असंस्कृत नि पाशवी वृत्तींचा उल्लेख करतो. माणसाच्या आत दडून बसलेल्या रानटी प्रवृत्तीच अखेर, त्याच्या सुसंस्कृततेवर मात करतात असेही तो म्हणतो. मग मानवी मनातल्या ह्या रानटी प्रवृत्तींचे आणि त्यांनीच वेळोवेळी कुरघोडी करत, गिळून टाकलेल्या अभिजात सुसंस्कृततेचेच दर्शन तर तो मूरीनच्या व्यक्तिमत्वातून वाचकांना घडवत नाही ? त्याचबरोबर ओर्दिनोफच्या एकुण अभ्यासू वृत्तीचा, ज्ञान लालसेचा दस्तयेवस्की आपल्या कादंबरीत वरचेवर उल्लेख करतो तो कशासाठी ? ओर्दिनोफचे उद्दिष्ट तरी कोणते ? चर्चच्या इतिहासाच्या अभ्यासातून तो कांय साधू पहात असतो ? अर्थात हे सारेच प्रश्न दस्तयेवस्कीच्या ह्या कादंबरीत अनुत्तरीत रहातात. मूरीन-कॅथरीन संबंधांइतकीच ओर्दिनोफच्या बाबतीतली गूढताही ठळकपणे जाणवत राहाते.

वरील सर्व मर्यादा विचारात घेऊनही, दस्तयेवस्कीच्या लिखाणाची बरीचशी बलस्थानं 'कोझाक्या'मध्ये बीजरूपाने आढळतात हेही तितकेच खरे. म्हातारा आणि तरुणी यांचे प्रेमसंबंध, आजारी नि एकाकी नायक, नायकाच्या हातून खून घडण्याची शक्यता, चर्चची पार्श्वभूमी, नायकाचा उमदा पण विचारी मित्र, नायकाचे रात्रीअपरात्री भटकणे, विमनस्क—भ्रमिष्ठ होणे, कुंद-धूसर

वातावरण, अंधारे जिने, उत्कंठा वाढविणारे संवाद ही दस्तयेवस्कीय कादंबरीची वैशिष्ट्ये येथेही दिसतात. रूढ अर्थाने ही काही सुरेख लिहिलेली–गुंफलेली कादंबरी म्हणता येणार नाही. पण ती एका फार मोठ्या साहित्यिकाची सुरवातीच्या काळांतली एक चांगली कलाकृती जरूर म्हणता येईल. तिचा प्रस्तुत अनुवाद सी. जे. होगार्थ यांच्या ‘ दि लॅण्डलेडी ’ (लंडन, एव्हरीमन्स लायब्ररी) या इंग्रजी अनुवादावरून केलेला आहे.

दुर्दैव आहे की, दस्तयेवस्कीच्या श्रेष्ठ कादंबऱ्यांपैकी एखाद-दुसरीच आजपर्यंत मराठीत येऊ शकली आहे. गेल्या शतकात होऊन गेलेल्या नि ह्या शतकावरही विलक्षण प्रभाव पाडणाऱ्या ह्या थोर लेखकाच्या कलाकृतींचा मराठी वाचकांना परिचय करून देण्याच्या अलीकडील प्रयत्नांपैकी एक प्रयत्न म्हणून हा अनुवाद मी वाचकांपुढे ठेवीत आहे. अशा चांगल्या साहित्यकृती मराठीत आणून ह्या थोर लेखकाचा मराठी वाचकांना परिचय करून देणाऱ्या कॉन्टिनेन्टलच्या अनिरुद्ध कुलकर्णी ह्यांस खास करून धन्यवाद द्यावयास हवेत.

प्रस्तुत प्रयत्नाचे रसिक व जाणते वाचक स्वागत करतील अशी आशा आहे.

१६९१ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०
९ फेब्रुवारी* १९८५

अशोक प्रभाकर डांगे

* दस्तयेवस्कीचा मृत्यूदिन : ९ फेब्रुवारी १८८१

: १ :

अखेर ओर्दिनोफला आपली राहती जागा सोडायचा निर्णय घ्यावाच लागला. त्याची सध्याची मालकीण खरेतर एका सनदी नोकराची विधवा. पण त्या बिचारीला देखील, अगदी अनपेक्षितपणे पीटर्सबर्गसारखे शहर सोडायची वेळ आली होती, आणि दूर खेड्यातले आपल्या आई-वडिलांचे जुने-पुराणे घर दुरुस्त करून तिथेच रहावे लागणार होते. जागेच्या मूळ मालकाशी केलेला भाडे करार महिन्याच्या पहिल्या तारखेलाच संपत होता. त्या दिवसापर्यंत देखील ती तिथे थांबू शकत नव्हती. ओर्दिनोफ तर मुळात तिचा पोटभाडेकरूच. काही झाले तरी आधी ठरलेल्या तारखेपर्यंत तरी तिथे रहाता येईल येवढ्याच आशेवर तो दिवस काढत होता. पण आता असे अचानक आपल्या गुहेतून आपली हकालपट्टी होतेयसं पाहिल्यावर मात्र तो अतिशय अस्वस्थ झाला. त्यातही तसा तोही गरीबच. आणि जागांची भाडीही काही कमी नव्हती. शेवटी मालकीण खेड्यात जायच्या अगदी आदल्या दिवशी काहीशा अनिच्छेनेच त्याने डोक्यावर टोपी चढवली आणि तो जागेच्या शोधार्थ पीटर्सबर्गचे गल्ली-बोळ धुंडाळायला एकदाचा बाहेर पडला. दारा-दारांवर लटकावलेल्या 'जागा भाड्याने देणे आहे' च्या पाट्या त्याने अगदी लक्षपूर्वक वाचल्या, अनेक कुटुंबे रहात असलेल्या किंवा अगदी जुन्या मोडकळीस आलेल्या घरांकडेच त्याचे अधिक लक्ष होते. कारण अशा घरांतून रहाणारे लोकच काय ते याच्या इतके गरीब असणार होते. आणि तिथेच त्याला अगदी हवी तशी एखादी जागा अनपेक्षितपणे का होईना सहज मिळू शकली असती.

बराच वेळ तो जागेचाच कसून शोध घेत होता. पण त्याच्या मनात मात्र वेगळे पण विचित्रच विचार घर करायला लागले होते. आधी काहीसे अनवधानाने, मग जरा जाणीवपूर्वक आणि शेवटी तर अगदी कुतूहलाने ओर्दिनोफचे मन सभोवतालच्या वातावरणाची दखल घेत गेले. रस्त्यावरची

रहदारी, एकूण चाललेला गोंगाट-गर्दी, अवती भवतीची धावपळ ह्यातच तो हरवल्यासारखा झाला. पीटर्सबर्गचे हे सर्वसामान्य नागरिक स्वतःचे हक्काचे घर उभारून, जीवनात कधी काळी का होईना सुखा-समाधानाने जगता येईल ह्या आशेवर धडपडत होते. कष्ट करत होते. ह्या कष्टाळू लोकांच्या दृष्टीने रस्त्यावरची गर्दी-गोंगाट अशासारख्या क्षुल्लक गोष्टी देखील हकनाक दमवणूक करणाऱ्या ठरत. त्यांच्या कामात अडथळेही आणत. पण असे वातावरण ओर्दिनोफला अगदी नवीन असल्यामुळे की काय, तो ह्या गडबड-गोंधळाने देखील अगदी उत्साहित होऊन गेला. त्याच्या निस्तेज गालांवर एक तांबूस रंगछटा पसरली. स्वच्छ, मोकळी, थंड-झोंबरी हवा ओर्दिनोफने जणू आधाशीपणे श्वासाबरोबर अगदी आत आत ओढून घेतली. तेव्हा त्याच्या नजरेतही एक नवी आशा चमकून गेली. का कोण जाणे ओर्दिनोफला अगदी हलके-फुलके वाटू लागले.

आतापर्यंतचे ओर्दिनोफचे आयुष्य अगदी शांत होते. आणि एकाकीही. तीन वर्षांपूर्वीचीच गोष्ट. त्याला नुकतीच विद्यापीठातून पदवी मिळाली होती. आणि स्वतःच्याच पायावर उभा राहण्याइतका तो समर्थही झाला होता. असंच एका म्हाताऱ्याच्या घरी त्याला बोलावले गेले. खरे तर त्या म्हाताऱ्याला तो नुसत्या नावानेच ओळखत होता. तो आल्याची वर्दी देण्याची, एक गणवेशधारी नोकर कृपा करेस्तोवर, त्याला खूप वेळ थांबून राहावे लागले. मग एका भव्य पण अंधेऱ्या दिवाणखान्यात त्याला नेण्यात आले. या दिवाणखान्यात फर्निचर असे काहीच नव्हते. या दिवाणखान्यातही नुसती विषण्णताच भरून उरली होती. एखाद्या मोठ्या कुटुंबाच्या वास्तव्याची खूण म्हणून मागे उरते किंवा एकेकाळच्या खानदानी वाड्यात रेंगाळत राहते तशीच विषण्णता होती ही. तिथेच एकेकाळी अनेक सन्मान मिळविलेल्या पण आता केस पिकलेल्या आणि वयानं बुद्धिभ्रंश झालेल्या एका म्हाताऱ्याशी त्याची गाठ पडली. हा वृद्ध ओर्दिनोफच्या दिवंगत वडिलांचा एकेकाळचा मित्र नि सहकारी होता, आणि त्याचा सध्याचा पालकही होता. ओर्दिनोफला वारसा-हक्काने मिळालेल्या मालमत्तेपैकी बरीचशी त्याच्या आजोबांच्याच कर्जापोटी निकालात निघाली होती. आणि त्यातलीच उरली-सुरली रक्कम एकमेव वारस म्हणून, त्या म्हाताऱ्याने आपल्या पाल्याच्या

ओर्दिनोफच्या आज स्वाधीन केली होती. अर्थात त्याला ती रक्कम मात्र अगदीच किरकोळ वाटत होती. ओर्दिनोफने अगदी त्रयस्थपणे त्या रकमेचा स्वीकार केला होता आणि आपल्या त्या पालकाचा पहिला नि अखेरचा निरोप घेऊन तो त्या दिवाणखान्यातून बाहेर पडला होता. शिशिरातल्या त्या संध्याकाळी हवा थंडगार होती. धुकेही दाटून आले होते. एक अबोध औदासीन्य ओर्दिनोफच्या मनाला कुरतडत होते. तसेच तापामुळे त्याचे डोळे जळजळत होते. थंडी वाजून, हुडहुडी भरत अंगात ताप चढतोयसे त्याला वाटत होते. ओर्दिनोफने आपल्याच मनात हिशोब केला. मिळालेल्या पैशावर त्याची दोन फार तर तीन वर्षे निभावली असती. अगदी काटाकाळजीनं पोट बांधून राहाता तर चार वर्षेसुद्धा गुजराण होऊ शकली असती. तेव्हा अंधार वाढत चालला होता. पाऊसही पडायला लागला होता. तशा मनःस्थितीतच त्याने मिळाली ती पहिली खोली घेऊन टाकली आणि पुढल्या तासाभरातच आपले सामानही तिथे हलवले. नंतरची दोन वर्षे मात्र त्याने धर्ममठीतल्या साधका-सारखी बाह्य जगाकडे पाठ फिरवून स्वतःला जवळजवळ कोंडून घेतले. आणि दोन वर्षांच्या आतच सर्वार्थाने एका रानटी माणसाची अवकळा त्याला आली.

होय. न कळत का होईना तो रानटीच बनला होता. वास्तवात त्याच्या अंतरंगात एक निराळेच अस्तित्व होते. हे अस्तित्व क्रोधाने आक्रोश करीत होते. त्याच्यातल्या माणसाला निष्काळजी बनवीत होते. आणि त्याच्या मूळ अस्तित्वालाच, स्वतः मुळीच माघार न घेता, होत्याचे नव्हते करून टाकीत होते. असे वेगळे अस्तित्व ओर्दिनोफच्याच आत कुठेतरी लपून बसले असले तरी त्याच्या वागण्या– बोलण्यातून त्या वेगळ्या व्यक्तित्वाचे पुसटते दर्शनही त्याला स्वतःला होत नसे. अशा व्यक्तित्वाबद्दल त्याने काही ऐकले नव्हते असे नाही. पण त्याने स्वतः ते कधी अनुभवले नव्हते, जाणून घेण्याचा प्रयत्नही केला नव्हता. लहानपणापासूनच तो मानसिकदृष्ट्या एका एकाकी-पणात बुडाला होता. ओर्दिनोफचं हे एकाकीपण काळाच्या ओघात एका अतितीव्र जीवनेच्छेनं गिळून टाकलं. अभेद्य बनलं. त्याची ही जीवनेच्छा म्हणजे त्याची ज्ञानलालसा. एखाद्या सौम्य विषासारखी हीच आकांक्षा त्याच्या जीवनात भिनत गेली. तिनं त्याचं सारं तारुण्यच गंजून टाकलं.

त्याची झोप नाहीशी केली. सुदृढ जीवनाला आवश्यक ती पचनशक्तीही बिघडवून टाकली. मग खुराड्यासारख्या खोलीच्या एकान्तात क्वचित का होईना शिरणारी वाऱ्याची ताजी झुळूकदेखील त्याला अगदी नकोशी वाटू लागली. पण स्वतःच्याच एका विकृत उन्मादांत त्याचं ह्या सगळ्या गोष्टींकडे लक्षच गेलं नाही. त्यात ओर्दिनोफ तरुण होता. आणि त्याच्या गरजाही तशा माफकच होत्या. पण जेव्हा जेव्हा आपल्या बरोबरीच्या जोडीनं एखाद्या स्पर्धेत उतरणं, त्यांच्याबरोबरीनं टिकून राहणं त्याला आवश्यक होतं, त्या त्या वेळी त्याच्या ह्या ग्रंथ-प्रेमानं त्याला अर्भकासारखं अगदी असहाय करून सोडलं. एखाद्या कुशल पण निष्ठावान विज्ञान भक्ताच्या हातात गेल्यावर, खरे तर विज्ञान हे केवढे मोठे साधन असते. पण ओर्दिनोफची विज्ञाननिष्ठा म्हणजे जणू स्वतःवरच चालवलेले शस्त्र होते.

विशेष म्हणजे ओर्दिनोफची विज्ञान निष्ठा ही ज्ञान-संस्कृती मिळवण्याचे तर्कसंगत साधन नव्हते. ती एक केवळ अमूर्त आणि अबोध अशी भक्ती होती. त्याच्या प्रत्येक कृतीमागे, उद्योगामागे, प्रयत्नामागे हेच वैशिष्ट्य सातत्याने दिसून येत असे. अगदी लहानपणापासूनच आपल्या मित्रांशी, कसलेच साधर्म्य नसणे हेही त्याचे एक विचित्र वैशिष्ट्य होते. त्याला आपले आई–बाप तर ठाऊकच नव्हते. विक्षिप्त पण अंतर्मुख स्वभावापायी शाळेतही अनेकदा कठोर वागणूकच त्याच्या वाट्याला आली. परिणामतः असा स्वतःकडे परत फेकला गेल्यामुळे तो कमालीचा लाजाळू, दुर्मुखलेला आणि आत्मकेंद्रीही झाला. जणू तो स्वतःच त्याचं विश्व बनला होता.

सुरुवातीच्या त्याच्या एकाकी धडपडीत कसलीच शिस्त नव्हती. चाकोरीबद्धता नव्हती. त्याची प्रत्येक गोष्टच पहिले उत्साह, पहिले आनंद, कलावंताच्या पहिल्या ऊर्मी अशाच दृष्टीनं पाहिली गेली होती. नंतर मात्र त्याने स्वतःचीच स्वतःला एक शिस्त लावून घेतली. त्याचीही जडणघडण काळाबरोबर पक्की होत गेली. आणि अखेरीस तर त्याच्या मनात काहीशा अस्पष्ट अंधुक, तरीही संपूर्ण समाधानकारक कल्पना आकार घेऊ लागल्या. पुढे तर ह्या अमूर्त कल्पनांनी त्याच्या इच्छेबरहुकूम स्वरूप धारण केले. आपल्या ह्या कल्पनांच्या अस्सलपणाबद्दल, खरेपणाबद्दल, उद्या एकाकीपणे उभे राहायच्या त्यांच्या सामर्थ्याबद्दल तो अंधुकसा का होईना जागरूकही होता. ही

निर्मिती त्याच्या सामर्थ्याशी सुसंगत होती. ती हळूहळू प्रत्यक्षातही येणार होती. ती सतत नवचैतन्य प्राप्त करून घेत होती. पण तिच्या मूर्ततेची वेळ अजून खूपच दूर होती. कदाचित ती त्याच्या आवाक्याबाहेरही असेल !

आज संध्याकाळी मात्र ओर्दिनोफ एखाद्या नवागताप्रमाणे रस्तोरस्ती फिरत होता. आपला नीरव एकान्त सोडून शहराच्या धावपळीत, गर्दी-गोंगाटांत येऊन पोहोचलेल्या संन्याशासारखीच त्याची मनःस्थिती होती. प्रत्येक गोष्टच त्याला नवी-नवखी आणि अपरिचित वाटत होती. भोवतालच्या ह्या खदखदत्या जगापासनं तो इतका दूर गेला होता की, त्याच्या मनात आश्चर्य भावनेलाही स्थान उरले नव्हते. पण आता त्याला आजारल्यासारखे मात्र वाटत नव्हते. उलट त्याचे मन एका बेहोशी नि आनंदानं ओसंडत होते. एखाद्या उपाशीपोटी माणसाला मद्य आणि मांस मिळावे तशीच त्याची ही अवस्था होती. ओर्दिनोफसारखा सेण्ट पीटर्सबर्गचा रहिवासी, चार जागा बदलल्याने एवढा गोंधळून जावा, अस्वस्थ व्हावा हेच मुळांत काहीसं चमत्कारिक नव्हतं काय ? पण वस्तुस्थितीच अशी होती की, यापूर्वी व्यवसायानिमित्त देखील त्याला कुठे बाहेर जायची वेळ आली नव्हती.

आता अधिक उत्साहानं ओर्दिनोफ गल्लोगल्ली फिरत राहिला. दिस-णारी प्रत्येक गोष्टच तो चिकित्सकपणे न्याहाळत होता. त्याच्या मनाला तीच सवय जडली होती. आपल्या नजरेपुढे आपोआप उलगडत जाणारी प्रसंगचित्रं तो कुतूहलाने पाहत होता. शब्दांमधला अर्थ वाचत पुढे सर-कणाऱ्या वाचकासारखीच त्याची ही मनोवस्था होती. नजरेला पडलेली प्रत्येक गोष्टच त्याच्या मनावर ठसा उमटवत होती. आणि त्यातला कुठलाच ठसा नंतर पुसला जात नव्हता. तो एका अभ्यासू दृष्टिकोणातून जाणा-येणाऱ्यांच्या चेहऱ्यांचं विश्लेषण करीत होता. अवतीभोवतीचं प्रत्येक संभाषण कानांनी टिपत होता. रात्रीच्या एकान्तात शांत मनाने केलेल्या चिंतनाचे निष्कर्षच तो जणू ह्या निरीक्षणांतून सिद्ध करू पहात होता. वरचेवर एखादी नवीन पण क्षुल्लक गोष्ट त्याचे लक्ष वेधून घेत होती. त्यातूनच एखादी नवीनच कल्पना त्याच्या मनात स्फुरत होती. त्यामुळेच की काय ओर्दिनोफ आयुष्यांत प्रथमच इतका वैतागला की आपण आपल्या एकाकी कोठडीत स्वतःला गाडून का घेतले नाही, असाच क्षणभर त्याला प्रश्न पडला. इथे

जणू प्रत्येक गोष्टीची दुसरीशी शर्यत लागली होती. त्याच्या नाडीचे ठोकेही अतिउत्साहानं जलद पडत होते. एकान्तवासांत अडकून पडलेली त्याची बुद्धी ह्यां आनंददायी कामामुळे चेतवली गेली होती. तिला पहिल्यासारखीच धार चढली होती. मेंदू अगदी अचूक आणि आत्मविश्वासाने चालेस्तोवर तो ह्याच मनःस्थितीत होता. ह्या अगदी अज्ञात, अनोख्या पण विलक्षण वेगळ्या जीवनात सरळ स्वतःला झोकून देणे त्याला खचितच आवडले असते. आपल्या कलात्मक जाणिवांतूनच आजवर तो हे जग पाहत आला होता. एका अनैच्छिक प्रेमाच्या आणि करुणेच्या झोता-बरोबर त्याचे मन स्पंदन करत होते. तेवढ्यात अगदी अचानकपणे त्याला त्या गर्दीतले काही जण व्यथित तर काही जण हरवल्यासारखे वाटायला लागले आणि हे लक्षात येताच त्याची एकाग्रता हरवून गेली. त्या वास्तवा-बद्दल एका आदर-भावनेनं तो भारला गेला. बाह्य जगातल्या झगमगाटाने दिपून जाणाऱ्या, माणसांच्या एकूण गोंधळाने बधिर होणाऱ्या, भोवतालच्या सततच्या बदलत्या-खदखदत्या जमावाच्या आवाजांनी गोंधळून पावलं दोन पावलं टाकताच घेरी येऊन खाली कोसळणाऱ्या रुग्णासारखी त्याची स्थिती झाली होती.

हळूहळू ओर्दिनोफचे मन, आयुष्याचा एकूण कल पाहाता, घडणाऱ्या घडामोडींबद्दल, तसेच भावी जीवनातल्या यशाच्या एकूण शक्यतेबद्दलच साशंक होत गेले. ह्या जगात नेहमीच आपण एकटे राहिलो. कधी कुणाचे प्रेम आपल्या वाट्याला आले नाही, की कधी प्रेमाची तशी नुसती शक्यताही दृष्टिक्षेपात आली नाही, ह्या विचारानेच त्याला अधिक व्यथित केले. उदाहरणच द्यायचे तर आत्तादेखील त्याने आजू-बाजूने चाललेल्या एक-दोघांशी बोलायचा प्रयत्न केला, तर त्या लोकांनीच त्याला चक्क टाळले. कदाचित त्यांच्या अशा वागण्यालाही काही कारण असू शकेल. ओर्दिनोफला क्षणभराने आठवले की आपण दुसऱ्यावर विश्वास टाकावा, आणि त्यांनीच त्याला झिडकारावे हे तर त्याच्या बाबतीत अगदी नेहमीच घडत गेलेलं होतं. लहानपणीदेखील हट्टी स्वभावामुळे आणि गूढ वागण्याने माणसे त्याला टाळायचीच. थोडक्यात, दुसऱ्यांबद्दल सहानुभूती व्यक्त करायचा योग्य मार्गच आपणाला सापडत नसावा, ह्या वस्तुस्थितीचाच खरं तर त्याच्या मनाला धक्का

बसला. दुसऱ्यांच्या दृष्टीने त्याचे हे सहानुभूती व्यक्त करणे म्हणजे कसलेच नैतिक धरबंद नसलेले, संदिग्ध पण क्लेशदायक प्रयत्न ठरत असत. ह्याच्याही पुढे जाऊन सांगायचं तर समवयस्क मुलांहून आपण निराळे असल्याची जाणीव हेच त्याचे तरुण वयात सतत सलणारे एक शल्य होते. आणि बालपणातलं हे सारं आठवतानाच ओर्दिनोफने ह्यापुढे नेहमी किंवा कदाचित कायमही चारचौघांपासनं दूर राहून स्वतःच्याच 'मनासारखे' वागायचा, स्वतःशीच निर्णय घेतला.

फिरता फिरता, नकळतच, तो शहराबाहेर उपनगरात येऊन पोहोचला. मग एका गलिच्छ हॉटेलात जेवण करून पुन्हा आपल्या भ्रमंतीला बाहेर पडला. आता त्याच्या मागे पिवळ्या-करड्या भिंती रांगेनं उभ्या होत्या. तर नजरेसमोर जुन्या पुराण्या झोपड्या आलिशान बंगल्यांची जागा घेऊ पहात होत्या. त्यातच काही उत्तुंग इमारती कारखान्यांना अगदी खेटून उभ्या होत्या. ह्या इमारतींचा मूळचा लालसर रंग धुरकटला होता आणि त्यांनी आपल्या उरांवर उंचच उंच धुराडी जणू पेलून धरली होती. पण हा परिसरच एकूण ओकाबोका आणि बिनवस्तीचा वाटत होता. तिथली प्रत्येक गोष्टच ओर्दिनोफच्या दृष्टीला उदासवाणी आणि स्नेहशून्य वाटू लागली. एक लांबच लांब गल्ली ओलांडून तो एका चौकात येऊन पोहोचला. त्या चौकातच एक चर्च होते.

आपण काय करतोय हे कळण्याआधीच ओर्दिनोफ त्या पवित्र वास्तूत शिरलादेखील. प्रार्थना नुकतीच संपली होती. त्यामुळे ती इमारतही जवळजवळ रिकामीच झाली होती. दोन म्हाताऱ्या चर्चच्या दारांतच गुडघे टेकून उभ्या होत्या. एक छोटासा पण वृद्ध नोकर मेणबत्त्या विझवण्याच्या कामात गुंतला होता. घुमटाच्या अरुंद खिडक्यांतून कलत खाली उतरणारे सूर्यकिरण प्रकाशाच्या रंगीत लाटा उधळत होते. आणि क्रूसाच्या आकाराच्या त्या चर्चची दुसरी बाजू प्रकाशाच्या समुद्राने उजळून टाकीत होते. कमानीखाली गोळा होत गेलेल्या सावल्या अधिकाधिक गडद होत होत्या. पवित्र मूर्तीवरचा सोनेरी मुलामा, अधून-मधून येणाऱ्या दिव्यांच्या नि मेणबत्त्यांच्या तिरिपीने अधिकच उजळून निघत होता. ओर्दिनोफ दुःखी भावनांचा नि उद्ध्वस्त जाणिवांचा बळी झाला होता. चर्चच्या एका अंधेऱ्या कोपऱ्यांत तो भिंतीला

रेलून बसला आणि स्वतःतच हरवून गेला. तेवढ्यात चर्चच्या इमारतीत तोलून मापून पावले टाकत प्रवेश करणाऱ्या दोन व्यक्तींची चाहूल लागताच तो भानावर आला. ओर्दिनोफने त्यांच्याकडे पाहिले. एक अनामिक उत्सुकता आपल्या मनाचा ताबा घेत असल्याचे त्याला जाणवले. हे नवागत म्हणजे एक म्हातारा आणि त्याच्या बरोबरची एक तरुण मुलगी. तो माणूस जरी ताठ, उंच नि उत्साही वाटला तरी तसा तो थकलेलाच असावा. त्याचा चेहराही निस्तेज होता. तो एखाद्या दूरच्या प्रांतातला व्यापारीही असायची शक्यता होती. त्याने काळ्या फरचा कोट घातला होता. कोटाच्या उघड्या बटणांतून आतले बंद जाकीट डोकावत होते. त्याने गळ्याभोवती लालभडक मफलर गुंडाळला होता आणि फरचीच टोपी त्याच्या डोक्यावर होती. त्याची लांब नि पिंगट दाढी छातीवर रूळत होती. भिवया दाट नि भयावह वाटत होत्या. तर नजरेतून एक विकृत चमक, मगरुरी नि भेदकताही जाणवत होती. ती मुलगी फारतर विशीतली असेल. ती दिसायलाही अत्यंत सुरेख होती. गडद रंगाच्या, चकाकत्या फरचे किमती जाकीट तिच्या अंगात होते. तिने डोक्याला सॅटिनचा रुमाल बांधला होता. आणि त्या रुमालाला हनुवटीखाली एक नाजूक गाठ मारली होती. खाली पहातच ती चालत होती. तिचा चेहरा गंभीर वाटत होता. त्या गांभीर्यामुळेच तिच्या नाजूक चेहऱ्यावरची रेखीव वळणंही उदासवाणी वाटत होती. का कोण जाणे एकूण रंगरूपावरूनच ओर्दिनोफला हे जोडपं विजोड आणि विचित्रही वाटलं.

खुर्च्यांच्या रांगांतून थोडं पुढे आल्यावर तो म्हातारा मध्येच थांबला. त्यावेळी चर्चमध्ये जरी कुणीही नसलं तरी चारी बाजूंना वळत त्याने हातांनी क्रूसाची खूण केली. त्याच्या सहचरीनेही मग त्याचेच अनुकरण केले. मग तो हात धरून तिला चर्चच्या अधिष्ठात्री देवतेच्या मूर्तीकडे घेऊन गेला. ती मूर्ती वेदीच्या अगदी जवळच होती. तिच्या वरचा सोनेरी मुलामा आणि हिऱ्यांचे अलंकार डोळे दिपवीत चमकत होते. चर्चच्या सेवकाने त्या दोघांना वाकून अभिवादन केले. त्याच्या अभिवादनाची त्या म्हाताऱ्याने माफकच दखल घेतली. मग त्या मुलीने मेरीच्या मूर्तीपुढे गुडघे टेकले. मग त्या वृद्धाने चर्चच्याच रुमालाने तिचे डोके झाकून घेतले, तसे तिच्या खोल हुंदक्यांचे आवाज साऱ्या चर्चमध्ये ऐकू यायला लागले.

त्या घटनेतल्या एकूण गांभीर्यानेच ओर्दिनोफ दबकून गेला. तो प्रकार संपायची तो उतावीळपणे वाट पाहू लागला. मग तिने आपले डोके वर केले तसा तिचा सुंदर चेहरा दिव्यांच्या प्रकाशात उजळून निघाला. ओर्दिनोफ जागच्या जागीच थरारला. पावलं-दोन पावलं टाकून तो तिच्या दिशेने निघाला देखील. पण त्या म्हाताऱ्याचा हात हातात घेऊन ती चर्चच्या बाहेर निघाली देखील! उष्ण अश्रूंचे कढ तिच्या गर्द निळ्या डोळ्यांतून पाझरत होते. तिच्या पापण्यांचे दाट केस शुभ्र स्निग्ध त्वचेवर उठून दिसत होते. तिच्या ओठांवर स्मित-हास्य होते. पण भावनावेगाने ती विश्वासाने त्या म्हाताऱ्याच्या बाहूंत विसावली, तेव्हा मात्र तिच्या चेहऱ्यावर एक बाल-सदृश पण गूढ भीती डोकावत होती.

ओर्दिनोफ अत्यंत अस्वस्थ झाला. आवरता न येणाऱ्या अनावर सुख-संवेदनेने भारावून तो त्या जोडप्यामागे निघाला. चर्चच्या आवारातच त्याने त्या दोघांना गाठलेदेखील. तेवढ्यात त्या म्हाताऱ्यानेही त्याच्याकडे वळून पाहिले. त्याच्या भिवया आकसल्या. नजरेतून तिरस्कार डोकवायला लागला. त्या मुलीनेही त्याच्याकडे एक कटाक्ष टाकला. पण तिच्या नजरेत कसलेच कुतूहल दिसत नव्हते. तिचे मन आणखी कशात तरी गुंतले असावे, का कोण जाणे अजूनही ओर्दिनोफ त्या दोघांमागोमाग जात होता. त्याला स्वतःलाच आपल्या ह्या कृतीचे कारण उमगले नव्हते. तो त्यांच्यामागे अगदी थोड्याच अंतरावर असेल. भराभर गोळा होत जाणारा संधिप्रकाशही आता त्याच्या मदतीला आला होता. आवाराच्या जवळच्याच एका लांबचलांब पण गलिच्छ रस्त्याला ते दोघे वळले. आणि कामगारांच्या एका वस्तीत येऊन पोहोचले. हा सगळा परिसरच किराणा मालाच्या दुकानांनी गजबजलेला होता. मग दोन अगदी ओक्याबोक्या भिंतींमधून जाणाऱ्या गल्लीतून ते पुढे आले. आणि एका चारमजली इमारतीच्या उंच भिंतीपर्यंत चालत गेले. ह्या इमारतीचा मुख्य दरवाजा, दुसरीकडून एका रहदारीच्या रस्त्याच्या बाजूने होता. हे तिघेही जण इमारतीच्या अगदी जवळ पोहोचल्यावर अचानक तो म्हातारा मागे वळला. त्याने ओर्दिनोफवर आपली नजर रोखली. ओर्दिनोफही जागच्या जागी थबकला. आपली स्वतःची ही प्रतिक्रियाही ओर्दिनोफला काहीशी विचित्र वाटली. आपल्या गर्भित धमकीचा ओर्दिनोफवर योग्य तो परिणाम झालाय

की नाही ते पाहण्यासाठी जणू म्हाताऱ्याने त्याला पुन्हा एकदा न्याहाळून घेतले. मगच तो त्या तरुणीबरोबर इमारतीच्या आवारात शिरला. तसा ओर्दिनोफही घाईघाईने घराकडे परत निघाला.

परतताना त्याची मनःस्थिती अगदी खराब झाली होती. नसत्या भानगडीत पडून जीवाला फुकटच त्रास करून घेतल्याबद्दल त्याने स्वतःलाच बोल लावला. एक अतिशय सामान्य घटना, पण तिच्यावर साहसाचे सारे रंग चढवून चित्रित करण्याच्या मूर्खपणापायीच हे सारे घडले होते. त्या दिवशी सकाळी सकाळीच आपल्या एकाकी आयुष्याचा त्याला पश्चात्ताप वाटला होता. एरवी त्याचे मन अस्वस्थ करणारी, खोट्या नि बेगडी बाह्य जगाकडे त्याला ओढू पाहणारी प्रत्येक गोष्टच तो कटाक्षाने टाळत असे. पण आता ओर्दिनोफचं खिन्न आणि काहीसं पश्चात्तापदग्ध मन आपल्या एकाकी निवासस्थानाचाच विचार करू लागलं. त्या जागेतही पुढे राहण्याबाबत तो साशंक होता. त्यातून निर्माण झालेल्या समस्याच त्याला भेडसावत होत्या. आणि त्यामुळेच तो अधिक निराश झाला होता. शिवाय अशा फालतू प्रसंगाने आपले हकनाक लक्ष वेधून घेतले ह्याची बोचणीही त्याच्या मनात होतीच.

ओर्दिनोफ निदान त्या क्षणी तरी विलक्षण दमून गेला होता. आपल्या कल्पना स्वतःसमोरच नीट मांडण्याच्याही मनःस्थितीत तो नव्हता. आपण आपल्या घराचेच दार ओलांडून गेलोयत हे जाणवताच तर तो क्षणभर दचकलाच. वैतागून त्याने स्वतःचे डोके गदगदा हलवले. इतका वेळ आपले मन असं तसं भरकटू दिल्याच्या विचारानेच तो अधिक त्रस्त झाला होता. पण दिवसभरातली आपली दमणूकच ह्या प्रकाराला कारण आहे अशा निष्कर्षाला येतच तो जिना चढून पोटमाळ्यावरच्या खोलीत शिरला. त्याने मेणबत्ती लावली आणि मघाच्या त्या तरुणीची मूर्ती त्याच्या नजरेपुढे साकारली. ओर्दिनोफच्या मनातली तिचीही प्रतिमा अगदी सुस्पष्ट होती. एकीकडे भीतीने अस्वस्थ झालेला तिचा चेहरा, दुसरीकडे बालसदृश अश्रूंनी चमकून उठत असे. काहीसा गूढ, तरी गोडवा दर्शविणारा तो चेहरा ओर्दिनोफ विसरू शकत नव्हता. त्या भावमधुर चेहऱ्यावरची रेषन् रेष तो अगदी आत्ताही वाचू शकत होता. क्षणभर का होईना ओर्दिनोफच्या

नजरेत एक वेदना दाटून आली. त्याच्या नसानसांतून आगडोंब उसळला. त्याच्या मनःचक्षूंपुढचे ते गोड स्वप्नही विरत गेले. स्वतःच्याच दोषांमुळे आधी वैतागल्याची नंतर अगतिक अशा संतापाची भावना त्याच्या मनात जागी झाली. कपडे न काढताच तसाच तो कांबळ्यावर पसरला, आणि त्यांने अंगावर रग लपेटून घेतला.

गोंधळलेल्या मनःस्थितीतच ओर्दिनोफ दुसऱ्या दिवशी जागा झाला. सकाळ होऊन गेली होती. त्याने घाईघाईनेच प्रातर्विधी उरकले. मग जराशा सक्तीनेच त्याने दिवसभरातील करावयाच्या एकूण कामांचा तपशीलवार आढावा घेतला. आणि मगच तो बाहेर पडला. काल संध्याकाळी तो निघाला होता त्याच्या नेमक्या विरुद्ध दिशेने आता तो चालला होता. त्याला हे सगळेच प्रकरण एकदाचे निकालात काढायचे होते. म्हणून मग, श्पिस नावाच्या एका गरीब जर्मनाच्या जागेत रहायला जायचा त्याने आपल्या मनाशी निर्णय घेऊन टाकला. श्पिसच्या मुलीचे नाव होते टिंचेन. त्याने 'जागा भाड्याने देणे आहे' अशी पाटीच आपल्या दारावर लावून ठेवली होती. ओर्दिनोफने आगाऊ रक्कम भरल्यावर मात्र श्पिसने ती पाटी काढून टाकली. त्याने ओर्दिनोफच्या एकूण अभ्यासूवृत्तीचेही कौतुक केले. त्याचा तिथला मुक्काम सुखावह होण्यासाठी झटण्याचे त्याने ओर्दिनोफला आश्वासनही दिले. संध्याकाळी परत येऊन जागेचा ताबा घेतो असे सांगून ओर्दिनोफ आपल्या जुन्या जागेकडे परत निघाला. पण रस्त्यातच एक निराळाच विचार त्याच्या मनात आला. तसा तो वेगळ्याच रस्त्याला वळला.

आणि रस्त्यात अचानक ओर्दिनोफच्या अंगात धैर्य संचारले. आपल्याच ऊर्मींचा हा झपाटा पाहून त्याला स्वतःचंच हसू आले. तशा उतावळ्या मनःस्थितीत तो रस्तादेखील त्याला लांब वाटायला लागला. मग एकदाचा तो काल संध्याकाळच्याच चर्चमध्ये येऊन पोहोचला. चर्चमध्ये तेव्हा प्रार्थना चालू होती. प्रार्थना म्हणणाऱ्या सगळ्यांचेच चेहरे दिसतील अशीच जागा निवडून तो बसला. आपल्याला हवाय तो चेहराच त्या समुदायांत नसल्याचे त्याच्या चटकन लक्षात आले. आणखी खूप वेळ तो तसाच बसून राहिला. पण शेवटी काहीसे शरमिंदे होऊन त्याला तिथून बाहेर पडावेच लागले.

आपल्या विचारांचा ओघ बदलण्यासाठी तो दुसरंच काहीतरी मनात आणायला लागला. पण आपल्या आयुष्यातल्या एकूण कटकटी पाहून त्याला अचानक जेवणाची वेळ झाल्याचं जाणवले. खरेतर आतापर्यंत तो चांगलाच भुकेलेला होता. काल संध्याकाळी जेवण घेतलेल्या उपहारगृहात त्याने आजही पुन्हा प्रवेश केला. जेवणानंतर परत एकदा तो पायपिटीला लागला. गजबजलेल्या रस्त्यांतून, गल्ली-बोळांतून, मोकळ्या चौकांतून त्याने ही प्रदीर्घ पण अगम्य पायपीट चालूच ठेवली. अखेर शहराबाहेर उघड्या जागी तो येऊन पोहोचला. इथे सगळीकडे वाळके गवत पसरले होते. नीरव शांतताही होती. ह्या शांततेनं ओर्दिनोफला स्वतःचीच आठवण करून दिली. मग त्याच्या मनात नव्या-जुन्या जाणिवांनी गर्दी केली. खरेतर त्या कितीतरी काळ त्याच्या आत सुप्तावस्थेत दडून होत्या. ऑक्टोबरमध्ये सेण्ट पीटर्सबर्गमध्ये नेहमी असतो, तसाच तो दिवसही कोरडा पण धुकाळलेला होता.

ओर्दिनोफपासून अगदी थोड्याच अंतरावर एक झोपडी होती. झोपडीशेजारी गवताच्या काही गंजीही रचलेल्या होत्या. लोंबत्या नाकाचे एक तट्टू एका गाडीशेजारी खाल्मानेनं रवंथ करण्यात मग्न होते. मोडक्या चाकाशेजारी पहाऱ्यावरचा एक कुत्रा गुरगुरत हाडे चघळत होता. तितक्यात, अंगात नुसताच शर्ट चढवलेले तीनेक वर्षांचे एक लहान मूल झोपडीतून बाहेर आले. आपलं पिंजारलेलं पण पिवळसर डोकं ते अधून मधून खरखरा खाजवत होते. अचानक आत शेतापर्यंत आलेल्या त्या अपरिचिताकडे त्या मुलाने रोखून पाहिले. झोपडीमागे अनेक कुरणं नि बागा पसरल्या होत्या. आकाश निळेभोर दिसत होते. त्या पार्श्वभूमीवर उठून दिसणाऱ्या झाडांच्या काळ्या-सावळ्या आकारांनी क्षितिज झाकले होते. त्याच्या नेमक्या विरुद्ध दिशेला आकाशांत वारे हिममेघांचा एक कळप हाकीत चालले होते. त्या मेघांपुढेच स्थलांतराला निघालेले पक्षी एका ओळीत थव्याने उडत होते. त्या परिसरातली प्रत्येक गोष्टच जणू एका पवित्र गांभीर्याने भारली गेली होती, उदासवाणी नि अस्वस्थ वाटत होती.

ओर्दिनोफ एका लहानशा रस्त्याने चालत निघाला. पण थोड्याच वेळात त्याचे एकाकीपणच त्याला असह्य वाटायला लागले. तसा तो शहराकडे परत फिरला. अचानक भक्तांना प्रार्थनेसाठी बोलावणारा चर्चचा घंटानाद त्याच्या

कानांवर पडला. मग तो काहीसा घाईगर्दीने त्या चर्चकडे निघाला. गेल्या चोवीस तासांत त्याचा त्या वास्तूशी चांगलाच परिचय झाला होता.

ती दारातच इतरांबरोबर गुडघे टेकून प्रार्थना करत होती. चर्चबाहेर भिकाऱ्यांच्या रांगा लागल्या होत्या. लक्तरे पांघरलेल्या स्त्रिया, दीनदुबळ्या माणसांनी तेथे एकच गर्दी केली होती. ओर्दिनोफ त्यांच्या मधूनच आस्ते आस्ते आत शिरला. आणि तिच्या अगदी बाजूलाच गुडघे टेकून प्रार्थना करायला लागला. त्या दोघांचे कपडेदेखील एकमेकांना स्पर्श करीत होते. अर्धोन्मीलित ओठांतून दरवळत बाहेर पडणाऱ्या तिच्या श्वासाची उलाघालही तो तिथून ऐकू शकत होता. पूर्वीप्रमाणेच तिची धार्मिक वृत्तीच फक्त तिच्या चेहऱ्यावर झळकत होती. कुठलेतरी भयंकर पाप धुऊन काढण्यासाठी जणू तिच्या डोळ्यांतून कधी तरी अश्रू ओघळले असावेत. पण जागच्या जागी सुकून गेलेल्या त्या अश्रूंमुळेच आता तिचे गाल चमकत होते. चर्चच्या एका लहानशा खिडकीतून वाऱ्याची झुळूक आत येत होती. वाऱ्याबरोबर थरथरणारी दिव्याची ज्योत तिच्या त्या अनोळखी चेहऱ्यावर अधूनमधून प्रकाश-किरण टाकीत होती. त्या चेहऱ्यावरची रेषन्‌रेष तर ओर्दिनोफच्या मनावर केव्हाच कोरली गेली होती, आणि त्याच्या मनाला एक अनिर्वचनीय वेदना देऊन जात होती. थोड्या वेळाने आपल्या मनावरचा ताण अगदी असह्य झाला तेव्हा तो जागच्या जागी हुंदके देऊ लागला. पण त्यामुळे त्याच्या मनावरचे ओझे तरी काहीसे उतरलं. मग चर्चच्या थंडगार फरशीवर आपले बधिर डोके वाकवून तो प्रार्थना करू लागला. आता मात्र त्याला अगदी मोकळे मोकळे वाटत होते. निदान त्या क्षणी तरी काहीही ऐकण्याच्या मनःस्थितीत ओर्दिनोफ नव्हता. आता दुसरी कोठलीही गोष्ट त्याच्या हृदयाची धडधड कमी करू शकत नव्हती. त्याची सारीच दुःखे त्या सुखसंवेदनांशी एकरूप झाली होती.

आपल्या एकाकीपणानेच तर तो असा अतिसंवेदनाशील तर झाला नव्हता ना? ह्या अतिसंवेदनाशीलतेमुळेच तर त्याच्या जाणिवा असे वरचेवर आघात होण्याइतक्या तरल– झाल्या नसाव्यात ना? का उजेडवाऱ्याशिवाय काळोखात त्याने एकाकीपणे जागून काढलेल्या रात्रींमध्ये या अस्वस्थेचेची बीजे पेरलेली होती? हे अनिर्बंध आवेग, उतावळ्या भावना, हे

सारे त्याच्या हृदयातल्या जखमा भरून येण्यासाठी, ते वाहते होण्यासाठी तर आवश्यक नसावेत ना? एखाद्या विलक्षण उकाड्याच्या दिवशी आकाश अचानक भरून येते. तहानलेल्या भूमीवर पर्जन्यधारा बरसू लागतात. शेतातली तृणपाती पुन्हा टवटवीत होतात. फुलांचे नाजूक मुकुट खाली लवून धरतीला स्पर्श करतात. नंतर ढग विखुरतात. पाऊस नाहीसा होतो. सूर्याच्या पहिल्या किरणांनी साऱ्या अस्तित्वाचेच पुनरुत्थान होते. सारे चराचर नव्या उत्साहाने सूर्याच्या स्वागतासाठी सज्ज होते. आनंदाच्या नि उत्साहाच्या महापुरात निसर्गाचा पुनर्जन्म साजरा करण्यासाठी जणू फुले, पाने, तृणे स्वर्गाकडे पहात माना उंचावतात.

ओर्दिनोफला आपल्याला ह्या मनःस्थितीचे कारणच कळू शकले नाही. तो स्वतःलाच कधी नीटपणे समजून घेऊ शकत नव्हता हेच खरे. तेवढ्यात प्रार्थना संपत आल्याची अंधुकशी जाणीव त्याला झाली आणि प्रत्यक्ष प्रार्थना संपल्यावर दाराकडे निघालेल्या लोकांच्या घोळक्यातून तो त्या मुलीच्या मागे निघाला. गर्दी थांबल्यावर बऱ्याचदा तिच्या शांत पण आश्चर्यमिश्रित नजरेला त्याची नजर भिडली. उसळत्या गर्दीने जागजागी थोपवल्यावर देखील ती आपल्याकडेच वरचेवर वळून पहातेयंस त्याला जाणवले. प्रत्येक क्षणी तिची अस्वस्थता वाढतच होती.

मग तो म्हातारा तिथे आला. त्याने त्या तरुणीचे हात आपल्या हातात घेतले. तसे तिचे गाल पहाटेसारखे आरक्त होऊन गेले. आणि त्याला काल-परवं तिसऱ्यांदा भेदक पण तिरस्करणीय नजरेने आपल्याला न्याहाळणाऱ्या त्या म्हाताऱ्याला सामोरे जावे लागले. म्हाताऱ्याची ती नुसती नजर पाहताच ओर्दिनोफचे मन संतापाने फुलून आले. पण क्षणार्धातच ती अपरिचित मुलगी बाहेरच्या अंधारात त्याच्या नजरेपुढून नाहीशी झाली. ती तशी गेल्याचे लक्षात येताच झटकन त्याने स्वतःला सावरले. आणि अगदी अशक्यप्राय धडपड करत तो वेगाने पुढे निघाला. तो धावत पळतच चर्चबाहेर पडला. बाहेरची मोकळी हवाही त्याला फारशी उत्साहित करू शकली नाही. त्याला श्वासोच्छ्वास करणेदेखील जड वाटायला लागले. त्याची छाती धपापत होती. प्रचंड स्फोट होऊन आपला उर फुटेल आणि श्वास घुसमटून आपण मरून जाऊ असेच क्षण-भर त्याला वाटले. ओर्दिनोफने त्या गूढ जोडप्याचा माग काढण्याचा प्रयत्न

केला. पण व्यर्थ ! रस्त्यावर अगदी गल्लीबोळांतही त्याने शोधून पाहिले. पण त्या दोघांसारखे दिसणारे कोणीच त्याच्या नजरेस पडले नाही. एरवी मूर्खा-सारखी वाटणारी परंतु अशा मोक्याच्या प्रसंगी हमखास कामाला येणारी एक कल्पना झटकन् ओर्दिनोफच्या मेंदूत शिरली.

दुसऱ्या दिवशी अगदी सकाळीच ओर्दिनोफ, तो म्हातारा आणि ती मुलगी राहात असलेल्या जागी गेला. एका अरुंद पण गटारासारख्या घाणेरड्या अंगणात त्याने प्रवेश केला. दारातच एक नोकर काही तरी काम करीत होता. तो तार्तर वंशाचा असावा. त्याने वयाची पंचविशीही ओलांडली असेल नसेल. पण त्याचा चेहरा सुरकुतल्यामुळे अगदी वयस्क वाटत होता. ओर्दिनोफला पहाताच त्याने हातातले काम बाजूला ठेवले. हनुवटी हातांवर टेकवून त्या नवागताचे नखशिखान्त निरीक्षण केले आणि मग ' काय हवंय ? ' म्हणून त्याला विचारले.

' मला रहायला जागा हवीय.'

ओर्दिनोफ मोजक्या शब्दात उत्तरला.

' कसली जागा ? ' नोकराने दात विचकले. ओर्दिनोफच्या मनांतले विचार आपणाला कधीच कळलेयत असाच एकूण भाव त्याच्या चेहऱ्यावर होता.

' म्हणजे भाड्याची जागा हो ! '

ओर्दिनोफ उत्तरला.

' इथे जागा बिगा काही नाही ! ' म्हणत तो नोकर पुन्हा कामाला लागला.

' कदाचित इथले लोक मला एखादी खोली देतीलही, नाही का ? '

बोलता बोलता ओर्दिनोफने एक नाणे त्याच्या हातांत सरकवले. नोकराने एकदाच ओर्दिनोफकडे रोखून पाहिले; ते नाणे खिशांत टाकले आणि तो शांतपणे पुन्हा कामाला लागला. ' नाही. इथे देण्यासारखी जागा वगैरे काही नाही ! '

पण आता ओर्दिनोफला त्या नोकराची पर्वा करायचे काही कारण उरले नव्हते. फळ्या वाकवून केलेल्या कुं...च्या घरावरून तो काळजीपूर्वक पावलं टाकत पुढे गेला. आणि त्या आवारातल्या एकमेव दरवाज्याकडे निघाला.

आत शिरला तर इमारतीच्या त्या भागांत एक चिखलाने भरलेल्या अंगणासारखे पण अंधेरं आवार होते. तळमजल्याला एक शवपेट्या बनविणारा कारागीर राहात होता. त्याच्या वर्कशॉपवरून पुढे गेल्यावर एक मोडकळीस आलेला नागमोडी जिना होता. निसरड्या पायऱ्या चढून तो वरच्या मजल्यावर आला. अंधारातून चाचपडत तो एका अवजड पण ओबडधोबड दरवाज्यासमोर जाऊन पोहोचला. दारावर फाटक्या चटया जाळीसारख्या बसविल्या होत्या. आणखी थोडे शोधल्यावर त्याला कडी सापडली. त्याने दार उघडलंन आणि त्याच्या मनांतली शंका खरी ठरली. तो म्हाताराच अगदी आश्चर्याने त्याच्याकडे पाहात होता.

'काय हवंय आपणाला ?' तो तुटकपणे पुटपुटला. 'तुमच्याकडे रहायला एखादी खोली मिळेल का !' ओर्दिनोफ कुजबुजला. आपण बोलतोय काय ह्याकडे त्याचे मुळीच लक्ष नव्हते. तेवढ्यात त्या म्हाताऱ्याच्या मागे त्याला ती अपरिचिता दिसली. म्हातारा तर दार लावून घ्यायच्याच बेतात होता. तेवढ्यांत त्या तरुण मुलीचा मधुर आवाज ओर्दिनोफच्या कानांवर पडला.

'हो आहे ना. आम्हाला एक खोली भाड्यानं द्यायची आहे !'

ते ऐकल्यावर त्या म्हाताऱ्याने दारावरचा हात काढून घेतला. तसा ओर्दिनोफ घाईने आत शिरला आणि तिला म्हणाला 'मला अगदी लहानशीच खोली हवी आहे.'

आपल्या भावी मालक–मालकिणीचे चेहरे तो प्रथमच इतक्या जवळून पाहत होता. त्याच्या नजरेपुढे एक मूकनाट्य घडत होते, म्हाताऱ्याचा चेहरा तर प्रेतासारखा पांढरा फटक पडला होता. म्हातारा त्या मुलीकडे स्थिर पण भेदक नजरेने पहात होता. तो बेशुद्ध पडायचाच काय तो बाकी होता. ते पाहताच तिचा चेहराही उतरला. पण नंतर ओर्दिनोफला जागा दाखवायला जाताना मात्र तो पुन्हा एकदा उजळून निघाला. तिचे डोळे विचित्रपणे चमकायला लागले.

एका मोठ्या खोलीचेच, पार्टीशन घालून तीन भाग पाडले होते. दारातून आत गेल्यावर एक पॅसेज होता. पॅसेजच्या टोकाचं दार एका झोपण्याच्या खोलीत उघडत होतं. पॅसेजच्या सुरुवातीची खोली फारच लहान होती. तिथे कमी उंचीवर दोन खिडक्या अगदी एकमेकांशेजारी होत्या. नेहमी लागणाऱ्या

किमान गोष्टी ठेवल्यावर तर तिथे वावरायेलाही जागा उरली नसती. तिथले फर्निचरही अगदी मोजकेच होते. एक पांढरे लाकडी टेबल आणि खुर्च्या. फर्निचर थोडेच असले तरी अगदी स्वच्छ होते. कोपऱ्यात फळीवर सोनेरी मुकूट डोक्यावर चढवलेली एक मोठी पवित्र मूर्ती होती. मूर्तीपुढे दिवा जळत होता. ही पुढची खोली आणि मागऱ्या झोपण्याच्या खोली मधोमध एक ऐसपैस कोठीची खोली होती. अगदी कसाही विचार केला तरी तीन माणसांनी रहाण्याच्या दृष्टीने ती जागा काही फारशी सोयीस्कर नव्हती.

ओर्दिनोफची अगदी थोड्या वेळातच तिच्याशी गप्पा मारण्याइतपत प्रगती झाली. त्यांचे हे बोलणेही काहीसे असंबद्धच होते. अर्थात त्यातही समोरच्याला समजून घेण्याचा भागही थोडा फार होताच. तिच्यापासन तो फार तर पावला-दोन पावलांवर असावा. तिच्या हृदयाचे ठोके देखील त्याला मोजता आले असते ! भावनावेगाने म्हणा किंवा कुठल्या तरी भीतीनें म्हणा, ती जागच्या जागी थरकापत होती. अखेरीस ते दोघे जागेबद्दलच्या निर्णयाला आले. आत्ताच्या आत्ता आपण आपलं सामान घेऊन येत असल्याचे ओर्दिनोफने म्हाताऱ्याकडे पाहतच तिला सांगितले. इतका वेळ तो म्हातारा दारात त्यांच्या जवळच उभा होता. त्याची चर्याही पहिल्या इतकीच निस्तेज होती. फक्त काहीसे थंड आणि बरचसं गंभीर स्मित मात्र त्याच्या ओठांवर झळकत होते. ओर्दिनोफ आपल्याकडेच रोखून पहातोयसं लक्षात आल्यावर मात्र म्हाताऱ्याची नजर खाली वळली.

'पण आपणाकडे ओळखपत्र आहे का ?'

पुढचे दार उघडत त्याने ओर्दिनोफला आपल्या भसाड्या पण उद्धट आवाजात प्रश्न केला.

'हो. आहे ना !' तो हरचल्यासारखा उत्तरला.

'आपला परिचय ?'

'वासिली ओर्दिनोफ. मी एक साधा सभ्य माणूस आहे. नेहमी स्वतःच्याच कामात गुंतलेला असतो.'

ओर्दिनोफ त्याच्याइतकाच तुटकपणे उत्तरला.

'ठीक. ठीक. मी इल्या मूरीन. जन्माने मी डच आहे. येवढंच हवं होतं ना ? आता आपण जाऊ शकता !'

तासाभरांतच ओर्दिनोफ तिथे रहायला आला देखील. सकाळीच जागेसाठी आगाऊ रक्कम भरलेल्या जर्मनापेक्षा, श्पिसपेक्षा, ह्या घडामोडींनी तो स्वतःच अधिक आश्चर्यचकित झाला होता. हा भाडेकरू काही टिकायचा नाही अशी श्पिसला नि त्याच्या सुस्वभावी मुलीला-टिंचेनला-सुरुवातीलाच शंका आली होती. घटना कशा घडत गेल्या ते ओर्दिनोफलाच समजले नाही. पण त्यावर विचार करून त्याने स्वतःच्या डोक्याला आणखी त्रासही करून घेतला नाही.

: २ :

थोड्याच वेळात ओर्दिनोफची छाती जोरजोरात धडधडायला लागली. त्यामुळे त्याचे डोळे दुखायला लागले. डोकेही बधिर होऊन गेले. त्याचे सामान तसे मोजकेच होते. अगदी यांत्रिकपणे तो आपले सामान लावायला लागला. सर्वांत आधी त्याने आपल्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंची ट्रंक उघडली. मग पुस्तकांच्या पेटीला हात घातला. त्यातली सगळीच पुस्तकं बाहेर काढली आणि टेबलावर मांडून ठेवली. जरा वेळाने तो ह्या कामालाही कंटाळला. पण काम बाजूला ठेवताच त्या मुलीचीच मूर्ती अंधुकपणे त्याच्या नजरेपुढे उभी राहिली. ह्याच मुलीला नुसतं पाहिल्यावरच तो किती अस्वस्थ झाला होता! त्याचे अंतःकरण भावनांनी किती उचंबळून आले होते! आत्ताही उदास मनःस्थितीत उफाळून आलेला भावनावेगही तितकाच जोरकस होता. ह्या उसळत्या भावनांनी त्याच्या मनात एकच गोंधळ उडवून दिला. ओर्दिनोफ अत्यंत अस्वस्थ झाला आणि उदासही.

तेवढ्यात ओर्दिनोफला काही तरी आठवले. घरमालकाला ओळखपत्र नेऊन दाखवायचे होते त्याला. त्याबरोबरच आपल्या प्रियतमेला त्या

निमित्ताने परत पाहण्याची सुप्त आशाही त्याच्या मनात जागी झाली होतीच. मूरीनने दार किलकिले केले. फटीतून ओर्दिनोफने ओळखपत्र काढून घेत म्हणाला, 'ठीक आहे. पण आता परत मला त्रास द्यायला येऊ नकोस!' मग ते दार परत एकदा बंद झाले. क्षणभर ओर्दिनोफ सुन्न होऊन गेला. त्या म्हाताऱ्याच्या नजरेतून डोकावणाऱ्या तिरस्कार आणि आकसामुळे का कोण जाणे पण त्याच्या भावना मात्र नक्कीच दुखावल्या गेल्या. पण पुढच्याच क्षणी त्याच्या मनातली म्हाताऱ्याबद्दलची ती अप्रीतिही नाहीशी झाली. त्या नंतरचे तिन्ही दिवस ओर्दिनोफच्या आयुष्यात अत्यंत वादळी ठरले. त्याचा आधीचा अनुत्साह पाहाता त्याची ही नवी मनःस्थिती अगदी विचित्र आणि विसंगत होती. ह्या नव्या वादळाला मागे फिरवण्याचे सामर्थ्यही ओर्दिनोफ जवळ नव्हते. खरेतर त्याची तशी इच्छाच नव्हती. ओर्दिनोफच्या मनात एकच गोंधळ माजला होता. त्याचे अवघे आयुष्यच आता जणू दुभंगून गेले होते. आणि मनात फक्त एकच इच्छा उरली होती. थांबणं! फक्त तिच्यासाठी थांबणं! ह्याशिवाय दुसऱ्या कुठल्याच विचाराला त्याच्या मनात आता थारा मिळू शकत नव्हता.

ओर्दिनोफ आपल्या खोलीत परतला. कमरेपर्यंत वाकलेली एक वृद्ध स्त्री जेवण तयार करण्यात गुंतली होती. तिच्या कपड्यांची लक्तरं झाली होती. त्या गलिच्छ म्हातारीकडे नुसतं बघूनच ओर्दिनोफला तिची विलक्षण कीव वाटली. शिवाय म्हातारीची मनःस्थितीही बिघडल्यासारखी वाटत होती. कारण एक तर ती स्वतःशी काहीतरी पुटपुटत होती शिवाय मधूनच तोंडही वेडीवाकडी करत होती. घरात पडेल ते काम करणारी ती मोलकरीण असावी. ओर्दिनोफने तिच्याशी बोलायचा प्रयत्न केला तर ती जाणून बुजूनच गप्पच राहिली. वरवर विचार करता, ती जणू रागलोभांच्या पलीकडे पोहोचली असावी. जेवणाची वेळ झाल्यावरच मग ती शेगडीपुढून उठली. कोबीचे सूप, पावाचे रोल आणि मांसाचा तुकडा तिने मालकाच्या खोलीत नेऊन दिले. आणि मग तेवढेच जेवण तिने ओर्दिनोफलाही आणून दिले. जेवणं होताच फ्लॅटमध्ये परत एकदा शांतता पसरली.

ओर्दिनोफने आता टेबलावरचे एक पुस्तक वाचायला घेतले. अगदी शांतपणे तो ते चाळायला लागला. मग बराच वेळ आपण वाचतोय तरी

काय ते आठवायचा, कळून घ्यायचा त्याने खटाटोप केला. पण ह्या प्रयत्नातही तो पूर्णतः यशस्वी होऊ शकला नाही. मग अगदी उतावीळपणे त्याने ते पुस्तकही बाजूला टाकले. आणि पुन्हा एकदा तो आपले सामान लावायला लागला. अखेर आपली कोटटोपी उचलून तो घराबाहेर पडला. रस्त्यावर असा तसा भरकटत राहिला. एकतर आपली मनःस्थिती सुधारण्याचा त्याचा हा प्रयत्न होता. शिवाय मनात इकडे तिकडे विखुरलेले विचार एकत्र करून त्याला सगळ्याच परिस्थितीचा एकूण आढावा घ्यायचा होता. पण ह्या भटकन्तीमुळे त्याचे दुःख कमी व्हायच्या ऐवजी अधिकच गडद होत गेले. आधी त्याला थंडीने हुडहुडी भरत होती. आणि मग तापाची कसरही वाढत होती. त्यामुळे थोड्या वेळातच त्याची छाती भयंकर धपापायला लागली आणि त्याला वाटेतल्या भिंतीचा आधार घ्यावाच लागला.

'होय. अशानं तर मरून जाईन मी!'

तो स्वतःशीच म्हणाला, 'खरंच मरून जाईन मी!' पण आपले उष्ण नि थरथरते ओठ काय म्हणतायत ह्याचंही त्याला भान नव्हते.

ओर्दिनोफ पुढे पुढे चालत राहिला. शेवटी मुसळधार पाऊस पडतो आणि आपण त्यात चिंब भिजून निघाल्याची त्याला जाणीव झाली. मग मात्र तो घराकडे परत फिरला. ओर्दिनोफ घराच्या जवळ जवळ यायला लागला तसा तसा त्याच्या परिचयाची मालकाच्या त्या नोकराची आकृती त्याच्या दृष्टिक्षेपात येत गेली. तो तातॅर नोकरही अगदी कुतूहलाने आपल्याकडे पहातोय ह्या कल्पनेनंच मग ओर्दिनोफच्या मनाचा ताबा घेतला. पण त्यांची प्रत्यक्ष नजरानजर झाल्यावर मात्र तो नोकर मुद्दाम न पाहिल्याचंच नाटक करतोय हेच ओर्दिनोफला अधिक करून जाणवले. त्या नोकराजवळ जाताच ओर्दिनोफ त्याला म्हणाला,

'गुड ईव्हिनिंग! नाव काय तुझं?'

'मला व्होर्निकच म्हणतात इथे!' नोकर उत्तरला.

'बरेच दिवस कामाला आहेस इथे?'

'हो पुष्कळ दिवस झाले!'

'आणि तुझा शहरी मालक बाहेर देशातला आहे नव्हे?'

'हो त्यांनीच तुम्हांला तसं सांगितलं असेल ना तर ते निश्चितच परकीय

नागरिक आहेत.'

'स्वतः काय करतात ते?'

'अधून मधून आजारीच असतात. ईश्वरासाठी म्हणून जगतात. त्याचीच नेहमी उपासना करीत असतात.'

'आणि ती बाई—बायको आहे ती त्यांची?'

'कोणती बाई?'

'तीच त्यांच्याबरोबर रहाते ती—'

'त्यांनीच आपणाला तसं सांगितलं असेल ना, तर निश्चितच ती त्यांची पत्नी आहे. 'बरंय गुड नाईट!'

टोपीला हात लावत त्याने ओर्दिनोफला सलाम ठोकला आणि तो आपल्या घरात गेला.

ओर्दिनोफही जिना चढून वर आला. दार उघडतानाही म्हाताऱ्या मोलकरणीची बडबड चालूच होती. काहीसं चरफडतच मग तिने बोल्टही लावून घेतला. आणि आपल्या नेहमीच्या पोटमाळ्याकडे ती निघून गेली. रात्र झाली. ओर्दिनोफला दिवा तर शोधायलाच हवा होता. मालकांचे दार लावलेले होते. आता पुन्हा त्या म्हातारीला बोलावण्याखेरीज गत्यंतर नव्हते. ती आली आणि कमरेवर हात ठेवून त्याच्याकडे रोखून पहातच राहिली. त्याला मालकांच्या दारात उभा पाहताच ती अस्वस्थ झाली असावी. निदान ओर्दिनोफला तरी तसेच वाटले. तिने एक काड्यापेटी त्याच्या अंगावर भिरकावली. ओर्दिनोफ परत खोलीत आला. आणि पुन्हा म्हणजे, जवळ जवळ शंभराव्यांदा असेल त्याने आपलं सामान आणि पुस्तकं लावायला घेतली. निंदान तो त्या खटपटीला लागला. पण थोड्याच वेळात कुणीतरी जणू त्याला बाकावर पडून रहायला भागच पाडले. मग खूप वेळ तो ग्लानी-तच पडून होता. मधूनच तो भानावर यायचा. आपली ही झोप खरीखुरी नसून केवळ आजारपणातली ग्लानी आहे हेही त्याच्या ध्यानात यायचं. जरा वेळानं कुणीतरी दार उघडलं. दाराचा तो आवाज ऐकताच बहुधा मालक मंडळी संध्याकाळच्या प्रार्थनेहून परतली असावीत असा त्याने तर्क बांधला. त्यांनाच काही विनंती करायला म्हणून तो उठला. क्षणभर आपण व्यवस्थित चालतोय असाच त्याला भास झाला. पण प्रत्यक्षात मात्र त्याचे पाऊल चुकले.

म्हातारीने त्याच्या खोलीत लाकडांची भारी आणून टाकली होती. आता त्या भारीलाच अडखळून तो खाली कोसळला. आणि तिथेच मूर्च्छित होऊन पडून होता.

आणखी बराच वेळाने ओर्दिनोफ शुद्धीवर आला. तेव्हा आपण कपडे घालूनच बाकावर झोपून असल्याचे त्याला जाणवले. शिवाय एक स्त्री अगदी चिन्ताक्रान्त चेहऱ्याने आपल्याकडेच बघतेयसं जाणवल्यावर तर त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. तिचा सुंदर चेहरा करुणेनं व्याकुळला होता. ममतेच्या आसवांनी तो ओलाचिंब झाला होता. थोड्याच वेळात कुणीतरी ओर्दिनोफच्या डोक्याखाली उशी सरकवली. मग अंगावर उबदार पांघरुण घातल्याचेही त्याला जाणवले. एक नाजूक तळवा आपल्या तापलेल्या कपाळावर हळूवार फिरतानाही त्याने पाहिला. 'धन्यवाद' म्हणत तो हात हातांत घ्यायलाही त्याला आवडले असते. इतकंच नव्हे तर तो तळहात उचलून आपल्या शुष्क ओठांवरही टेकवला असता आणि अश्रूंनी भिजवला देखील असता त्यानं. तो हात तसाच कवटाळायला, अगदी अनंत काळपर्यंत छातीशी घट्ट धरून ठेवायलाही तयार होता तो. आणखी पुष्कळ गोष्टी बोलायच्या होत्या त्याला तिच्याजवळ. मनात उत्सुकता असली तरी बोलायचे कसे हाच मुळात प्रश्न होता. विशेष म्हणजे आनंदाच्या त्या अत्युच्च क्षणी अगदी मरायला देखील तयार होता तो. पण आता त्याचे हातच मुळी शिशासारखे जड झाले होते. तशा त्या अगतिक अवस्थेत तो इकडचा तिकडे हलूही शकत नव्हता. पण त्याच्या नसांतून बेभानपणे वहाणाऱ्या रक्ताची धडधडच एवढी भीषण होती की तिनं आपल्याला अंथरुणावर उचलून धरलंय की काय अशीच त्याच्या मनात शंका आली. त्याचबरोबर कुणाच्या तरी अश्रूंनी आपली कानशिलं भिजली जात असल्याचीही त्याला जाणीव झाली. थोड्याच वेळात ओर्दिनोफ पुन्हा एकदा बेशुद्ध झाला.

सकाळी आठला ओर्दिनोफ उठला. जाड गजांसारखे सूर्यकिरण फरशीवर उतरले होते. रात्रीच्या विश्रांतीमुळे त्यांचे मन आता शांत झाले होते. त्याला अगदी प्रसन्न वाटत होते. अशा उल्हसित अवस्थेत तो आपल्या हातांच्या वेदनाही पार विसरला होता. त्याच्या शरीराला आरामही वाटत होता. तेवढ्यात कोणी तरी आपल्या बाजूने हळूहळू जाताना त्याने पाहिले.

उठून कोण आहे ते पहायचा त्याने प्रयत्न केला. अंथरुणावरून उठून आपल्या मैत्रिणीला मिठीत घेऊन 'प्रिये, मी तुझं भलं चिंतितो,' म्हणून शुभेच्छा द्यायला खरे तर तो उत्सुक होता.

'किती वेळ झोपला आहेस रे तू!' एका स्त्रीचा नाजूक आवाज ओर्दिनोफच्या कानावर आला.

ओर्दिनोफने आवाजाच्या रोखाने मान वळवली. आणि आपल्याकडेच वाकून पहाणारा मालकिणीचा सुंदर चेहरा त्याच्यान जरेपुढे साकारला. चेहऱ्यावर एक स्मितहास्य झळकत होते. ते स्मितही सूर्यप्रकाशासारखंच स्वच्छ होतं.

'आणि आजारी तरी किती दिवस पडलायस तू!' ती पुढे म्हणाली, 'आता ते सारं संपलंय. पण आता मात्र तू उठायलाच हवं. तू तरी का म्हणून तुरुंगातल्या कैद्यासारखं एका जागी जखडून रहावंस. स्वातंत्र्य हे भाकरीहून चांगलं असतं नि सूर्याहून सुंदर असतं बरं! माझ्या लाडक्या बाळा, चल आता जरा उठायचा प्रयत्न कर पाहू!'

ओर्दिनोफने तिचा हात हातात घेतला आणि हलकेच दाबला. आपण जणू एक स्वप्नच पहातोय ह्याच कल्पनेत तो होता.

'जरा थांब!' ती पुढे म्हणाली, 'मी तुझ्यासाठी चहा करते. चालेल ना? थोडा चहा घेच. नक्की बरं वाटेल तुला. मीही आजारीच आहे ना म्हणून तर मला चांगलं ठाउक आहे. चहानं नक्की बरं वाटेल तुला!'

'खरंय. कृपा करून मला काही तरी प्यायला आणून दे' उठून बसता बसता अगदी क्षीण आवाजात ओर्दिनोफने तिला होकार दिला. ओर्दिनोफला भयंकर अशक्तपणा जाणवत होता. त्याच्या पाठीतून कळाही येत होत्या. हात तर अगदी हाडं मोडल्यासारखे दुखत होते. त्याच्या मनावरचा ताण मात्र उतरला होता. त्याला अगदी हलके-फुलके वाटत होते. उबदार उन्ह त्याच्या अंगावर पसरले होते. अशक्तपणा आणि चकरा यामुळे त्याचे डोके सुन्न झाले असले तरी एका नव्या अपरिचित पण भव्य जीवनाचे दरवाजे त्याच्यासाठी उघडले गेले होते.

'तुझे नाव वासिलीच ना?' तिने विचारले.

'कालचं मालकांबरोबरचं तुझं बोलणं थोडफार कानावर आलं म्हणून-,

‘ हो वासिलीच म्हणतात मला. पण तुझं नाव? ’

त्याला तिच्या खूप जवळ जायचे होते. पण उभं रहायचा प्रयत्न करताच तो जागच्या जागी लडखडला. हळूच हसत तिने त्याला हात देऊन सावरले.

मग आपल्या नितळ निळ्याभोर नजरेनं त्याच्याकडे एकटक पहात ती उत्तरली ‘ मी कॅथरीन ! ’ मग क्षणभर ती दोघं हातांत हात गुंफून निःशब्द उभी होती.

जराशाने तिनेच त्याला विचारले,

‘ मला काही विचारणार होतास तू ? ’

‘ हो. विचारायचंय. पण काय विचारायचंय तेच ठाऊक नाही. ’ ओर्दिनोफ काहीसा लाजत म्हणाला.

‘ हो. हो. पण इतका अस्वस्थ होऊ नकोस बुवा. जरा बैस ह्या टेबलाजवळ. निदान स्वच्छ सूर्यप्रकाश तरी जरा तुझ्या अंगावर पडेल. हं. हं. बैस तिथेच. असा माझ्या मागे मागे येऊ नकोस ! ’ तो आपला हात धरून ठेवायला पहातोय हेही तिच्या लक्षांत आले होते ! ‘ हे बघ मी थोड्या वेळाने परत येत्येय, तेव्हाच माझ्याकडे पोटभर काय ते पाहून घे बरं ! ’

ती चहा घेऊनच परत आली, चहा टेबलावर ठेवत त्याच्या समोरच बसली. ‘ चहा घेतोयस ना ? ’ ती त्याला म्हणाली. ‘ पण काय रे, तू नेहमीच असा आजारी असतोस ? ’

‘ नाही. नाही. आजारी पडायची ही पहिलीच वेळ...पण मी खरंच आजारी होतो का गं ? मला नाहीं काही कळलं. पण आता काही झालं तरी यापुढे मी काही आजारी पडायचो नाही ! हे झालं एवढं दुखणं पुष्कळ झालं. पण मला असं झालंय तरी काय ? छे. माझंच मला कळेनासं झालंय ! ’ कॅथरीनचा हात हातांत घेताना त्याचा गळा दाटून आला. ‘ पण तू मात्र मला सोडून जाऊ नकोस, कॅथरीन ! तुझा हा हात माझ्या हातांत राहू दे !...खरं तर तुझ्या सौंदर्यानेच मी दिपून जातो. तू मला सूर्यासारखी सतेज सुंदर वाटायला लागतेस बघ ! ’ त्याचे शेवटचे शब्द अंतःकरण पिळवटूनच बाहेर पडले होते. हुदक्यांनी त्याची छाती भरून आली होती.

‘ गरीब बिचारा पोर ! आजपर्यंत कदाचित तू निष्ठूर लोकांच्यातच वावरला असशील ! पण काय रे ह्या जगात तू अगदी एकटाच आहेस ? तुला

जवळचा असा कोणी नातलग नाही का ? '

' नाही, ह्या जगात माझं असं कुणी नाही ! मी अगदी एकटा आहे... पण त्याने असा काय फरक पडणार आहे ? माझी तब्येतही आता छान सुधारलीय. सारं काही ठीक होईल. ' त्याची जणू तंद्री लागली होती. तो स्वतःशीच बोलत होता. खरं तर ती खोलीच त्याच्या नजरेपुढे गोल गोल फिरत होती. ' माझंसुद्धा आयुष्य अगदी एकाकीच गेलं ! ' ती क्षणभर थांबून म्हणाली. पण माझ्याकडे असा टक लावून का पहातोयस तू ? असं झालंय तरी काय तुला ? कुणाला वाटेल माझ्या नजरेमुळे तुझ्या अंगाचा दाहच होतोय जणू. एखादा माणूस प्रेमात केव्हा पडतो ठाऊक आहे तुला ? तो प्रेमात पडतो तेव्हा... अरे, पण हे भलतंच काय सांगत बसलोय मी तुला ! मी तुला पहिल्यांदा पाहिलं ना तेव्हाच माझ्या मनातला एक उबदार कोपरा मी तुला खास बहाल करून टाकला. आता तर तू आजारीच आहेस. अगदी माझ्या जीवाची घ्यावी तशीच मी तुझीही काळजी घेईन... पण आता पुन्हा आजारी म्हणून पडायचं नाही ! मुळीच नाही. तू पुन्हा चांगला बरा होशील तेव्हा आपलं नातं भावाबहिणीसारखं असेल. हरकत नाही ना ? एखाद्याला मुळात परमेश्वरानं बहीणच दिली नसेल तर ती नव्यानं शोधून काढणं केवढं मुश्कील काम आहे नाही ? '

' तू आहेस तरी कोण ? कुठून आलीयस ? ' ओर्दिनोफने तोंडातल्या तोंडात विचारले.

' खूप लांबच्या प्रदेशांतली आहे मी !... पण तू असलं भलतं सलतं काय विचारत बसलायस ?...ती बारा भावांची गोष्ट कधी ऐकलीयस तू ? कोणे एकेकाळी एका घनदाट अरण्यात बारा भाऊ रहात होते. एकदा ते बाहेर गेले असताना, एक सुंदर मुलगी वाट चुकून त्यांच्या घरात येऊन पोहोचली. तिनं त्यांचं घर अगदी व्यवस्थित आवरून ठेवलं. तिचा व्यवस्थितपणा मग तिथल्या प्रत्येक गोष्टीतूनच जाणवायला लागला. घरी परत आल्यावर त्या भावांना लगेच जाणवलं की कुणीतरी स्त्री तिथे आलीय. त्यांनी तिला बोलावलं. आणि ती त्यांच्या पुढे उपस्थित झाली त्यांतल्या प्रत्येकाने तिला आपली बहीण मानलं. आणि त्या सर्वांशीच सारख्याच प्रेमानं वागायची तिला मुभा मिळाली. ती एकाच वेळी त्यांची बहीण होती आणि तितकीच

त्यांच्या बरोबरीनंही वागू शकत होती...ऐकलीयस कधी ही गोष्ट तू ?

'हो. ऐकलीय.' ओर्दिनोफ उत्तरला.

'पण माणसानं आयुष्य अगदी भरभरून जगायचं असतं. तू उपभोग घेतोस की नाही आयुष्याचा ?'

'हो. हो.' ओर्दिनोफ ओरडलाच. 'खूप खूप जगायचंय मला. आयुष्याचा उपभोग घ्यायचाय. खूप काळ अगदी शंभर वर्षे देखील जगायला आवडेल मला !'

'मी मात्र ह्या गोष्टीबद्दल अजून तेवढी निश्चित नाहीयेय ! ती खिन्न होत म्हणाली पण वाटतं त्यापेक्षा मी लौकर मरून गेलेलं बरं ! पण जीवनावर नि भल्या माणसांवर प्रेम करायचा जीवनात प्रत्येकालाच हक्क आहे...अरे, पण हे काय ? जरा आपलाच चेहरा तरी बघ ! एवढा पांढराफटक का पडलाय तो ?'

'माझं डोकं गरगरतंय !'

'जरा थांब. मी तुझ्याकरता एक सतरंजी नि उशी आणते. इथेच तुझं अंथरुण घालून देते. तू त्यावर गाढ झोपून जायचंस. आणि मला... मला फक्त स्वप्नामध्ये पहायचंस ! अरे, आजारपण काय आत्ता पळून जाईल !... आमचा म्हातारा नोकर– तोही आजारी आहे बघ !'

ती बोलता बोलता अंथरूण घालत होती आणि त्याच्याकडे पाहून अधून-मधून स्मितहास्यही करत होती.

'केवढी पुस्तकं ही तुझी !' पुस्तकांची पेटी उचलून बघत ती ओर्दिनोफला म्हणाली. मग हात धरून तिने त्याला अंथरुणाकडे नेलं. त्याला झोपवून अंगावर ब्लँकेट पांघरले.

असं म्हणतात की, पुस्तकं काही माणसांच्या भल्यासाठी असत नाहीत !' समजूतदारपणे मान डोलवत ती म्हणाली, 'तुला पुस्तकं आवडतात ?'

'हो !' तो ताडकन् उत्तरला, खरे तर आपण झोपेत आहोत की जागे, हेही त्याला नीटसं ठाऊक नव्हतं. पण कॅथरीनचा हात दाबताच आपण चांगले जागे असल्याची त्याची क्षणार्धात खात्री पटली.

'माझ्या पालकांकडेही पुष्कळ पुस्तकं आहेत. तुला पहायचीयत ? ती सगळीच पुस्तकं धार्मिक आहेत म्हणतो तो. आणि नेहमी त्यातला काही ना काही मजकूर मला वाचूनही दाखवत असतो. कधी तरी मी तुला ती पुस्तकं

दाखवीन. मग तो नेमकं काय वाचतो ते तू मला सांगायचंस.'

'कॅथरीन, कृपा करून अशीच माझ्याशी जरा बोलत रहा!' ओर्दिनोफ पुटपुटला. त्याची नजर जाणतेपणीच तिच्यावर स्थिरावली होती.

'तुला प्रार्थना म्हणायला आवडतं?'

क्षणभर थांबूनच तिने विचारले. 'पण आत्ता मी आतून किती घाबरलेय हे ठाऊक आहे तुला? मला भीती वाटत्येय की—'

तिने आपले वाक्यही धड पुरे केले नाही. मध्येच कुठे तरी जणू ती गुंगून गेली. ओर्दिनोफने मात्र तिचा तळहात उचलून आपल्या ओठांवर टेकवला.

'माझ्या हाताचे चुंबन का म्हणून घेतलेस तू?' ती लाजत लाजतच त्याला म्हणाली.

'असू देत. असू देत. अरे चुंबनच घ्यायचंय तुला तर निदान दोन्ही हातांचं तरी घे!' आणि तिने आपले दोन्ही हात त्याच्या पुढे धरले. मग त्यातल्याच एक हाताचा तळवा तिने त्याच्या तापलेल्या कपाळावर टेकला आणि त्याचे केस ती हळूवारपणे कुरवाळत राहिली. तिचा गोरापान चेहरा क्षणोक्षणी अधिकाधिक आरक्त होत गेला. जरा वेळाने ती जमिनीवर त्याच्या अगदी जवळ बसली. तिचे गाल त्याच्या गालांना घासत होते. तिचा उष्ण, ओला श्वासोच्छ्वास त्याचा चेहरा कुरवाळत होता. तिचे वितळलेल्या शिशासारखे कढत कढत अश्रू आपल्या गालावर टपकत असल्याचे ओर्दिनोफला जाणवले. त्याचबरोबर तो अधिकाधिक अशक्त होत होता. आपले हातही आपण हलवू शकत नसल्याचेही त्याला उमगत होते. तेवढ्यात अचानक पुढचे दार वाजले. कडी काढल्याचा आवाज आला. आणि पार्टीशन पलीकडे वावरणाऱ्या म्हाताऱ्याच्या अस्तित्वाची ओर्दिनोफला प्रथमच जाणीव झाली.

जराही न गोंधळता कॅथरीन शांतपणे उठली. तिने त्याच्या अंथरुणावर हातांनी क्रूसाची खूण केली. आणि ओर्दिनोफने डोळे मिटून घेतले. मग त्याच्या ओठांना एक प्रदीर्घ चुंबन अनुभवायला मिळाले. आपल्या हृदयात कुणी जणू खोलवर चाकू खुपसल्याचा त्याला भास झाला. ओर्दिनोफने एक निःश्वास टाकला. आणि तो मूर्च्छित झाला.

त्या क्षणापासून ओर्दिनोफच्या दृष्टीने एका नव्या जीवनाला सुरुवात झाली. त्या जीवनातही ओर्दिनोफ कधी कधी फार गोंधळून जात असे. एक अटळ असं स्वप्न जगण्याची जणू आपणाला शिक्षाच दिली गेली आहे असेही त्याला वाटत असे. आणि ते विलक्षण स्वप्न म्हणजे त्याच्या जीवाची निरर्थक धडपड असे. आणि तशा त्या भ्यालेल्या मनःस्थितीतही तो आपल्या दुर्दैवाशी चार हात करण्यासाठी धडपडत असे, पण अशाच मुकाबल्याच्या ऐन मोक्याच्या क्षणी कोणत्या तरी अज्ञात शक्तीकडून तो पराभूत होत असे. आणि पुन्हा एकदा त्याची शुद्ध हरपत असे. आणि मग त्यातच त्याच्या नजरेपुढे अनंत अंधाराने भरलेले एक अगाध विवर आकारत असे. पृथ्वीच्या पोटातल्या ह्या अथांग विवरापलीकडे कशाचेच अस्तित्व नसे. आणि ह्या भयंकर विवरात आपल्या यातना, निराशांसह ओर्दिनोफ स्वतःला झोकून देत असे.

दुसऱ्याच क्षणी ओर्दिनोफला अतीव सुखाचे क्षणही अनुभवायला मिळत. आनंदाने उतू जाणारे, अलौकिकाने भारलेले हे क्षण ओर्दिनोफच्या जणू अनुभवांपलीकडचे असत. अशा वेळी त्याच्या अवघ्या शरीरावर आनंदाचे रोमांच उभे रहात. त्याच्या मागचा भूतकाळ उजळून निघत असे. आणि त्याला आनंद व यश देण्याखेरीज भविष्यकाळालाही पर्याय उरत नसे. कधी न अनुभवलेल्या, न ऐकलेल्या अत्यानंदाच्या जाणिवेनंच तो अशा स्वप्नांतून जागा होत असे.

असे क्षण खरोखर कुणाला ठाऊक नसतात? अशा क्षणी एक अनिर्वचनीय आशा दंवबिंदूच्या वर्षावाने आत्म्यालाच जणू स्नान घातले जाते. उल्हसित करते. अशाच सुखाच्या नुसत्या जाणिवेनेच एखाद्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागतात. शरीर तीव्रतम वेदनांचं भक्ष्य बनले असले तरी आपल्या जीवनाची वीण विरत जात असल्याचेही माणसाला जाणवते आपल्या ह्या पुनर्जन्माने, आत्म्याच्या पुनरुत्थानाने प्रत्येकजणच आनंदाने बेहोष होऊन जातो.

मग पुन्हा एकदा ओर्दिनोफची तंद्री लागत असे. अशा तंद्रीतच ओर्दिनोफ आपल्या आयुष्यातले अलीकडचे काही प्रसंग पुन्हा पाहत होता, मनाने ते जगतही होता. ह्या घटनांच्या पुनरावृत्तीबरोबरच असंख्य विचित्र

पण अगदी अगम्य कल्पनाही त्याच्या मनात गर्दी करत होत्या. त्यामुळे तरुण पण आजारी ओर्दिनोफचा अधून मधून स्मृतिभ्रंशही होत होता. आणि मग आपण आता आपल्या जुन्या मालकिणीच्या घरात कसे नाही ह्याचेच त्याला आश्चर्य वाटायचे. तिन्हीसांजेला घरमालकीण आपल्या खोलीत का येत नाही, आपले गारठलेले, हाडकुळे हात शेगडीवर धरून चोळून चोळून त्यात उब आणताना कशी काय दिसत नाही? हे करताना ती एकसुरात अखंडपणे स्वतःशीच का पुटपुटत नाही? अभ्यासाच्या अतिलालसेपायी काहीसा वेडा पीर भासणाऱ्या आपल्या भाडेकरूकडे, ओर्दिनोफकडे ती अधून मधून आश्चर्याने का पहात नाही? आणि खोलीचा तो अंधारा कोपरा शेगडीच्या उजेडाने का उजळून निघत नाही ह्याचेही ओर्दिनोफला आश्चर्य वाटत राही. पण दुसऱ्याच क्षणी आपण खरोखरच आपली रहायची जागा बदललीय हे त्याच्या लक्षात यायचं. पण तो एकसारख्या जागा का बदलत रहातो? त्याचेच त्याला कळेनासं होई. जणू त्याच्या अवघ्या अस्तित्वाची त्याच्या व्यक्तिमत्त्वापासनंच फारकत होत होती. आणि त्याचे हे अस्तित्वदेखील सतत, विरोध करता येणार नाही अशा तणावाखाली, जगत होते. त्याला कोणीतरी साद तर घालत नव्हते? पण त्याला साद घालणार तरी कोण?

ओर्दिनोफच्या नसानसांतून जणू वणवा पेटला होता. ही आग त्याच्याच रक्ताचा नायनाट करत चालली होती. त्याला साऱ्याचाच विसर पडला होता. तो विचारही करू शकत नव्हता. मधूनच एक सावली त्याच्या अंथरुणाभोवती घिरट्या घालायची. आणि तोही ती सावली पकडू पहायचा. अंथरुणाच्या आसपासच चाललेली नाजूक पावलांची हालचाल त्याच्या कानांपर्यंत पोहोचत होती. आणि धीर देणारी, नाजूक आवाजातली कुजबूजही त्याला ऐकू येत होती. हे नाजूक शब्द तर त्याच्या कानांना संगीताप्रमाणे सुश्राव्य वाटत होते. एक थरथरता ओला श्वास त्याच्या चेहऱ्यावर फिरत होता. त्या पाठोपाठ काही कढत अश्रू त्याच्या गालांवर टपकत होते. आणि एका प्रदीर्घ चुंबनाची अगदी हवी हवीशी वाटणारी अवीट गोडी त्याच्या ओठांवर रेंगाळत होती. अशा वेळी तर आपले प्राणच जणू शरीरातून निघून गेल्यासारखे ओर्दिनोफला वाटायचे. भोवतालचे सारे जगच जागच्या जागी थबकून राहायचे. ते जग शतकाशतकांपूर्वीच मृत होऊन गेल्याचे नि गेली हजारो वर्षे ते

जणू रात्रीच्या कफनाखाली पडून असल्याचाच ओर्दिनोफला भास व्हायचा.

पण पुढच्या क्षणी मात्र ओर्दिनोफच्या मनात त्याच्या बालपणातल्या आठवणी जाग्या व्हायच्या. तो विनत्रासाचा काळ, त्यातली नीरव सुखे, न संपणारा आनंद तो परत एकदा अनुभवायचा. आपल्या बालजीवनातल्या पहिल्या-वहिल्या सुखद स्मृती ओर्दिनोफच्या अंतःकरणात पुनःपुन्हा जाग्या होत. बाभळीच्या कुंपणांनी वेढलेली बंगलीसारखी सुंदर सुंदर घरे. ह्या घरांपुढे पसरलेल्या सुरेख मनमोहक हिरवळी. हिरवळीतून डोकावणारी नाजूक सुंदर फुले. आणि ती फुले तोडताना त्यातून उडत बाहेर पडणारे सुंदर सुंदर पऱ्यांचे थवे. ओर्दिनोफच्या आठवणी अगदी ताज्या तरल होत्या. सुरेख, सुंदर होत्या. विस्तीर्ण नि स्वच्छ तळ्याच्या काठावर व लाटांची खळखळ ऐकत तो तासनतास पहुडलेला असे. तेव्हाही तिथे त्याला काही पऱ्या भेटत. तळ्याच्या पलीकडच्या काठावरून त्या त्याला खुणावीत. त्याच्याकडे पाहून स्मितहास्य करीत. त्याशिवाय दुसऱ्याही काही पऱ्या होत्या. रात्री आई त्याच्या छोट्याशा अंथरुणावर त्याला निजवायची. त्याच्या कपाळावर, हातांना क्रूसाची खूण करायची. त्याला कुशीत घेऊन अंगाई गीतं गायची. त्याला शान्त झोप लागावी यासाठी हे सारं ती करायची. रात्रीच्या अशा वेळीच स्वप्नातून त्याला रंगीबेरंगी पऱ्या भेटायच्या. आपल्या पंखांनी वारा घालून त्या पऱ्या ओर्दिनोफला निजवायच्या.

पण त्याच वेळी ओर्दिनोफच्या मनःचक्षूंपुढे अगदी वेगळ्याच माणसाची प्रतिमा उभी रहात असे. त्याची कल्पनाशक्ती अगदी वेगळ्याच स्मृतीला सामोरी जायची. हीच व्यक्ती अगदी लहानपणापासनं त्याला भिववीत आली. तिने दुःखाचे विषच काय ते त्याच्या सुखी आयुष्यांत भिनवून दिले. आपला भविष्यकाळ झाकोळून टाकण्यासाठी दैवाने जणू त्या गूढ म्हाताऱ्याची योजना केली असावी असेच ओर्दिनोफला अस्फुटपणे जाणवे. म्हणून तर त्या म्हाताऱ्याकडे नुसतं पहाताच छोटा ओर्दिनोफ भीतीने थरकापत असे. त्या म्हाताऱ्यावरची आपली नजर तो क्षणभरही ढळू देत नसे. आणि तो शापित म्हातारा सारखाच त्याच्या आगेमागे असे. बागेतून टेहळणी करून तो ओर्दिनोफच्या हालचालींचा आधीच अंदाज घेत असे. आणि अचानक एखाद्या झुडपामागून डोकावून त्याला वेडावून दाखवत असे. घरातदेखील तो

ओर्दिनोफच्याच बाहुल्यांसारखी हुबेहूब सोंगं घेत असे. आणि मग बोटांच्या फटींतून एखाद्या छोट्याशा राक्षसासारखी तोंडं वेडीवाकडी करत त्याला वेडावत असे. इतकेच काय तर ओर्दिनोफच्या शाळेतल्या धटिंगण पोरांनाही आपल्या ह्या बळीला छळायला चिथावत असे. त्याच्याशेजारी बाकावर बसून त्याच्या पुस्तकातला शब्द न् शब्द डाग पाडून घाणेरडा करायला चिथावीत असे. रात्री तर तो म्हातारा ओर्दिनोफच्या उशाशीच ठाण मांडून बसत असे. आपले निळेशार किंवा सोनेरी पंख फडफडवीत त्याच्या अंथरूणाभोवती घिरट्या घालणारे पक्ष्यांचे थवे तो उधळून लावीत असे. इतकेच नव्हे तर, ओर्दिनोफच्या आईलादेखील तो आपल्या मुलाच्या जवळपास फिरकू देत नसे. आणि ओर्दिनोफला न समजणाऱ्या कुठल्यातरी गोष्टी, दंतकथा रात्रभर सांगत बसत असे. बालवयातल्या उत्कंठा नि भयामुळे, त्यातही अशा गोष्टींमुळे ओर्दिनोफ अत्यंत अस्वस्थ होत असे. ओर्दिनोफच्या विनवण्या, हुंदके याकडे दुर्लक्ष करत ओर्दिनोफला गुंगी येईस्तोवर तो म्हातारा त्या भयानक गोष्टी सांगायचा आपला छंद चालूच ठेवत असे, परिणामतः ओर्दिनोफ अखेरीस जवळजवळ मूर्च्छितच होत असे.

आणि बालपणच्या त्या आठवणी अचानक ओर्दिनोफला त्याच्या तारुण्याच्या काळाकडे घेऊन गेल्या. वर्षं घरंगळत गेली. जीवनातल्या वास्तवाला तो आता सामोरा गेला. ह्या जगात आपण अगदी उपरे आहोत, त्यातल्या गूढ नि घातकी लोकांहून वेगळे आहोत, हे सत्य मात्र त्याला आयुष्यात फार लौकर उमगले. आजारी ओर्दिनोफ आपल्या खोलीत झोपून होता. कमरेपर्यंत वाकलेली म्हातारी, शेगडीशेजारी बसून ह्या आजारी तरुणाकडे पाहत अधून मधून हातवारे करत्येय. खोलीच्या अंधाऱ्या कोपऱ्यात उभे असलेले लोक अधून मधून ओर्दिनोफकडे पाहून कुजबुजतायत. म्हातारीकडे पाहत नजरांची अर्थपूर्ण देवघेव करणारे हे सारे जणच आपले शत्रू आहेत, आपण त्यांच्याहून अगदी वेगळे आहोत हे सत्यही ओर्दिनोफने कधीच स्वतःच्या गळी उतरवले होते.

पण असं स्वप्न पाहतानाही ओर्दिनोफ मध्येच घाबराघुबरा होत होता. खोलीच्या अंधेऱ्या कोपऱ्यात हे कोण लोक उभे आहेत ?. त्याला त्यांच्याशी काय घेणं-देणं आहे ? अशा शंकाकुशंकांनी तो आणखीनच दुःखी व्हायचा.

आपण भरकटत जात एका गुन्हेगारी अड्ड्यावर तर येऊन पोहोचलो नाही ना असाही त्याच्या मनाला प्रश्न पडायचा. कुठल्या तरी अज्ञात शक्तीने काहीतरी आमिष दाखवून आपल्याला तिथे पकडून ठेवलेय. तिथले रहिवासी, त्यांचा मालक ह्यांचा-चेहरा मोहराही आपण आयुष्यात कधी पाहिलेला नाही असेही त्याला वाटायचे.

मग बिछान्याच्या शेजारी वाकून बसलेली शुभ्र केसांची आणि डुगडुगत्या डोक्याची ती म्हातारी एक भली मोठी गोष्ट हलक्या आवाजात सांगायला लागायची. आणि अशा वेळी ओर्दिनोफला भीतीही अगदी असह्य व्हायची. आणखी भयंकर म्हणजे ती गोष्टच त्याच्या डोळ्यांपुढे साकार व्हायची. त्यातल्या व्यक्ती, त्यांच्या नजरा, आणि त्या नजरांतून डोकावणारे भावही त्याला अगदी लख्ख दिसायचे. इतकंच नव्हे तर त्याच्या स्वतःच्या मनातले विचारदेखील त्या प्रसंगातून प्रतिबिंबित व्हायचे. त्यात बालपणीची गोंधळलेली स्वप्ने असायची. आणि त्याच्या अगदी अलीकडच्या विचार-कृती-पर्यंत सारे काही असायचे. कधी काळी त्याने वाचलेले आणि मग विसरलेले सारे त्याला स्वप्नातच पुन्हा एकदा भेटायचे. मग त्याचे हे विचार-विश्व सजीव व्हायचे. मग ते सारे वास्तव बघता बघता आकाशाला जाऊन भिडायचे. त्याच्या भोवती फेर धरायचे. जादूच्या राजवाड्यात असतात तशा भव्य बागा बघता बघता त्याच्या नजरेपुढे उभ्या रहायच्या. भली मोठी शहरं उभारली जायची. आणि उद्ध्वस्तही व्हायची. स्मशानांच्या पोटातून माणसे वर यायची. नाहीशीही व्हायची. भूतकाळातले त्याचे सारे विचारच जणू त्याच्या रुग्णशय्येभोवती वास्तवात येत होते. त्याचे प्रत्येक स्वप्न सजीव होऊन पुन्हा एकदा जन्माला येत होते. आपल्या जवळच्या सगळ्या धार्मिक-आध्यात्मिक कल्पनांचा साठा आता संपला आहे आणि मागे उरलेयत ते नुसते शब्द नि कल्पनांचे पोकळ इमले, हीच ओर्दिनोफची भावना होती. एका क्षणी तर तो अगदी अविनाशी वाटणाऱ्या आणि अनंत विश्व व्यापणाऱ्या स्वप्नांच्या जगात वाळूच्या कणासारखा हरवून जात होता. अस्तित्वाच्या अमानुष दडपणाखाली आपले स्वातंत्र्यच चिरडले जातेय, हे अस्तित्व सनातन सत्यासारखे क्रूरपणे आपला पाठलाग करतेय असेही त्याला मधूनच वाटायचे. आपण मरून जातोय, शाश्वततेची किंवा पुनरुत्थानाची

कुठलीही आशा नसतानाच आपला देह मातीला मिळतोय असंही त्याला भासायचे. तो ह्यातून निसटून जाण्यासाठी धडपडायचा पण ह्या सगळ्या द्वेष्ट्या जगापासून लपून रहावं असा एकही कोपरा त्याला सापडत नसे. जरा वेळाने भयभीत होऊन, अंगातली सारी ताकद एकवटून तो किंचाळला.

उठताक्षणीच आपण घामाने निथळतोय हे त्याला सर्वप्रथम जाणवले. त्याच्या अवतीभोवती मृतप्राय शांतता होती. सगळीकडे दाट अंधार पसरला होता. तरीही त्या म्हातारीची गोष्ट कुठून तरी कानावर येतच होती. तिचा तो ओळखीचा, घोगरा आवाज अजूनही ओर्दिनोफच्या कानात घुमत होता. तिचं ते कधीच न संपणारं वर्णन अजूनही चालूच घनदाट अंधार, जंगलं, दरोडेखोर आणि स्तेंकाराझिनसारखे उमदे कोझाक नेते, त्यांचे सहकारी, व्होल्गा नदीवरचे नावाडी, आणि स्वतः व्होल्गा माता ह्यांच्या बद्दलचे ते सगळे वर्णन होते. तो भास होता की आपल्या कानांनी तो ऐकत होता? पुरा तासभर तो डोके विस्फारून ते ऐकत पहुडला होता. त्याच्या दृष्टीने तो काळ निःशब्द होता तसाच क्लेशदायकही. अखेरीस तो काळजी-पूर्वक उठला. निदान उठण्याएवढं तरी त्राण आपल्या अंगात आहेसं पाहून तो क्षणभर उल्हसित झाला. तो भयंकर आजारही त्याची सर्वच्या सर्व ताकद हिरावून घेऊ शकला नव्हता तर! त्याच्या पापण्यांवरची झापडही आता कमी झाली होती. त्याला पुन्हा वास्तवाचे भान आले होते. कॅथरीनशी शेवटी बोलला तेव्हाचेच कपडे अजूनही त्याच्या अंगावर होते. त्यावरून, सकाळी कॅथरीन भेटून गेली त्यानंतर फारसा वेळ गेला नसणार असा त्याने अंदाज केला. शिवाय कॅथरीनबद्दल वाटणाऱ्या आसक्तीमुळे त्याच्या नसांतून जणू आग पेटली होती.

भिंत चाचपडत पण काळजीपूर्वक तो उठला. तेव्हा पार्टीशनचा एक भला मोठा खिळाच त्याच्या हातात आला. दोन्ही हातांनी त्याने तो खिळा पकडला आणि जोर करून आपले शरीर वर उचलले. पार्टीशनच्या फटीतून अस्फुट प्रकाश बाहेर येत होता. त्याने त्या फटीपर्यंत अंग उचलले आणि फटीला डोळा लावला. श्वास रोखून, सावधपणे तो आतल्या गोष्टींचे निरी-क्षण करू लागला.

मालकांच्या ह्या खोलीच्या कोपऱ्यातच एक कॉट होती. कॉटपुढे

एक टेबल ठेवलेले होते. आणि त्यावर टेबलक्लॉथही अंथरलेला होता. कॉट बाजूच्या भिंतीवर ख्रिस्ताची प्रतिमा टांगलेली होती. ही प्रतिमाही ओर्दिनोफच्या खोलीतल्या प्रतिमेइतकीच जुनी होती. प्रतिमेपुढे दिवा तेवत होता. मूरीन अंथरूणावर पसरला होता. तो आजारी असावा. त्याचा चेहराही चादरीसारखा पांढरा फटक पडला होता. त्याचे हात फरकोटाखाली झाकले गेले होते. त्याच्या मांडीवर एक पुस्तक उघडेच पडले होते. त्याच्या शेजारच्या बाकावर कॅथरीन पहुडली होती. तिचा एक हात म्हाताऱ्याच्या गळ्याभोवती होता. आणि डोकेही त्याच्या खांद्यावर विसावलेले होते. अधूनमधून ती मूरीनकडे नजर टाकत होती. एका बालिश कुतूहलाने तिची नजर चमकत होती. तो वाचत होता. आणि ती ऐकत होती. तिचा ऐकण्याचा उत्साहही अनिर्बन्ध असा होता.

अधून मधून म्हातारा मूरीन आपला आवाज थोडा चढवत होता. तेव्हा त्याच्या सुस्त देहात थोडासा उत्साह संचारायचा. त्याच्या कपाळावरच्या आठ्या नि डोळ्यांतले अंगार पाहून कॅथरीनचा क्षणभर भीतीने थरकाप उडायचा. ते पाहून मग मूरीनच्या चेहऱ्यावर स्मितहास्यासारखे काही भाव डोकवायला लागायचे. कॅथरीनही गोड हसून त्याला प्रतिसाद द्यायची. मग तिच्या डोळ्यांत चमचमते अश्रू गोळा व्हायचे. नंतर म्हातारा मूरीन तिला लहान मुलासारखं थोपटायचा. आपल्या गोऱ्या हातांनी ती त्याला अगदी जवळ ओढून घ्यायची, बिलगायची. प्रेमभराने आपले डोके त्याच्या छातीवर घुसळायची. ओर्दिनोफला ते सारं स्वप्नासारखं आश्चर्यकारक वाटलं. नंतर देखील जेव्हा जेव्हा तो ह्या दृश्याचा विचार करायचा तेव्हाही त्याचे रक्त तापायचे. कपाळाच्या शिराही तट्ट फुगून यायच्या.

मग ओर्दिनोफने खिळ्यावरची हाताची पकड सैल केली. तो धडपडत अंथरुणावरून उठला. झोपेत चालणाऱ्या माणसासारखा अडखळत ओर्दिनोफ पार्टीशन पलीकडच्या मालकाच्या खोलीकडे निघाला. आपण काय करतोय हेही त्याला ठाऊक नव्हते. तो उतावीळ झाला होता. धक्का मारूनच त्याने दाराचे गंजके कुलूप वाकवले. तो आता खरोखरच मालकाच्या खोलीत उभा होता.

मूरीनच्या कपाळावर आठ्या पडल्या. त्याचे खोल गेलेले डोळेही संतापाने चमकून उठले. अचानक घडलेल्या घटनेनं मूरीनच्या आविर्भावातून फक्त

धमकीच ती काय व्यक्त होत होती. मूरीनने भिंतीवरचे पिस्तुल काढले. पिस्तुलाची नळी प्रकाशात चमकली. मूरीनने त्याच्यावरच नेम धरला. संतापाने त्याचा हात थरथरत होता. मग गोळी झाडल्याचा आवाज आला. आणि त्या पाठोपाठ एक भयंकर पण अनैसर्गिक किंकाळी. धूर विरला. आणि एक विलक्षण दृश्य ओर्दिनोफसमोर उभे होते. तो भयभीत होऊन मूरीनच्या अंगावर वाकून पहायला लागला. मूरीन फरशीवर पालथा पडला होता. फिट आल्याने त्याचे शरीर आचके देत होते. तोंडातून फेस येत होता. ओठ पांढरे पडले होते. त्या दुर्दैवी मालकाला, मूरीनला, अपस्माराचा झटका आल्याचे ओर्दिनोफने क्षणार्धात ओळखले. मूरीनवर उपचार करू पहाणाऱ्या कॅथरीनच्या मदतीसाठी तो झटकन् पुढे झाला.

: ३ :

सगळ्यांच्याच दृष्टीने ती एक भयंकर रात्र होती. ओर्दिनोफ पार अशक्त झाला होता. शिवाय त्याच्या अंगात अजून तापाची कणकणही होती. तरी देखील भल्या सकाळीच तो फिरायला म्हणून बाहेर पडला. अंगणातच त्याला तो तार्तर नोकर भेटला. त्यावेळी मात्र ओर्दिनोफला पाहताच त्याने अदबीने आपली टोपी हातांत काढून घेतली. मग तो ओर्दिनोफच्या हालचाली न्याहाळत राहिला. आपले कुतूहल लपवायचा त्याने जरादेखील प्रयत्न केला नाही. पण दुसऱ्याच क्षणी आपल्याच वृथा वागण्याने ओशाळून जाऊन त्याने पुन्हा एकदा झाडायला सुरुवात केली. तरीही झाडता झाडता तो त्याच्याच दिशेने येणाऱ्या ओर्दिनोफकडे हळूच कटाक्ष टाकत होताच.

‘ काल रात्री तू काही आवाज ऐकलास ? ’ ओर्दिनोफनेच बोलायला सुरुवात केली.

‘ ऐकला की ! ’ तो नोकर उत्तरला.

‘ माडीवरच्या त्या साहेबांची काय भानगड आहे ? व्यवसाय तरी कोणता करतात ते ? ’

‘ तुम्ही त्यांच्याकडेच रहाता ना ? मग ह्या प्रश्नांची उत्तरं खरंतर तुमची तुम्हीच शोधायची ! आपला काही सबंध नाही बुवा त्यांच्याशी ! ’

‘ तू माझ्या प्रश्नांना सरळ सरळ उत्तरं देणारेस का नाही ? ’ निराशेनं वैतागलेला ओर्दिनोफ जवळ जवळ त्याच्या अंगावर ओरडायचाच काय तो बाकी होता !

‘ अहो, ओरडताय काय असे ? मी काय तुमचं घोडं मारलंय ? चूक असलीच तर तुमची स्वतःचीच आहे. एकतर तुम्ही त्या गृहस्थांकडे गेलातच कशाला आणि उगाचच त्यांना त्रास दिलातच कशाला ? एक गोष्ट मात्र मी तुम्हाला जरूर सांगू इच्छितो. त्यांच्याखाली तळमजल्यावर तो शवपेट्या बनवणारा कारागीर रहातो ना ! पार बहिरा आहे तो, पण त्यानं देखील रात्री सारं काही ऐकलं आहे. त्याची बायको, ती देखील ठार बहिरीच ! पण तिनं देखील सारं काही ऐकलंय. त्या पलीकडच्या आवारातल्या लोकांनी देखील रात्रीचा प्रकार ऐकलाय ! खरं तर मी जाऊन पोलिसांनाच घेऊन यायला हवं होतं ! ’

‘ ठीक आहे. मीही आत्ता जातो नि पोलिसाला घेऊन येतो. ’ आवाराच्या दाराकडे वळता वळता ओर्दिनोफ म्हणाला.

तुम्ही त्यांच्याकडेच रहायला असता. आपणाला योग्य वाटेल ते करा... पण एक मिनिट थांबा साहेब, फक्त एक मिनिट !

ओर्दिनोफ मागे फिरला. तसा त्या नोकराने पुन्हा एकदा आदराने आपल्या टोपीला हात लावला.

‘ आपण जर पोलिसांकडेच चालला असलात ना तर—’ तो नोकर थांबून म्हणाला, ‘ तर मलाही जाऊन माझ्या मालकांना ह्याची खबर द्यायला हवी ! ’

‘ ठीक आहे ! आणखी काय म्हणायचंय मग तुला ? ’

‘ आणखी येवढंच की आपण पोलिसांत जाऊ नये हेच बरे ! ’

‘ मूर्ख ! ’ ओर्दिनोफ त्या तार्तर नोकरावरच उखडला. आणि परत

दाराकडे जायला निघाला.

'साहेब, साहेब, एक मिनिट हं!' नोकराने पुन्हा एकदा टोपीला स्पर्श केला आणि दात विचकत तो म्हणाला,

'माझं ऐका जरा, साहेब! उगाचच घाई करू नका. त्या गरीब माणसांमागे उगाच पोलिसांचा ससेमिरा कशाला लावून देताय! एक ईश्वरच जाणो, पण असं काही करणं योग्य होणार नाही!'

'ठीक आहे. मग आता माझंही जरा ऐक.' त्याच्या हातात एक नाणं सरकवीत ओर्दिनोफ त्याला म्हणाला 'हे घे. आणि मला सांग त्या म्हाताऱ्याची खरी भानगड काय आहे?'

'त्याची भानगड?'

'हो. तीच ती.'

'पण पैसे न देताही मी तुम्हांला सांगितली असती की!'

नोकराने पुन्हा एकदा झाडायला घेतले. पण आता त्याचा चेहरा गंभीर झाला होता.

'आपण फार छान गृहस्थ आहात. तरुणही आहात. पण आमच्या मालकांसारख्या भल्या माणसाशी संबंध ठेवण्याइतकं काही तुम्हाला चांगलं म्हणता यायचं नाही. माझा आपणाला एकच सल्ला आहे. आपलं स्वतःचं काय ते पहा. दुसऱ्यांच्या गोष्टीत उगाचच कशाला नाक खुपसताय!' पुन्हा झाडायला घेताना त्याच्या नजरेतून एक प्रामाणिकपणा, जवळ जवळ संतापच काय तो व्यक्त होत होता. झाडीत झाडीत शेवटी तो ओर्दिनोफ होता. तिथेच आला. पण त्याच्या एकूण वागण्यातच एक प्रकारचा गूढपणा होता. आपले हात उडवत तो ओर्दिनोफला म्हणाला,

"ते 'तसेच' आहेत!"

"'तसे' म्हणजे?"

'म्हणजे त्यांच्या डोक्यातच बिघाड आहे!'

'म्हणजे म्हणायचंय तरी काय तुला?'

'म्हणजे हेच की अधून मधून त्यांचं डोकं ठिकाणावर नसतं!' त्याचा आवाज आता अधिक ठाशीव झाला होता. 'हो. त्यांचं डोकं फिरतं आणि मग ते असे आजारी पडतात. आता हेच पहा ना, एके काळी त्यांच्याकडे

एक बोट होती. खरं तर एकच काय अशा अनेक बोटी त्यांच्या मालकीच्या होत्या. ह्या बोटी व्होल्गा नदीवर वाहतूक करायच्या. मीदेखील व्होल्गेकाठचाच रहिवासी आहे. शिवाय एक कारखानाही चालवायचे ते. पण पुढे तो कारखानाही जाळला गेला. तर हेच हवं होतं ना तुम्हाला ? ह्या सगळ्यापायीच तर डोकं फिरलंय त्यांचं ! '

' म्हणजे त्यांना वेड लागलंय असं म्हणायचंय का तुला ? '

' अगदीच तसं नाही.' नोकराचा एकूण आविर्भावच त्याच्या मनात काही वेगळं असल्या सुचवतचं होता !

' नाही. तसे ते वेडे नाहीत. उलट अगदी चारचौघांसारखेच शहाणे आहेत ते. उलट जगात इतरत्र घडणारं सारं काही ठाऊक असतं त्यांना. हो जगातलं सगळं काही. त्यांनी सर्व काही वाचलंय. भविष्यही सांगू शकतात ते. कुणी भविष्य विचारायला आलंच तर ज्याच्या त्याच्या कामाच्या स्वरूपाप्रमाणे त्याच्याकडून ते दोन, तीन फारतर चार रूबल मोबदला घेतात. मग मूरीन महाशय आपलं एक पुस्तक काढतात. त्यातली पानं चाळतात आणि आपल्या गिऱ्हाईकाचे संपूर्ण भविष्य त्याला सांगतात. मात्र सर्वांत आधी तुम्ही त्यांच्या टेबलावर पैसे ठेवायलाच हवेत. पैशाशिवाय तुमचं काम काही व्हायचं नाही.' त्या तार्तर नोकराला मालकाच्या एकूण व्यवहारातच खूप रस असावा. म्हणून तर हे सारं बोलल्यावर तो खळखळून हसला.

' म्हणजे मूरीन ज्योतिषी आहे तर ? दुसऱ्यांना सल्ला–बिल्ला देतात की नाही ते ? '

' होय तर ! ' संमतिदर्शक मान डोलवत तो नोकर गुरकावला ' तुमच्या नशिबात असेल ते सारं ते अगदी तंतोतंत सांगतात. शिवाय तुमच्यासाठी म्हणून परमेश्वराची प्रार्थनाही करतात ते. हो. खूप वेळ परमेश्वराची प्रार्थना करत असतात ते. आणि त्यातच मग त्यांना फिट येते.' त्या तार्तर नोकरानं एवढं बोलून पुन्हा एकदा सूचक नजरेनं ओर्दिनोफकडे पाहिले आणि... आणि त्याच क्षणी आवाराच्या पलीकडच्या बाजूने कुणीतरी त्या नोकराला हाक मारली. मग केस पिकलेला खुजा म्हातारा ओर्दिनोफच्या नजरेला पडला. त्याने शेतकऱ्यासारखा अंगरखा चढवला होता. त्याची नजर जमिनीकडे होती. चालता चालता तो खोकत होता. अडखळत होता. तोंडानं

प्रार्थनाही पुटपुटत होता. तो म्हातारा का कोण जाणे अगदी लहानपणीच टाकून दिलेल्या मुलासारखा वाटत होता.

'मालक आले! मालक!' ओर्दिनोफला घाईगर्दीने निरोपाचा नमस्कार करत तो म्हणाला, मग डोक्यावरची टोपी हातात घेत तो धावतच त्या म्हाताऱ्याला भेटायला गेला. काही झालं तरी आपण या म्हाताऱ्याला कुठे तरी पाहिलंय असेच ओर्दिनोफचे मन त्याला खात्रीने सांगत होते. पण एकूणच ह्या घटनेचं ओर्दिनोफला तितकंसं महत्त्व वाटलं नाही. म्हणूनच तो तिथून निघाला. कुणी तरी थोर गृहस्थ असावा तसा तो नोकरही ओर्दिनोफला दारापर्यंत पोहोचवायला आला.

'ह्या लबाड नोकरानं मला फसवलंन तर!' ओर्दिनोफ स्वतःशीच म्हणाला, 'काय कसलं रहस्य ह्या जागेत लपून राहिलंय ते परमेश्वरालाच ठाऊक!'

ओर्दिनोफ थोडाफार चालून गेला असेल नसेल तोच त्याच्या विचारांनी वेगळेच वळण घेतले. हवा अगदी कुंद होती नि थंडही. हिमवर्षावही होत होता. ओर्दिनोफ थंडीने जणू गोठून गेला होता. आपल्या पायाखालची जमीन हिंदकळत्येय असाच त्याला भास होत होता. आणि अचानक एका परिचित आवाजानं त्याला सकाळच्या सदिच्छा दिल्या. तो आवाज अगदी उत्साहपूर्ण असल्याने कानांनाही सुखद वाटत होता.

'काय? यारोस्लाव इल्यीच तू?' ओर्दिनोफ चमकून उद्गारला. तिशीतला एक माणूस ओर्दिनोफच्या पुढ्यात उभा होता. तो उंचीनं बेताचाच असेल पण अंगलटीनं बळकट होता. त्याचे लहानसे डोळे भुरे पण निस्तेज होते. त्याच्या चेहऱ्यावर एक तांबूस झाक होती. हास्य तर नेहमीच त्याच्या ओठांवर झळकत असावं! आणि त्याचे कपडे! असे कपडे यारोस्लावच काय तो घालू शकला असता! वर्षभरापूर्वी योगायोगानेच त्या दोघांचा रस्त्यातच परिचय झाला होता. म्हणून तर यारोस्लावने अगदी आदराने आपला हात ओर्दिनोफच्या हातात दिला.

यारोस्लाव मुळातच जरा हलक्या-फुलक्या वृत्तीचा होता. सामाजिक दृष्ट्या प्रतिष्ठित असणारांशी तो संबंध ठेवून होता.त्यातही उच्चभ्रू समाजाचे निदान रीतिरिवाज ठाऊक असलेल्यांशी किंवा हुशार नसले तरी बहुश्रुत

असणारांशी ओळखी करून घेण्याची असाधारण कला त्याला साध्य झाली होती. मुळातच यारोस्लावचा वरच्या आवाज पट्टीतला पण सुखद होता. पण बोलण्यातील काही स्वरांच्या चढउतारांतून निष्कारणच असह्य असा मीपणा व्यक्त व्हायचा. आणि मतांच्या विसंगती दूर व्हायच्या. अगदी जवळच्या मित्रांशी बोलताना देखील असंच व्हायचं. पण हाही यारोस्लावच्या सवयीचाच जणू एक भाग होता.

'काय योगायोग आहे पहा!' यारोस्लाव उत्साहाने ओरडला. त्याचा चेहरा निर्मळ आनंदाने उजळला होता.

'सध्या मी ह्या इथेच राहतो.' ओर्दिनोफने खुलासा केला.

'पण झाले तरी किती दिवस तुला इथे येऊन?' यारोस्लावचा स्वर काहीसा वर गेला. तो पुढे म्हणाला,

'मी तुझा लांबचा भाऊ लागतो. आठवतय ना तुला? तरी देखील तू इथे रहातोयस हे ठाऊकच नव्हतं मला. रायझानहून परत आल्यापासनं गेला महिनाभर मीही ह्याच भागात रहातोय. खरं तर तू माझा सर्वात जुना आणि जवळचा मित्र. निदान मी तरी तसं मानतो.' मग यारोस्लाव निर्मळ मनाने हसला. मग मोठ्यांदा नोकराला हाक मारून म्हणाला, 'सर्जीएव! तारासोव्हच्या घरी माझी वाट पाहत तू थांब. आणि ओल्सुफियेव्हच्या नोकराला तावडतोब माझ्या ऑफिसात पाठवून दे. तासाभरातच मी तिथे येतो.'

आपल्या नोकराला थोडक्यात सूचना देत असतानाच यारोस्लावने ओर्दिनोफच्या खांद्यावर हात टाकला. आणि त्याला एका हॉटेलात नेत म्हणाला,

'किती दिवसांनी भेटतोय आपण! आता थोड्या गप्पा गोष्टी करायलाच हव्यात.' त्याचा स्वर काहीसा अलिप्त वाटला. मग काही खाजगी गोष्टी विचाराव्यात तसे त्याने हलक्या आवाजात ओर्दिनोफला विचारले, कसं काय चाललंय आजकाल तुझं? अजूनही विज्ञानाचा अभ्यास करतोस का तू?'

'हो. तो तर नेहमीच चालू असतो!' ओर्दिनोफ हरवल्यासारखा उत्तरला.

'काय विलक्षण आहे तुझा हा ध्यास, व्हासिली मायकेलोवीच! छानच आहे!' यारोस्लावने उत्साहाच्या भरात ओर्दिनोफचा हात दाबला. एक ना

एक दिवस निश्चितच तू रशियन समाजाचे भूषण ठरशील ! तू निवडलेल्या ह्या जीवनक्रमात परमेश्वर तुला साथ देवो ! तू भेटल्याने केवढा आनंद झालाय सांगू मला ! कितीदा तरी तुझाच विचार माझ्या मनात येत असतो. आणि मी आपल्या मनाशी म्हणतो, आमचा हा चांगला उदार नि बुद्धिवान दोस्त आहे तरी कुठे ? '

दोघे जण एका वेगळ्या बंदिस्त खोलीत बसले. व्होडका नि जेवणाची ऑर्डर दिल्यावरच यारोस्लाव खुर्चीत बसला. त्याने आपल्या जोडीदाराकडे एक स्नेहपूर्ण कटाक्ष टाकला.

'मीही खूप वाचलंय ! ' यारोस्लावने हळूहळू बोलायला सुरवात केली. 'सारा पुष्किन् वाचून काढलाय मी ! '

ओर्दिनोफ अजूनही गोंधळलेलाच होता. तो यारोस्लावकडे फक्त पाहत राहिला.

'पुष्किनचं प्रेमविषयक ज्ञान केवढं आश्चर्यकारक होतं नाही ! ' यारोस्लाव पुढे म्हणाला, 'पण सर्वांत आधी थोर विचार मला सांगून तू माझं भलं केलंस त्याबद्दल मला तुझे आभार मानू देत ! '

'भलतंच काही तरी बोलतोस झालं ! ' ओर्दिनोफ पुटपुटला.

'छे ! छे ! मी खरं तेच सांगतोय ! मी सत्यावर प्रेम करतो आणि सत्याशी मी सतत प्रामाणिक राहात आलोय, याची मला जाणीवही आहे.'

'अरे तू स्वतःवरच अन्याय करतोयस असं काही तरी बोलून ! आणि माझंच म्हणशील तर—

'पण मी म्हणतोय ते अगदी खरंय ! यारोस्लाव हळुवारपणे पुन्हा म्हणाला, 'अरे, तुझ्यापुढे तर मी किस झाडकी पत्ती ! '

'छे ! छे ! '

'तरसंच आहे ते ! खात्रीनं सांगतो मी तुला ! '

मग पुन्हा शांतता पसरली.

'केवळ तुझ्याच सल्ल्यामुळे मी वरचेवर वाईट लोकांत मिसळायचं सोडून दिलं. माझं वागणंही मी सुधारलं.' यारोस्लावने रूबाबात पुढे बोलणे चालू केले, 'आणि आजकालही माझ्या मोकळ्या वेळातला बराचसा वेळ मी घरीच घालवतो. एखादं मार्गदर्शक पुस्तक वाचतो आणि वासिली मायकेलोवीच,

आता म्हणशील तर माझ्या मनात फक्त एकच इच्छा आहे, आणि ती म्हणजे आपल्या देशाची सेवा करणे ! '

' यारोस्लाव, मीही नेहमीच तुला माझा एक चांगला मित्र मानीत आलोय ! '

' ओर्दिनोफ, आता मला आणखी किती प्रोत्साहन देणार आहेस तू ! ' असं म्हणत यारोस्लावनं आपल्या मित्राचा हात पहिल्यापेक्षा अधिक आवेगाने दाबला.

' अरे, पण तू व्होडका का घेत का नाहीयेस ? ' तो भावनावेग ओसरल्यावर यारोस्लावने ओर्दिनोफला विचारले.

' मला काही व्होडका पिता येणार नाही. कारण माझी तब्येतच जरा नरम आहे ! '

' अं ! तब्येत बरी नाही म्हणतोस तुझी ? कल्पना नव्हती मला. कधी पासनं आजारी आहेस तू ? तुझ्यासाठी चांगला खात्रीचा डॉक्टर पाहिला तर चालेल का ? आत्ताच्या आत्ता जाऊन डॉक्टरला घेऊन येतो मी. खूप हुशार आहे तो ! ' यारोस्लावने बोलता बोलता हॅट उचलली आणि तो निघाला देखील !

' आभारी आहे तुझा मी, यारोस्लावा पण. असली गडबड मला आवडत नाही. आणि मुळातच माझा डॉक्टर ह्या प्रकारावर विश्वास नाही ! '

' अरे, असं कसं म्हणतोस तू ? ' यारोस्लाव्हने त्याला विरोध केला.

' अरे बाबा, मी तुला पुन्हा सांगतो, ओर्दिनोफ, हा डॉक्टर खरोखरच अतिशय हुशार आहे. पुरावा म्हणून एक सत्य घटनाच सांगितली तर ? तुझी हरकत नसेल तर सांगतो. काही दिवसांपूर्वी एक गरीब लोहार उपचारांसाठी म्हणून ह्या डॉक्टरांकडे आला. तो ह्या डॉक्टरांना म्हणाला, ' एक हत्यार माझ्या हातांत आरपार घुसलंय. तुम्ही कृपा करून मला ह्यातून बरं करा. ' हे ऐकल्यावर सिमोन पाफनुतिच ह्या त्या डॉक्टरने त्या दुर्दैवी लोहाराला गँगरीनचा धोका असल्याचं क्षणार्धात ओळखलं. आणि त्यानं त्या लोहाराचा हात कापायचा निर्णय घेतला. माझ्या देखतच त्याने ती शस्त्रक्रिया पार पाडली. त्याने ते शल्यकर्म इतक्या कौशल्याने आणि सफाईदारपणे पार पाडले ! त्याच्या साधेपणामुळे मी कौतुकाने इतका

भारावून गेलो की, त्या रुग्णाच्या वेदनांचाही मला क्षणभर विसर पडला. कधी आणि कुठे आजारी पडलास तू ?"

' माझी राहायची जागा बदलली, त्या सुमारासच आजारी झालो मी. आणि आत्ता नुकताच कुठे त्यातून उठतोय ! '

' म्हणजे अजूनही तू आजारीच आहेस म्हण की ! या स्थितीत तर तू मुळीच बाहेर पडायला नको होतंस. पण हल्ली तू तुझ्या पहिल्या जागेत राहात नाहीस वाटतं ? '

' नाही. माझ्या मालकिणीला पिटर्सबर्ग सोडून जाणं भाग पडलं ! '

' मादाम साविश्नांना ? खरंच की काय ? ती म्हातारी काय विलक्षण आहे नाही ? तिच्याबद्दल मला तर अगदी आईसारखा आदर वाटतो, हे माहितेय तुला ? तिचा तो पडता काळ देखील इतका उदात्त होता ! त्यातही एक खानदानीपण होतं. तिच्या विनाशात कित्येकांना आपल्याच दुर्दैवी दिवसांची प्रतिकृती दिसायची. आणि— काहींना तर त्यात काव्यमयताही दिसत होती. यारोस्लावचे अखेरचे उद्‌गार तर ओरडण्यातच जमा होते. तो भलताच गोंधळला होता. त्यामुळे त्याचा चेहराही लालबुंद झाला होता.

' खरंय तुझं म्हणणं. ती एक भली स्त्री होती ! '

' एक विचारू का ? सध्या कुठे रहातोस तू ? '

' इथे जवळच कॉरश्मारोव्हच्या इमारतीत रहातो मी. '

' ओळखतो मी त्यांना. अगदी सभ्य म्हातारा आहे तो. यापुढे जाऊन मी म्हणेन की त्यांच्याशी माझी अगदी चांगली जवळीकही आहे. परमेश्वर त्या भल्या गृहस्थाला सुखी ठेवो ! ' एका आपुलकीच्या भावनेनं यारोस्लावचे ओठ थरथरले. त्याने व्होडकाची आणखी एक बाटली आणि पाईपही मागवला.

' तू दुसऱ्या कुणाकडे तर राहत नाहीस ना ? ' यारोस्लाव पुढे म्हणाला, ' की तुझी स्वतःची जागा आहे ? '

' नाही दुसऱ्यांकडेच पोटभाडेकरू म्हणून राहतो मी ! '

' कुणाकडे राहतोस तू ? कदाचित मी त्यांना ओळखतही असेन ! '

' मूरीनकडे रहातो मी. परदेशी आहे. पण छान म्हातारा आहे ! '

' कुणाकडे ? मूरीनकडे ? मागच्या बाजूच्या अंगणात राहतो तो ? त्या

शवपेट्या करणाऱ्या कारागिराच्या वरच तर राहत नाही तो?'

'हो तिथेच !'

'हं. मग अगदी आरामात असशील तू तिथे?'

'अगदी तसंच काही म्हणता येणार नाही अजून. नुकताच तर मी तिथे राहायला आलोय.'

'हं. ते ठीक आहे. पण मला असं म्हणायचं होतं की – तुला मूरीन संबंधात वेगळं तर काही पहायला मिळालं नाही ना?'

'बापरे, म्हणजे म्हणायचंय तरी काय तुला?'

'जोवर तुझी जागा तुला बरी वाटतेय तोवर काही चिंता नाही. पण खरंतर मी तुला वेगळंच काही सांगणार होतो – तुला एक धोक्याची सूचनाही देणार होतो. पण मला माहितेय तुझा एकुण स्वभाव – त्या परदेशी म्हाताऱ्याबद्दल, काय मत आहे तुझं?'

'त्यांची प्रकृती तितकीशी बरी नसावीसं वाटतं!'

'खरंय ते. तो काहीसा आजारी असतो खरा. त्याशिवाय आणखी काही निदर्शनास आलंय तुझ्या? मूरीनशी स्वतः कधी बोललायस तू?'

'मोजकेच चारँ शब्द बोललोय तेवढंच. त्याचा भिडस्तपणा नि अभिमान बोलण्याआड येतात.'

'हं.' यारोस्लाव विचारात हरवल्यासारखा दिसला. थोडं थांबून तो म्हणाला, 'तो अत्यंत दुर्दैवी माणूस आहे.'

'खरं की काय?'

'मूरीन दुर्दैवी आहे तसाच तऱ्हेवाईकही! त्याचं सारंच आयुष्य विचित्र आहे, मजेशीरही. पण त्यानं तुला काही दिल्याचं दिसत नाहीयेय! पण उगाचच ह्या विषयाकडं लक्ष दिल्याबद्दल मी तुझी माफी मागतो. तरी मला वाटतंय, मला एकच जाणून घ्यायचंय—'

'यारोस्लाव, तू आता माझं कुतूहल चाळवलंयस. आता तरी मूरीनबद्दल सारं काही सांगून टाक. मी त्याच्याकडेच राहतोय म्हणून तर ह्या विषयात इतका रस घेतोय.'

'ठीक आहे सांगतो. म्हणतात की एकेकाळी मूरीन खूपच श्रीमंत होता. त्याचा स्वतःचा व्यापार होता. अर्थात आत्तापर्यंत हेही तुझ्या कानावर

आलंच असेल. त्याच्या मालकीच्या कित्येक बोटी वादळात बुडून गेल्या. त्यामुळेच तो खचला आहे. आपला एक कारखाना त्यानं कुणा नातलगाला चालवायला दिला होता. पण तोही एकदा आगीत भस्मसात झाला. आणि त्याच आगीत मूरीनचा तो नातलगही जळून गेला. काय हा नशिबाचा खेळ! म्हणतात, तेव्हापासनं मूरीन आपल्याच दुःखाचा बळी झालाय. सुरुवाती–सुरुवातीला तर त्याच्या एकूण वागण्याबद्दल भीतीचीच भावना होती. व्होल्गेवरच्या बोटीं दुसऱ्या एका मालकाबरोबर भांडताना त्यांचा असा काही भडका उडाला! त्यानंतरची मूरीनची प्रत्येक गोष्टच वेडेपणा समजली गेली. व्यक्तिशः म्हणशील तर असं काही घडलंच असेल ह्यावर माझा विश्वास आहे. कारण त्यानं केलेली एकेक विलक्षण कृत्यंही नंतर माझ्या कानावर आली आहेत. आणि शेवटी आणखी एक दुर्दैव त्याच्या वाट्याला आलंय! ह्या घटनेबद्दल दुर्दैवाच्या फेऱ्यालाच जबाबदार धरावं लागेल!'

'म्हणतात की वेडाच्या एका झटक्यात त्यानं एका तरुण व्यापाऱ्यालाच जखमी केलं.' यारोस्लाव पुढे सांगायला लागला. 'तोपर्यंत तरी त्या व्यापाऱ्याबद्दल मूरीनच्या मनात जिव्हाळाच होता. लोभही होता. म्हणूनच भानावर आल्यावर मूरीनच्या मनाला विलक्षण धक्का बसला. तो जवळ जवळ आत्महत्याच करायच्या बेतात होता. म्हणूनच तर गेली काही वर्षं धार्मिक देहदंड सोसून तो आपल्या त्या पापाचं परिमार्जन करू पहातोय असंही म्हणलं जातं. पण तुला एकदम काय झालं? माझ्या बडबडीनं तू कंटाळला तर नाहीस ना?'

'नाही. नाही. उलट मी उलट मी उत्सुकतेनं ऐकतोय. आत्ता पुढे काय ते सांग. कृपया पुढे सांगत रहा. मूरीन पश्चात्तापदग्ध होऊन धार्मिक कृत्यं करतो असं काहीतर सांगत होतास ना तू? पण ह्या शोकांतिकेतलं मूरीन हे काही एकच पात्र नाहीयेय. खरंय ना?'

'ते मला ठाऊक नाही. पण ह्या भानगडीत तो एकटाच गुंतला होता असं सगळेच म्हणतात. त्याच्याबद्दल माहीत होतं ते सारं काही मी तुला सांगितलं. अपवाद फक्त एका गोष्टीचा—'

'अपवाद? तो कशाचा?'

'ठीक आहे. मला माहितेय–पण कमीत कमी– पण नकोच- ह्या पलीकडे मला काहीच ठाऊक नाहीयेय, ओर्दिनोफ.' पण मी धोक्याची सूचना मात्र तुला देऊ इच्छितो. त्याच्या वागण्यात विचित्र काही आढळतंच त्याच्या अनेक दुर्दैवाची एक परिणिती म्हणूनच त्याकडे पहायला हवं.'

'म्हणजे मूरीन अतिशय धार्मिक आहे तर पण! तो धर्मवेडा तर नाही ना ?'

'मलाही तसंच वाटतंय खरं तर. पण त्यानं आयुष्यात काय काय भोगलंय ह्याचा जरा विचार कर! माझ्याबद्दल म्हणशील तर तो सहृदय असावा ह्याबद्दल माझी खात्री आहे.'

'आता तरी तो ठीक आहे ना ?'

'तो वेडा तर निश्चितच नाही. मी अगदी खात्रीने सांगतो!' यारोस्लाव थोडा थांबला. व म्हणाला, 'यापुढे जाऊन तो आपल्या शरीरावर आणि मनावरही पूर्ण ताबा ठेवून आहे असंही म्हणू शकेन मी. पण मघाच्या तुझ्याच प्रामाणिक मताप्रमाणे तो विक्षिप्त आहे खरा. तसाच धार्मिकही मात्र तो तितकाच बुद्धिमानही आहे. मुद्दयाला धरून तो चांगली चर्चाही करू शकतो. अगदी अस्खलितपणे बोलूही शकतो. पण पुस्तकी ज्ञानात तो एवढा पारंगत असावा ह्याचंच जरा आश्चर्य वाटतं! त्याचं चित्रविचित्र आयुष्यही त्याच्या चेहऱ्यावर आपले वण उमटवून गेलंय!' यारोस्लाव म्हणाला.

'मला वाटतं तो धार्मिक ग्रंथही मोठ्या प्रमाणावर वाचत असतो, नाही ?'

'खरंय ते. त्याला सिद्धी प्राप्त झालीय बघ!'

'काय म्हणालास तू ?'

'सिद्धी प्राप्त झालीय त्याला. मी हे तुला अगदी खात्रीपूर्वक सांगू शकेन. पण त्याच्याबद्दल बराच काळ संशयाचंच वातावरण होतं. त्याचा सल्ला घ्यायला येणाऱ्यांवरही केवढा प्रभाव पाडीत असे तो!'

'कसला प्रभाव पाडीत असे तो ?'

"तुझा विश्वास बसो, न बसो. पण एका प्रसंगाचंच उदाहरण घेऊन मला काय म्हणायचंय ते मी तुला सांगतो. मूरीन ह्या जागेत राहायला येण्या-पूर्वीची घटना आहे ही. एक दिवस कोणी ॲलेक्झांडर इग्नात्येविच नावाचा

गृहस्थ, एका लेफ्टनंटला बरोबर घेऊन मूरीनला भेटायला म्हणून आला. हा अलेक्झांडर एक सन्माननीय गृहस्थ होता. तो अधिकाराच्या पदावर कामही करीत होता. त्याच्याबद्दल जनमानसात आदरही होता. केवळ कुतूहलानंच काय ते दोघे मूरीनकडे आले होते. अलेक्झांडरनं दार वाजवलं. मूरीननेच ते उघडले. मग मूरीन खूप वेळ ह्या पाहुण्यांकडे एका विचित्र नजरेनं एकटक पाहत राहिला. अर्थात हीही त्याची नेहमीचीच पद्धत होती. डोकं ठिकाणावर असलं तरच तो आपल्याकडे आलेल्यांचं खुल्या दिलानं स्वागत करीत असे. पण जर का त्याचा मूड ठीक नसेल तर मात्र तो फक्त कामाच्याच गोष्टी करीत असे. क्षणभराच्या स्तब्धतेनं तर मूरीननं उद्धटपणे त्या दोघांना विचारलं, ‘सद्गृहस्थहो, काय काम आहे आपलं माझ्याकडे?’ त्यावर अलेक्झांडर उत्तरला, ‘आम्ही आपला सल्ला घ्यायला आलोय. आपण अंतर्ज्ञानानं ते ओळखलं असेलच!’ ‘ठीक आहे. मग माझ्या अभ्यासिकेत चला तर!’ कसलीही टाळाटाळ न करता मूरीन अलेक्झांडरला म्हणाला. पण आत नेमकं काय घडलं ते अलेक्झांडरनं अगदी आजपर्यंत मला एका शब्दानंही कधी सांगितलं नाही. ते काही असो, तिथून बाहेर पडताना अलेक्झांडरचा चेहरा पांढराफटक पडला होता हे खरं! आणखी एका वरंदाज महिलेच्या बाबतीतही नेमकं असंच घडलं. मूरीनच्या घरातून बाहेर पडताना तिचाही चेहरा उतरला होता. डोळयांत अश्रू दाटून आले होते. बाहेर आल्यावर एकीकडे ती मूरीनच्या संभाषण–चातुर्यामुळे आश्चर्य चकित झाली होती. तर दुसरीकडे त्यानं सांगितलेल्या भविष्यामुळे भयंकर घाबरूनही गेली होती.’

‘काय विलक्षण आहे हे सारं! पण आज काल तो असले प्रकार करत नाही खरंय ना?’ ओर्दिनोफने विचारले.

“नाही. असं काही न करण्याबद्दल त्याला बजावलं गेलं. आणखी एक विचित्र किस्सा सांगतो मी तुला. उदाहरणच द्यायचं तर एक दिवस एक तरुण लेफ्टनंट मूरीनची टिंगल-टवाळी करायला लागला. हा तरुण एकुलता एक होता. स्वाभाविकच तो आपल्या कुटुंबियांचं एकमेव आशास्थान होता. ‘कुणाला हसतोयस तू?’ मूरीनने रागानंच त्याला विचारलं. ‘तीन दिवसांनी तुझं काय होणारेय ठाऊक आहे तुला? मग दोन्ही हातांनी

छातीवर क्रूसाची खूण करत त्यानं त्या तरुणाला, तो मरणार असल्याचं सुचवलं."

'खरं की काय हे ?'

'अगदी खरंय हे. ह्या भविष्याबद्दल मूरीनला श्रेय द्यायचं का नाही, हे मला ठाऊक नाही. पण नंतर मात्र ते भविष्य खरं ठरल्याचं मला सांगण्यात आलं. मूरीनला कसली तरी दैवी शक्ती लाभलीय हेच खरं. पण तू का असा हसतोयस ? माझ्याहून तू नक्कीच बुद्धिमान आहेस. पण माझा मूरीनवरही विश्वास आहे. तो ढोंगी, लब्धप्रतिष्ठित तर नक्कीच नाही ! पुष्किननंदेखील असाच एक प्रसंग वर्णन केलाय.'

'हं. पण ह्या बाबतीत मी तुझ्याशी वाद घालू इच्छीत नाही...मूरीन तिथे एकटाच राहतो म्हणालास ना तू ?'

'खरं तर मला नेमकी अशी काही माहिती नाहीयेय. मी मला... वाटतं, त्याची मुलगीही त्याच्याबरोबरच राहते.'

'मुलगी ?'

'हं मुलगीच किंवा कदाचित ती त्याची बायकोही असू शकेल. ते काही असो, कुठली तरी स्त्री त्याच्या घरी राहतेय एवढं खरे ! मी तिच्याशी बोललोयही. पण तेव्हा तिची खास अशी दखल घेतली नाही हेही तितकंच खरं !'

'हं. मोठं विलक्षण आहे हे सगळं !'

मग ओर्दिनोफ कसल्यातरी असंबद्ध विचारशृंखलेत गुरफटला गेला. आणि यारोस्लावही स्वतःतच हरवून गेला. आपला जुना मित्र त्याला भेटला होता. स्वतःच्या संबंधातल्या चार कुतूहलपूर्ण घटना त्याला छान रंगवून सांगता आल्या होत्या. त्यामुळेच यारोस्लाव स्वतःवरच खूष होता. त्या समाधानातच तो पाईप ओढीत होता. आपल्या मित्राला लक्षपूर्वक न्याहाळत होता. पण अचानक कामाची आठवण झाल्यासारखा तो गडबडीने उठला. ओर्दिनोफला म्हणाला, 'हे काय ? एक तास झाला ? तो जवळ जवळ ओरडलाच ! काय हे. एकाला भेटायचं होतं. मी पार विसरलोच, बघ ! ह्या मस्त भेटीबद्दल नशिबाचे पुन्हा एकवार आभार मानतो मी. आता तरी मला जायलाच हवं. तुझ्यासारख्या ज्ञानार्थीच्या घरी येऊन

तुला भेटायची परवानगी मिळेल काय ? '

' मी तर तुला तीच विनंती करीन. तुझ्या येण्यानं मला फारच आनंद होईल. शिवाय वेळ मिळाल्यावर मीही तुझ्याकडे येऊन जाईन ! '

' मग मीही तुझी वाट पाहतो. तुझी भेट माझ्या दृष्टीनंही किती उपयुक्त ठरेल ! तुला खरं वाटायचं नाही पण तुझ्या ह्या भेटीमुळेही किती आनंदित झालेय म्हणशील मी ! '

ते दोघेही कॅफेबाहेर आले. दारांतच त्यांना सर्जीयेव्ह भेटला. त्यांना शोधायला तो धापा टाकीत आला होता. तसं आल्याबद्दल खुलासा करण्यासाठी म्हणून त्याने पुष्कळ बडबड केली. इमलीयेनोवीच महोदय यारोस्लावला ताबडतोब भेटू इच्छीत होते. तेवढ्यांत एक घोडागाडीही तिथे आली. गाडीचे दोन्ही घोडे विलक्षण देखणे होते. यारोस्लावने आपल्या सर्वोत्कृष्ट मित्राशी, ओर्दिनोफशी, हस्तांदोलन केले. आणि आदरानं टोपीला स्पर्शही केला. मग यारोस्लाव इमलीयेनोवीचला भेटायला निघून गेला. बग्गी वळून जात असतानादेखील त्याने ओर्दिनोफला दोन वेळा हात केला.

शरीरावरचा आणि मनावरचा ताण उतरला असला तरीही ओर्दिनोफ विलक्षण दमून गेला होता. धड पावलं उचलून टाकणं देखील त्याला मुश्किल वाटत होतं. त्यामुळे घरी जाऊन पोहोचेपर्यंत त्याला अतिशय श्रम झाले. दारांतच पुन्हा त्याला तो तार्तर नोकर दिसला. ओर्दिनोफनं यारोस्लावचा निरोप घेत असल्यापासनंच तो त्याच्याकडे पहात होता. त्या नोकराला ओर्दिनोफशी खरं तर काहीतरी बोलायचं होतं. पण त्याच्याकडे मुळीच लक्ष न देताच ओर्दिनोफ पुढे निघून गेला.

जिन्यात एका बुटक्याशा माणसाशी त्याची ज्वळजवळ टक्करच झाली. करड्या कपड्यांतला हा माणूस मूरीनच्याच खोलीतून खालमानेने बाहेर पडत होता.

' माफ करा हं ! ' तो लहानखुरा माणूस भिंतीवर आदळून रबरासारखा परत फिरत ओरडला, ' माफ करा मला ! '

' आपणाला लागलं तर नाही ना ? '

' नाही. मुळीच नाही. पण चौकशीबद्दल आभारी आहे मी आपला ! अरे देवा ! ' आणि ठेंगणा माणूस धडपडत, धापा टाकीत जिना उतरून

निघून गेला.

ओर्दिनोफशी धडक झालेला हा माणूस त्या घराचा मालकच होता. ह्याच माणसाशीच बाहेरच्या आवारांत त्याआधी तो तार्तर नोकर अगदी आदराने वागला होता. मालक निघून गेल्यावरच ओर्दिनोफला आता हे आठवलं. खरे तर मूरीनकडे राहायला आल्यावरही एकदा मालकाशी आपली भेट झाल्याचं ओर्दिनोफला आठवत होतं. त्यामुळेच तो स्वतःवरच चिडला. अस्वस्थही झाला. आपली कल्पना-विचारशक्ती आता अगदी तुटण्याइतकी ताणली गेलीय हेही त्याला जाणवलं म्हणूनच आता थोडी विश्रांती घ्यायचं त्याने ठरवलं. हळूहळू ओर्दिनोफच्या डोळ्यांवर झापड आली. त्याचे अंग जड झाले. त्याचं रांगडं अंतःकरण जणू अश्रूंनी न्हाऊन निघाले होते.

ओर्दिनोफच्या अपरोक्ष आधीच कुणीतरी त्याचे अंथरूण घालून ठेवले होते. त्याने त्यावर अंग टाकले. त्याचे कान काहीतरी ऐकायला जणू सज्ज झाले होते! दोन व्यक्तींच्या श्वासोच्छ्वासांचे आवाज ओर्दिनोफला ऐकायला येऊ लागले. त्यातला एक आवाज खोल होता, आणि श्वासही अधून मधून आणि कष्टपूर्वक घेतला जात होता. दुसरा श्वास हलकाफुलका नि तसाच अनियमितपणे त्याच्या कानांवर येत होता. ह्या श्वासांतला उत्साहच जणू हरवून गेला होता. दोघांचीही हृदये जणू एकाच तीव्रतेने आणि आवेगाने धपापत होती. अधून मधून कपड्यांची सळसळ नि नाजूक पावलांची हळुवार हालचाल ओर्दिनोफला जाणवत होती. त्याच्या अंतरंगात एक मधुर पण दर्दभरा प्रतिसाद उमटवत होती. जरा वेळातच आधी हुंदके, काही उसासे मग प्रार्थनेचे शब्द त्याच्या कानावर आले. हात बांधून, खांदे उंचावून तिने ईश्वराच्या प्रतिमेपुढे गुडघे टेकले आहेत हेच दृश्य क्षणार्धात त्याच्या मनःचक्षुंपुढे तरळले. कोण असेल ती? कुणाकरता प्रार्थना करीत असेल? कुणाच्या अजिंक्य लालसेला तिचं अंतःकरण शरण गेलं असेल? तिचं अंतःकरण अश्रूंच्या न संपणाऱ्या कारंज्यासारखं का झालं असेल?'

आजवर तिच्याशी तो जे जे काही बोलला तेच शब्द संगीताच्या सुरांसारखे त्याच्या कानावर येऊ लागले, तिचा शब्दन् शब्द तो मोठ्या उत्कंठेने आठवू पहात होता. तोंडानं उच्चारतही होता. त्याचे हृदयही तितक्याच आवेगाने तिच्या प्रत्येक शब्दाला प्रतिसाद देत होते...ते स्वप्न तर नव्हते!

...दोघांमधल्या शेवटच्या भेटीचा तो प्रसंगही त्याच्या डोळ्यांपुढे उभा राहिला. त्याने पुन्हा एकदा कॅथरीनकडे डोळे भरून पाहिले. तिच्या उदास चेहऱ्यावरचे भाव वाचले. पुन्हा एकदा तिचे पुन्हा उष्ण निःश्वास आपल्या ओठांवर रेंगाळताना अनुभवले. आणि तिची ती चुंबने...

ओर्दिनोफने डोळे मिटून घेतले. एक हवीहवीशी वाटणारी गुंगी तो अनुभवीत होता. दूर कोठेतरी घड्याळाने ठोके दिले. उशीर झाला होता. रात्रही चढत चालली होती.

अर्ध्या-मुर्ध्या झोपेतच ती आपल्या अंगाला रेलून बसल्याचा ओर्दिनोफला भास झाला. अश्रूंनी विलक्षण चमकणाऱ्या नजरेने ती त्याला न्याहाळत होती. वसंत ऋतूत एखाद्या सुंदर दिवशी दिसणाऱ्या आकाशाच्या निळ्या-भोर घुमटासारखेच ते डोळे नितळ नि सौम्य दिसत होते. तिचा चेहराही अत्यानंदानं उजळला होता. हास्यही आणखी चमकदार झाले होते. एखाद्या लहान पोरीसारखी ती ओर्दिनोफच्या खांद्यावर रेलली. त्याच्याबद्दल वाटणारी तिची सगळी आसक्तीच जणू सारे बंध झुगारून आता मुक्त झाली होती. तोही आपल्या आनंदाला आवर घालू शकला नाही. तो आवेगाने चित्कारला. ती त्याच्या कानात कुजबुजत होती. मघापासून त्याच्या कानात गुणगुणणारे मधुर संगीत हेच होते तर ! तिच्या श्वासांनी गंधित झालेली गरम हवा त्याने आत आत ओढून घेतली. उत्तेजित होत हात पसरले, आणि डोळे उघडले.

हो. ती तीच होती तर. त्याच्या छातीवर रेलली होती ती. तिचे डोळेही अश्रूंनी ओलावले होते. भावनावेगाने ती थरथरत होती. आणि भीतीने पांढरी पडली होती. ती त्याच्याशी बोलत होती. आपल्या उघड्या हातांनी त्याला कुरवाळत होती. काहीतरी करण्याकरता त्याला विनवीतही होती. त्याने तिला मिठीत घेतले आणि जवळ ओढले. ती थरथरतच त्याच्या छातीवर विसावली.

: ४ :

'काय झालं? एवढी कशाची भीती वाटली तुला कॅथरीन?' ओर्दिनोफने विचारले. आता तो पुरता भानावर आला होता. तिला आवेगाने छातीवर ओढून घेत तो पुढे म्हणाला 'तुला दुःख तरी कोणतं आहे? सांगतेयस मला?'

त्यावर कॅथरीन हळूहळू हुंदके देतच राहिली. तिची नजर जमिनीवर स्थिरावली होती. पण चेहरा मात्र ओर्दिनोफच्या तरण्याबांड छातीवर विसावला होता. कॅथरीन निराशेनं पिळवटून निघाली होती. तिच्या तोंडून धड शब्दही फुटत नव्हता.

'मला नाहीं माहीत!' ती जरा वेळानं म्हणाली. 'मला नाही माहीत!' ती परत तेच म्हणाली. पण आता तिचा आवाज अगदी क्षीण झाला होता. 'मी तुझ्या खोलीत कशी काय येऊन पोहोचल्ये माझं मलाच कळलं नाही. छे. माझी बुद्धीच चालत नाहीयेय!'

बोलता बोलता ती ओर्दिनोफला बिलगली. कुठल्या तरी अनिरुद्ध ऊर्मीने झपाटल्यासारखी त्याच्या खांद्यावर, छातीवर, हातांवर ती भराभरा चुंबनं घेत राहिली. मग निराशेनं गळाठल्यासारखी तिने त्याच्या समोरच फरशीवर बसकण मारली. आपला चेहरा हातांनी झाकून घेतला आणि डोके गुडघ्यावर टेकले.

ओर्दिनोफ घाईने पुढे झाला. त्याला कॅथरीनला उठवून आपल्याजवळ बसवून घ्यायचे होते. आता तिचा चेहरा लाजेनं आरक्त झाला होता. तिने नजरेनेच खूण करून आपल्याकडे पाहू नकोस म्हणून ओर्दिनोफला विनविले. आता एक आर्त स्मित तिच्या ओठांवर झळकत होते. निराशेच्या नव्या झटक्याचीच ती पूर्वचिन्हे होती. पुन्हा एकदा तिच्या मनात भीती गोळा

झाली. आणि तिने अविश्वासाच्या भावनेने ओर्दिनोफकडे पाहिले. पण त्याची नजर टाळायलाच ती अधिक उत्सुक होती. त्याच्या प्रश्नांना तिने खाली मान घालून कुजबुजीच्या स्वरांतच उत्तरे दिली.

' तू एखादं भयंकर स्वप्न तर पाहात नव्हतीस ना ? ' ओर्दिनोफने तिला विचारलें, ' त्याने पुन्हा एकदा तुला घाबरवले तर नाही ना ? त्याला परत फीट तर आली नाही ? तो बेशुद्ध तर झाला नाही ? तू ऐकू नयेस असं काही तर मूरीन तुला सांगत नव्हता ना ? '

' नाही. मी काही स्वप्नात नव्हते ! ' कॅथरीन उत्तरली. कशीबशी ती आपली अस्वस्थता दाबून ठेवू शकली. ' खरं सांगायचं तर अद्याप मी झोपलेच नव्हते. अंथरुणावरही पडल्ये नव्हते. मूरीननंही मला काही सांगितलं नव्हतं. कारण तो तर कधीच झोपून गेलाय. मध्येच एकदा मला त्यानं हाक मारलीन् आणि मी त्याच्याकडे धावत गेले हे खरंच. पण तेव्हाही तो गाढ झोपेतच होता. मी त्याच्याशी बोलले पण काहीच प्रतिसाद मिळाला नाही. माझा आवाजही त्यानं ऐकला नाही. काल रात्री तर केवढी मोठी फीट आली होती त्याला. देवच त्याला मदत करो !... अं. माझ्या अंतःकरणातही केवढं दुःख दडलंय नव्हे ! हो ! आजपर्यंत मी त्याच्यासाठीच प्रार्थना करीत आले. खूप खूप दिवस झाले, मी प्रार्थना करतेय त्याच्यासाठी ! '

' कॅथरीन ! लाडके ! काल रात्रीसारखी आज घाबरली नाहीस ना तू !'

' नाही, आजची गोष्ट निराळी आहे ! '

' का ! असं काय वेगळं आहे आज ! '

' आहेच मुळी ! '

ती थरकापली, लहान मुलासारखी ओर्दिनोफला बिलगली.

ऐक तर.' तिच्या डोळ्यांतून आता अश्रू वहात नव्हते. तिथे मूरीनपाशी मला एकटीनं थांबायचं नव्हतं. अर्थात त्यालाही तसाच काहीं खास कारण होतं... पण तू मात्र आता उगाच दुसऱ्यांच्या दुःखांनी स्वतःच दुःखी होऊ नकोस. उगाच दुसऱ्यासाठी अश्रूही ढाळू नकोस. तुझे ते अश्रू तुझ्याच दुःखी दिवसांकरता राखून ठेव. उद्या जेव्हा तू एकटा असशील. जेव्हा दुःखावर फुंकर घालायलाही दुसरं कुणी असणार नाही तेव्हा— पण

काय रे... तुझीही कुणी प्रेयसी असेलच ना?'

'छे! छे! तूच तर माझी पहिली प्रेयसी!'

'मी? मला आपली प्रेयसी म्हणालास तू?'

तिच्या चेहऱ्यावर विलक्षण आश्चर्य डोकावत होते. ती पुढे काहीतरी बोलणारही होती पण तेवढ्यात तिने स्वतःला सावरून घेतले. तिची नजर खाली गेली. मग ती लाजेनं लालीलाल झाली. तिच्या पापण्यांखाली अश्रू गोळा झाले. त्या अश्रूंमुळे तिची नजर आणखीनच चमकायला लागली. तिने ओर्दिनोफकडे पाहिले. काहीसा मिश्किलपणा तर काहीसा अविश्वास एकाच वेळी तिच्या नजरेतून डोकावीत होता. मग पुन्हा एकदा तिची नजर जमिनीवरच स्थिरावली.

'मी काही तुझी पहिली प्रेयसी असणार नाही! मुळीच नाही!' ती अगदी विचारपूर्वक म्हणाली. स्मित हास्याने तिचे ओठ विलग झाले होते. 'मुळीच नाही!' ती पुन्हा एकदा निक्षून म्हणाली. आता मात्र ती अगदी मनमोकळे हसली.

'मी कधीच तुझी प्रेयसी होऊ शकणार नाही राजा!'

मग तिने नजर वर केली. तिच्या आनंदाच्या क्षणिक उमाळ्याचं आता निराशेत रूपांतर झाले होते. अस्वस्थतेने ती झपाटली गेली होती आणि त्यातून निराशही झाली होती. कॅथरीनची ती दारूण निराशा पाहून ओर्दिनोफच्या मनात तिच्याबद्दल अपार करुणा दाटून आली. एखाद्या अनामिक दुःखामुळे मनात जाग्या होणाऱ्या करुणेसारखीच ही कणवही अगदी अतर्क्य अनावश्यक होती. एका अव्यक्त वेदनेने भारलेल्या नजरेनं ओर्दिनोफने कॅथरीनकडे पाहिले.

'ऐक माझं आता!' त्याचे हात हातात घेत कॅथरीन म्हणाली. तिने कसेबसे आपले हुंदके आवरले होते. 'मी काय म्हणत्येय ते ऐक राजा! अगदी लक्षपूर्वक ऐक. तुझ्या मनावर तू ताबा ठेवायला हवास. तुझी इच्छाच असेल ना, तर खुशाल प्रेम कर माझ्यावर. पण ते नेहमीचं प्रेम नको. असं जरी केलंस तरच पुष्कळशा संकटांतून तू स्वतःला वाचवू शकशील. आणि दुसऱ्या कुणाच्या भयंकर शत्रूत्वापासून स्वतःला दूर ठेवू शकशील. शिवाय प्रेयसीऐवजी तुला एक बहीणही मिळू शकेल. तुझी इच्छाच असेल तर मी

नेहमी तुला भेटत जाईनही. तुझ्यावर प्रेम करीन. तुझा परिचय असल्या-बद्दल तर मला कधीच पश्चात्ताप व्हायचा नाही. आलं ना लक्षात? तू आजारी होतास ते दोन्ही दिवस मी क्षणभरही तुझ्या जवळून हलल्ये नाही. तेव्हा एक बहीण म्हणून तू माझा स्वीकार कर. उगाचच काही मी तुला आपला भाऊ म्हणत नाहीयेय! उगाचच काय मी मेरीकडे तुझ्यासाठी अश्रू ढाळत विनवण्या करत नव्हते! अरे, माझ्यासारखी बहीण तुला शोधूनही सापडायची नाही! प्रियतमा म्हणे! वाऽरे! एखाद्या प्रियेसाठी तुझा आत्मा तळमळतोय तर? तर मग मी सांगते तुला सारं जग पालथं घातलंस ना तरी माझ्यासारखी प्रेयसी भेटायची नाही तुला! मी आत्ता करत्येय, ना तसंच प्रेम मी अखेरपर्यंत तुझ्यावर करत राहीन! तुझं मन अगदी साफ आहे, निर्मळही आहे. म्हणू-नच तर मी तुझ्यावर प्रेम करीत राहीन. ज्याक्षणी मी तुला प्रथम पाहिलं ना, त्या क्षणी मला एक गोष्ट कळून चुकली की, एक ना एक दिवस तू ह्या घरात येणार आहेस. नि हवाहवासा वाटणारा पाहुणा म्हणून मुक्काम करणार आहेस. हे बघ, म्हणून तर पहिल्यांदा आलास ना तेव्हा मी तुला घरात घेतलं. जेव्हा जेव्हा तू माझ्या डोळ्यांत पहातोस तेव्हा तेव्हा तुझे ते डोळे मला माझ्यावरच्या प्रेमानेच भारलेले दिसतात. त्यामुळेच तर तू मला नेहमीच आवडत राहशील. तुझ्या त्या डोळ्यांतून तुझ्या मनांतले भावच जणू बोलत असतात. तुझे डोळे स्वतः बोलत नसले तरी तुझ्याकडे पाहिल्याबरोबर तुझ्या मनातलं सारं काही मला कळून चुकतं. म्हणून तर तुझ्या प्रेमाच्या बदल्यांत माझं सारं जीवन मी तुला देईन. जन्मभर मी तुझी गुलाम होऊन राहीन. कारण आपल्या भावनांची कदर करणाऱ्या पुरुषाचं गुलाम होऊन राहणंही किती छान् असतं नाही? अरेरे! पण माझं आयुष्य तरी आता माझं स्वतःच कुठे राहिलंय! मला आवडतं ते स्वातंत्र्यही माझ्यापासनं दूर पळालंय. तेव्हा तुझी बहीण म्हणून माझा स्वीकार कर. एक भाऊ म्हणून माझ्याशी वाग. जेव्हा नव्या आपत्ती येतील, नवी दुखणी येतील तेव्हा तेव्हा माझी आठवण ठेव. मला हाक मार. कसलीही खंत न बाळगता, आत्तासारखीच, मी तुझ्या भेटीला येईन. तुझ्याबरोबर रात्रीच्या रात्री घालवीन. हे सारं तू माझ्या शक्तीवरच सोपव...ऐकतोयस ना? आता तरी एखाद्या भावाप्रमाणे तू माझ्याशी मन मोकळं करशील ना? आत्ता मी जे काही सांगत्येय ते तू लक्षात

घेणारेयस ना ?'

कॅथरीन बोलायची थांबली. तिने शांतपणे एकदा ओर्दिनोफकडे पाहिले. मग थकून ती त्याच्या छातीवर रेलली. तिच्या शब्दांऐवजी एक दर्दभरा हुंदका ओर्दिनोफला ऐकायला मिळाला. तिची छाती जोरजोरांत धपापत होती. उरोज आवेगाने वर खाली होत होते. पण चेहऱ्यावर मात्र संध्याकाळी आकाशात चमचमणाऱ्या ताऱ्यांचे तेज होते.

'लाडके !' ओर्दिनोफ कुजबुजला. त्याची दृष्टी पार धूसर झाली होती. श्वास कोंडला होता. 'माझ्या लाडके !' आपले हे सुखही धुरासारखेच विरून जाईल ह्या कल्पनेनेच तो भयंकर धास्तावला होता. त्यामुळे बोलावं काय हेही त्याला सुचत नव्हते. त्या आभासाच्या हातचं तो जणू एक खेळणंच झाला होता. अवती भोवतीची प्रत्येक गोष्टच जणू त्याच्या नजरेपुढे नाचत होती.

'माझ्या राणी !' जरा वेळाने तो म्हणाला.' मी तुला समजूच शकत नाही. आत्ता तू जे काय बोललीस तेवढेच काय ते लक्षात आहे माझ्या. बाकी डोक्यात एकच गोंधळ उडालाय. आणि माझं मनही दुःखी झालंय.'

पुन्हा एकदा ओर्दिनोफचा गळा भरून आला. कॅथरीन त्याच्या कुशीत सरकली. तसा तो उठला. गुडघे टेकून बसला. त्याच्या छातीत हुंदके दाटून आले होते. अंतःकरणाच्या तळातून येणारा त्याचा आवाज गूढ आनंदाच्या नि सुखाच्या जाणिवेनं व्हायोलीनच्या तारांसारखा झंकारत होता. 'लाडके, तू आहेस तरी कोण ?' प्रयत्नपूर्वक हुंदके आवरत ओर्दिनोफने विचारले. 'कोणत्या स्वर्गलोकातून तू माझ्या मनात अवतरलीयस ? अर्थात तो स्वप्नांचाच स्वर्ग असणार ! कारण तू हाडामांसाची कुणी व्यक्ती आहेस यावर कधी कधी माझा विश्वासच बसत नाही... आता अडवू नकोस मला. बोलू देत मला. मनातलं सारं काही तुला सांगूदेत. गेले कितीतरी दिवस तुला काही विचारायचं माझ्या मनात आहे.– प्रियतमे, तू आहेस तरी कोण ? कोण आहेस तू ? माझ्या हृदयापर्यंत येऊन पोहोचणारा हा मार्ग तुला सापडला तरी कसा ? किती दिवसांपासून तू माझी बहीण आहेस ? तुझा सारा पूर्वेतिहास मला सांग. तुझं ह्या आधीचं आयुष्य कसं होतं ? तुझं गाव कुठलं ? आयुष्यात सर्वप्रथम तू कुणावर प्रेम केलंस ?

तुझ्या सुखदुःखाबद्दल सारं काही तू मला सांग. स्वच्छ निळ्याभोर आकाशाखालच्या उबदार ग्रामीण वातावरणात तू वाढलीस? आयुष्यात सर्वप्रथम कोणावर आपलं प्रेम तू उधळलंस? माझ्या आधीचा तुझा कोण प्रियकर होता? तुला आई आहे का? आईनं लहानपणी तुझं कोडकौतुक केलं का? तुला कुरवाळलं का? की माझ्यासारखीच तूही एखाद्या उठलेल्या वास्तूतच जन्माला आलीस? तुझं पूर्वीचं जीवन आजच्यासारखंच होतं? भवितव्याबद्दल तुझ्या मनात कोणत्या आशा–आकांक्षा होत्या? त्याकाळी कोणती सोनेरी स्वप्नं तू पाहिली होतीस? त्यातल्या कोणत्या आशा-अपेक्षांची परिपूर्ती झाली? किती बाबतीत निराशाच काय ती तुझ्या वाट्याला आली? सारं काही सांगून टाक. तुझं तारुण्यानं मुसमुसणारं मन प्रथम कुणासाठी झुरलं होतं? आपलं अंतःकरण सर्वात प्रथम तू कुणाला अर्पण केलंस? आता तेच हृदय जिंकण्यासाठी, आपलंसं करण्यासाठी मी तुला काय देऊ करावं? माझ्या छोट्या प्रिये, माझ्या डोळ्यातलं तेजच आहेस जणू तू! माझ्या प्रियतम भगिनी, मी तुझ्याजवळ कसा येऊ शकेन? तुझ्या प्रेमाला स्पर्श कसा करू शकेन? अगदी लौकरात लौकर तू मला सांग पाहू.

पुन्हा एकदा ओर्दिनोफचा आवाज दाटून आला. पुढचा शब्द फुटेनासा झाला. त्याने निराशेने मान झटकली. नजर वर करून तिच्याकडे पाहिले मात्र... भीतीने त्याचे रक्तच गोठून गेले. डोक्यावरचे केस उभे राहिले.

कॅथरीनचा चेहरा पांढरा फटक पडला होता. ती निश्चल पडून होती. तिचे ओठही प्रेतासारखे काळे-निळे पडले होते. नजर स्थिर होती. डोळ्यांतले तेजही मंदावले होते. पण हळूहळू ती उठली. एक दोन पावलं चाललीही. आणि एक भेदक किंकाळी फोडत मूर्तीपुढे कोसळली. मग काही असंबद्ध शब्द तिच्या ओठांतून निसटले आणि ती मूर्च्छित झाली. ओर्दिनोफ क्षणभर गांगरून गेला. मग त्याने तिला उचलले नि स्वतःच्या अंथरुणावर नेऊन ठेवले. गोंधळल्यासारखा तो तिच्याजवळ बसून राहिला. क्षणभरांतच तिने पुन्हा डोळे उघडले. मान किंचित वर करत भोवताली निरखून पाहिले. मग ओर्दिनोफचा हात धरून त्याला आपल्या अंगावर ओढले. तिने बोलायचा प्रयत्न करून पाहिला. तिचा गळा दाटून आला होता. शब्द हुंदक्यांमध्ये विरून गेले होते. तिचे उष्ण अश्रू ओर्दिनोफच्या हातांवर चटका देत ओघळले.

‘ किती भयंकर आहे हे सारं ! ’ किती दुःखाने कण्हत कण्हत म्हणाली. मला तर वाटतंय आता लौकरच मी मरणारेय ! ’

तिच्या तोंडाला कोरड पडली होती. त्यामुळे ती पुढे काही बोलूच शकली नाही. हताश होऊन तिने ओर्दिनोफकडे फक्त पाहिले. पण तोही तिला समजून घेऊ शकला नाही.

‘ भूतबाधा झालीय मला. झपाटलेय मी ! ’ ती म्हणाली.

ओर्दिनोफ ताठ बसला. त्यानं अगदी कुतूहलानं तिच्याकडे पाहिलं. तेवढ्यात एक भयंकर विचार त्याच्या मनात आला. आणि लगोलग त्या विचाराचं प्रतिबिंब त्याच्या चेहऱ्यावर उमटलं देखील.

‘ होय. भूत लागलंय मला ! भूत ! त्या दुष्टानं माझ्यावर करणी केलीय. होय ! त्याच माणसानं माझ्या आयुष्याचं मातेरं केलंय. माझं जीवन उद्ध्वस्त करून टाकलंय. माझा आत्माच जणू मी त्याला विकून बसल्येय. माझ्या आईची तू मला का आठवण करून दिलीस ? येथे येऊन का मला अशा यातना देतोयस ? का माझा छळ करतोयस ? परमेश्वरच तुझ्या ह्या कृत्याचा निवाडा करून तुला क्षमा करो ! ’

मग ती परत रडायला लागली. नंतर हळूहळूच पण काहीशा गूढ आवाजात ती पुढे बोलायला लागली. “ तो नेहमी म्हणतो ‘ मी मेल्यावर पिशाच्च होऊन परत येईन. आणि तुझ्या पापी अंतःकरणावर हक्क सांगीन ! ’ मी त्याची आहे. म्हणजे त्यानंच माझ्या मनावर कब्जा केलाय. तो आपली पुस्तकंही मला वाचून दाखवीत असतो. त्याचं ते एक खास पुस्तक आहे बघ ! मी भयंकर पाप केलंय असही तो म्हणतो. तू स्वतःच बघ ना ते पुस्तक.”

तिने एक पुस्तक ओर्दिनोफपुढे धरले. त्या आधी त्याला तिच्याजवळ ते दिसलेच नव्हते. त्याने अगदी यांत्रिकपणे पुस्तक घेतले आणि उघडले. रास्कोलन्कीच्या धार्मिक पुस्तकांसारखंच ते दिसत होतं. पण तो पुस्तक धड पहाण्याच्या मनःस्थितीतच नव्हता. त्याने ते नुसते जमिनीवर पडू दिले. आणि कॅथरीनला मिठीत घेत तिला शांत करायचा प्रयत्न करू लागला.

‘ ये. ये ना अशी जवळ ! ’ ओर्दिनोफ तिला म्हणाला. ‘ फार घाबरलीयस तू. पण मी आहे ना हा तुझ्याजवळ. माझ्या लाडके, मुळीच भिऊ नकोस. शांतपणे जरा विश्रांती घे ! ’

'अंहं. तुला नाही समजायचं ते !' ओर्दिनोफच्या हातात आपले दोन्ही हात गुंफत ती म्हणाली. 'मी नेहमी अशीच तर असते. अशी म्हणजे जरा घाबरलेली. पण अशा वेळी बहुधा मी मूरीनकडे जाते. त्याचाच आधार शोधते. मला धीर देण्यासाठी म्हणून मग तो कुठला तरी एक मंत्र म्हणतो. नाही तर ह्या पुस्तकातलाच काही भाग वाचून दाखवतो. त्याच्याजवळच्या सर्व पुस्तकांत हेच सर्वांत मोठं आहे. त्यातला मजकूरही उदासवाणा असतो, भीतिदायकही असतो. कित्येकदा तो काय वाचतोय हेही मला कळत नसतं. अन् त्याचा अर्थही उमगत नसतो. पण माझ्या मनातली भीती मात्र द्विगुणित होते. अशा वेळी तो नव्हे तर त्याच्या तोंडून कोणी दुष्टात्माच बोलतोय असा मला भास होतो. अशा दुष्टात्म्याकडे दयेची आराधना करणंही व्यर्थ असतं. कारण तो मुळी मन वळवण्यापलीकडचा असतो. मग मात्र माझ्या मनावर प्रचंड दडपण येते. त्याखाली माझं मन चिरडून जातं. आणि कधीही न अनुभवलेल्या वेदनांनी मी पिळवटून निघते !'

'तसंच असेल ना तर आता त्याच्याकडे मुळीच परत जाऊ नकोस तू, कॅथरीन. आणि तू जावंस तरी का ?'

'हं. तुझ्या ह्या प्रश्नाचं उत्तर मात्र मी देऊ शकेन. मी आता तुला भेटायला का आल्येय ? मी तुझ्याकडे आलेय एवढंच मी जाणते. पण का ते मला ठाऊक नाही. तो मला म्हणत असतो, 'प्रार्थना कर ! प्रार्थना कर !' मग भर रात्री मी जागी होते. तासन्‌तास प्रार्थना करीत बसते. कित्येकदा तर झोपेअभावी माझी अर्धमेल्यासारखीही अवस्था होते. भीतीनं मग नीट झोपही लागत नाही. अशावेळी मला नष्ट करण्यासाठी जणू माझ्याभोवती वादळवारे घोंघावू लागतात. कुठलं तरी अज्ञात संकट माझा जीव घ्यायची धमकी द्यायला लागतं. जणू काही दुष्ट लोक मिळून मला ठार करायचा कटच करीत असतात. आणि संत, देवदूत माझं रक्षण करायचं नाकारतात. मग मी माझ्या प्रार्थनेचा आधार घेते. प्रार्थना ! माझी कधीही न संपणारी प्रार्थना ! अखेरीस मॅडोनाच्या मूर्तीच्या चेहऱ्यावरही करुणा दाटून येते. तशी मी अंथरूणाकडे परत जाते आणि जवळ जवळ मेल्यासारखीच पडून रहाते. काही वेळा मूर्ती-पुढे गुडघे टेकून प्रार्थना करता करताच मी फरशीवर झोपून जाते. आणि दुसरं तिसरं कुणी नव्हे तर मूरीनच सर्वांत आधी येऊन मला हाका मारतो.

उठवतो. थोपटतो आणि धीरही देतो. मग मला जरा बरं वाटतं. हो. खरंय ते. त्याच्या सान्निध्यात माझ्या मनाला पुन्हा एकदा उभारी येते. वाईटाची भीती वाटेनाशी होते. मूरीनमध्ये हीच कसली तरी शक्ती आहे बघ. तिलाच तो दैवी देणगी म्हणतो ! '

' पण कुठल्या दुष्ट शक्तीची तुला भीती वाटते कॅथरीन ? कोणत्या प्रकारची शक्ती आहे ती ? '

ह्या प्रश्नानं कॅथरीनचा चेहरा पांढरा-फटक पडला. तिने ओर्दिनोफकडे पाहिलं. पण मृत्यूची शिक्षा झालेल्या आणि तीही पुढे ढकलली जायची आशा नसलेल्या स्त्रीच्या नजरेने तिने ओर्दिनोफकडे पाहिले.

' कोणत्या दुष्ट शक्तीची मला भीती वाटते म्हणतोस ? ' तिने त्याच्याच प्रश्नाचा पुनरुच्चार केला. ' मी एक तिरस्कृत स्त्री आहे हेही ठाऊक नाही तुला ? एका स्त्रीचा मी जीव घेतलाय. माझ्या आईचेच शिव्या-शाप माझ्या वाट्याला आलेयत. कारण तिच्या मृत्यूलाही मीच कारण झालेय. हेही ठाऊक नाही तुला ? '

ओर्दिनोफने तिला हळूवारपणे कवटाळले. आवेगाने थरथरतच ती त्याच्या कुशीत शिरली. ' हो. मीच तिच्या मृत्यूला कारण झाले ! नुसत्या आठवणींनी ती थरकापली. अर्थात त्या भूतकाळावर आता तिचा काहीच इलाज चालणार नव्हता ! ' खूप दिवस झाले. मनातलं हे सारं सांगायचं होतं कुणाला तरी ! पण ते सांगायलाही नेहमीच प्रतिबंध केला गेला मला. मूरीनने ह्या विषयावर मला माझं तोंडच कधी उघडू दिलं नाही. उलट त्याच्या संतापाच्या झटक्यांनी मी मात्र नेहमीच नव्यानं दुःखी होत गेले. मूरीन माझा एक न नमणारा शत्रू आहे ! माझा मारेकरी आहे तो ! रात्रीच्या वेळी मात्र, आजच्या सारख्याच साऱ्या आठवणी माझ्या मनात गोळा होतात. माझं आता जरा ऐक तर— ऐकच. आता मी तुला जे काही सांगणारेय ना... ते अगदी खूप खूप दिवसांपूर्वी घडलंय. तरी मला मात्र ते अगदी काल-परवा घडल्यासारखं वाटत असतं. अगदी कालच्या स्वप्ना-सारखा माझा पिच्छा पुरवत असतं. पण ते सारं घडलं कधी ते मात्र मला नेमकं सांगता यायचं नाही... मला जवळ घे ! अगदी तुझ्याजवळ घे ! माझ्या दुर्दैवाबद्दल मला तुला सर्व काही सांगू देत. ह्या दुर्दैवांपासून, आपल्या

आईचे शिव्याशाप घेतलेल्या माझी तू सुटका करू शकलास तर माझं सारं जीवनच मी तुला देईन.'

ओर्दिनोफने तिला थांबवायचा प्रयत्न केला. पण तिनं त्याच्या प्रेमाची शपथ घातली आणि तसे न करायला त्याला विनविले. मग अधिकच उत्साहाने तिने आपली कर्मकथा सांगायला सुरुवात केली. ती एक असंबद्ध कहाणी होती. वादळात सापडलेल्या जीवाची भयावह भरकट होती. ओर्दिनोफचं अवघं आयुष्य, त्याची सुखं-दुःखं आता तिच्या आयुष्यात, सुखदुःखांत घट्ट गुंफली गेली होती. त्यामुळेच की काय ती असंबद्ध जीवनकथाही त्याला ऐकण्याजोगी नि अगदी सुस्पष्ट वाटली. तिने उच्चारलेल्या प्रत्येक शब्दातून त्याला त्याच्याच एकेकाळच्या शत्रूचे, त्या म्हाताऱ्याचे, दर्शन होत गेले. बालपणी हाच म्हातारा जणू त्याला स्वप्नातच भिववीत असे. आणि आता पुन्हा ह्या सीध्या साध्या तरुणीच्या आडून तोच त्याला परत एकदा खिजवत होता. तिचे पावित्र्य तो दुष्टाव्याने डागाळीत होता.

'आजच्यासारख्याच एका रात्री ती घटना घडली.' तिने सांगायला सुरुवात केली.' जंगलातून वारे घोंघावत होते. वाऱ्याचं असं हिंस्र घोंघावणं त्या आधी मी कधीच ऐकलं नव्हतं. किंवा ती रात्र माझ्या विनाशाचीच ठरणार असल्याने ते वारे मला हिंस्र वाटत नसतील ना? अगदी आमच्या खिडकीखालीच त्या राक्षसी वाऱ्यांनी एक भव्य ओक वृक्ष उन्मळून टाकला. हा ओक वृक्ष आपल्या बालपणीदेखील इतकाच उंच नि सुंदर असल्याची आठवण एक म्हातारा भिकारीही सांगत असे. त्या रात्री... मला तर अगदी कालपरवासारखी ती रात्र आजदेखील अगदी स्पष्ट आठवतेय. नदीवर वाहतूक करणाऱ्या माझ्या बाबांच्या बोटी त्या वादळात फुटून बुडाल्या. ते तेव्हा आजारीच होते. पण काही कोळी लोक ही बातमी सांगायला, आले तसे ते नुकसानीचा अंदाज घ्यायला, फॅक्टरीकडे धावत निघून गेले. घरात आम्ही दोघीच राहिलो. आई आणि मी. मी झोपले होते आणि आई ढसाढसा रडत होती... तीही आजारीच होती. तिनं मला उठवलंन् आणि आपलं कफनवस्त्र तयार करायला सांगितलंन, तेव्हा तिचा चेहरा मात्र भीतीने पांढराफटक पडला होता... आणि अचानक दारावर थाप पडली. मी तर अंथरुणातच दडी मारली. आईनंही एक किंकाळी फोडली. मी घाबरून

आईकडे पाहिलं, आणि जाऊन कंदील उचलला. कुंपणाचं फाटक उघडायला मी बाहेर गेले... तोच होता तो!... तोच आला होता!... त्याला पाहताच माझ्या मनातली भीती दुणावली. नेहमीच, मला आठवतंय त्याप्रमाणे अगदी नेहमीच, मला त्याची भीती वाटत आली. तेव्हा त्याचे केस पिकले नव्हते. दाढीही कोळशासारखी काळी कुळकुळीत होती. आणि डोळे म्हणजे पेटते निखारे होते. किती तरी वेळा त्यानं त्याच डोळ्यांनी माझ्याकडे पसंतीचे कटाक्ष टाकले होते.'

"आई घरात आहे तुझी? त्यानं मला विचारलं."

"बाबा घरात नाहीयेत माझे!" फाटक लावून घेत मी उत्तरले.

"ते माहितेय मला!"

आणि तो गरकन वळला. विचित्र नजरेनं त्यानं माझ्याकडे पाहिलं. आयुष्यात प्रथमच त्याने माझ्याकडे अशा नजरेनं पाहिलं असेल. मी घरात जायला निघाले तर तो जाग्यावरच थांबून राहिला.

"आत का येत नाहीयेस तू! मी त्याला विचारलं."

"नाही, एक वेगळाच विचार मनात आला म्हणून जरा—"

मग पुन्हा त्यानं विचार बदलला. आणि तो घरात आला.

"मघाशी मी तुला आई घरात आहे का ते विचारलं होतं. तर तू वडील घरात नाहीत असं का म्हणालीस?"

मी गप्प राहिले. आई हताश होऊन त्याच्याजवळ गेली. पण त्यानं तिची दखलही घेतली नाही. मला ते दिसत होते. पण वीसेक मैल वादळ, वारं अंगावर घेत तो आला होता. चिंब भिजला होता. थंडीनं काकडलाही होता. तो राहतो कुठे, आला कुठून हे मलाच काय पण माझ्या आईलाही ठाऊक नव्हते. नऊ आठवड्यांनंतर आम्ही त्याला पुन्हा पाहत होतो. त्याने डोक्यावरची टोपी उतरवली. हात मोजेही काढले. पण नेहमीप्रमाणे ईश्वराच्या मूर्तीपुढे प्रार्थना काही केली नाही की आम्हा दोघींना अभिवादन केले नाही. तो शेगडीपुढच्या खुर्चीत जाऊन बसला.'

या क्षण ला ओर्दिनोफने कॅथरीनचा हात तिच्याच डोळ्यांपुढे धरला. जणू कुठलं तरी दुःखद स्मृतिस्वप्न पाहण्यापासून तो तिला परावृत्त करू पाहत ता. मग तिने पुन्हा एकदा नजर वर केली. आणि ती आपली हकीगत पुढे

सांगायला लागली,

"तो तार्तर बोलीतच आईशी बोलायला लागला. ती भाषा मला समजत नाही. तो आमच्याकडे आला की अगदी नियम असावा तसं मला त्या खोलीतून बाहेर पाठवीत असत. पण त्या रात्री आईनं अवाक्षरही उच्चारलं नाही. की आपल्या मुलीला बाहेर जा म्हणून सांगायलाही ती धजावली नाही. आणि मी तर आधीच दुष्ट शक्तींच्या ताब्यात गेलेली ! माझ्या आईच्या यातनांतूनच मी एक भयंकर आनंद मिळवू पाहत होते ! ती दोघं माझ्याकडेच पाहतायत, माझ्याबद्दलच बोलतायत. आणि आई रडत्येय हेही मला दिसत होतं, समजत होतं. आणि अचानक त्याने चाकू बाहेर काढला. आईला धमकावण्याची त्याची ही काही पहिलीच वेळ नव्हती. पण क्षणार्धात मी उठल्ये आणि सरळ त्याच्या कंबरेच्या पट्ट्याला लोंबकळले. त्याच्याकडून चाकू हिसकावून घ्यायचाही मी प्रयत्न केला. त्याने दात-ओठ खात, माझ्या छातीवर गुद्दे मारून प्रतिकार केला. पण माझ्या शरीराच्या बोज्यापासून तो काही आपली सुटका करून घेऊ शकला नाही. मला तर वाटलं आता आपली घटकाच भरत आली. त्याच्या मारानं मला ग्लानी आली. मी हळूहळू जमिनीवर कोसळले. तरीही मला जराही रडू आलं नव्हतं. त्यानं आपल्या हातातला चाकू माझ्यापुढे धरला. आणि आपली छाती उघडी करीत म्हणाला, 'मी तुझा अपराधी आहे. चालव माझ्यावर चाकू ! मी तुला कसलाही प्रतिकार करणार नाही. घे हा चाकू हातात !' मी तो चाकू उचलला आणि भिरकावून दिला. चाकू फेकताना माझी नजर जमिनीकडेच असली तरीही माझ्या चेहऱ्यावर मात्र स्मित झळकत होतं. आईचा चेहरा मात्र उतरला होता. मी काहीसं आगाऊपणाने तिच्याकडे पाहिलं तेव्हाही माझ्या ओठांत ते उद्दाम हास्य दडलं होतं. तिचा चेहरा मात्र मेल्यासारखा पांढरा फटक पडला होता."

कॅथरीनचे हे काहीसे असंबद्ध बोलणेही ओर्दिनोफने अगदी मनापासनं ऐकले. त्या आठवणीतही एक जिवंतपणा होता. त्यामुळेच तिचेही मन हळूहळू शांत होत गेलं. तिची एकेकाळची संकटे आता समुद्राच्या लाटेसारखी येत होती आणि तिची दुःखंही गिळून टाकीत होती.

'त्यानं पुन्हा एकदा टोपी डोक्यावर चढवली. अभिवादन मात्र केलं

नाही. आईनं पुढे होऊन दिवा दाखवायच्या आतच मी कंदील उचलला. आई एवढी आजारी होती तरीही ती त्याला दिवा दाखवायला पुढे झालीच असती ! एक शब्दही न उच्चारता आम्ही बाहेरच्या फाटकापर्यंत आलो. मी कुत्र्यांना पिटाळतच फाटक उघडलं. तेवढ्यांत त्यानं टोपी काढून हातांत घेतली नि मला वाकून अभिवादन केलं. मग त्यानं खिशात हात घालून लाल चामड्याची लहानशी पेटी बाहेर काढली. आणि उघडून माझ्यासमोर धरली. चमचमत्या हिऱ्यांनी भरली होती ती ! तो म्हणाला, ' शहरांत माझी आणखी एक प्रेयसी आहे. खरं तर तिलाच भेट द्यायला आणले होते मी हे हिरे. पण माझ्या देखण्या प्रिये, आता हे सारे तुझेच झाले आहेत ! हवं तर ह्या हिऱ्यांनी तुझं सुंदर शरीर तू सजव नाही तर खुशाल पायदळी तुडवून टाक ते ! तुला हवं ते तू करू शकतेस ! मी ते हिरे काही पायांखाली तुडवले नाहीत. उलट त्यांचा स्वीकारच केला. कारण त्याचा अपमान करण्याचं माझ्या मनातही नव्हतं. केवळ फुशारकी म्हणून ते हिरे मी हातात घेतले होते. मनाशी काही-तरी ठरवूनच मी बैठकीच्या खोलीत गेले आणि ते हिरे आईसमोर, टेबलावर ठेवले. क्षणभर ती काहीच बोलली नाही. कदाचित काय बोलावं अशा संभ्र-मात ती पडली असेल. तिचा चेहरा मात्र आणखीनच उतरला. ती म्हणाली,

' कात्या, काय आणलंयस हे ? '

' तुझ्यासाठी हिरे आणलेयत बघ ! त्या व्यापाऱ्यानं आणलेयत येवढंच माहिती आहे मला त्याबद्दल ! '

" आईच्या डोळ्यांतून अश्रू पाझरत होते. तिला धापही लागली होती. ' कात्या, मूर्ख मुली, माझ्यासाठी नाहीत ते हिरे ! '

' केवढा कडवटपणा होता तिच्या त्या शब्दांत ! तिचा अंतरात्माच जणू रुदन करीत असावा. मी तिच्याकडे पाहिलं. तिच्या पायांवर लोळण घ्यावी असंच मला क्षणभर वाटलं. पण दुसऱ्याच क्षणी दुष्ट शक्तीनं पुन्हा माझ्या मनाचा ताबा घेतला. '

" ठीक आहे." मी म्हणाल्ये ' जर हे हिरे तुझ्यासाठी नसतील तर ते माझ्या वडिलांसाठीही असू शकतील. बाबा परत आले की मी ही पेटी त्यांच्या स्वाधीन करून त्यांना सांगेन काही व्यापारी इथे येऊन गेले. त्या ह्या चीज़वस्तू मागे राहिल्या आहेत. '

" आई बिचारी रडत होती. ' ते कोण व्यापारी आले होते ते मीच त्यांन सांगीन बरं ! अग दुष्ट पोरी, तुझा खराखुरा बाप कोण हे देखील मी उघड करीन बरं ! तू माझी मुलगीच नव्हेस ! साप आहेस तू साप ! शापित आहेस तू शापित ! ' "

" मी गप्प बसले. माझ्या डोळ्यांतून चार अश्रूही येईनात. जणू माझ्यातलं सारं चैतन्यच नष्ट झालं होतं. मी खोलीत परत गेले. आणि सकाळपर्यंत वादळाचे आवाज ऐकत बसले. माझ्या मनातही एक भयंकर वादळ घोंघावत होतं."

" आणखी पाच दिवस गेले. पाचव्या दिवशी संध्याकाळी वडील परत आले. ते खिन्न वाटत होते, आणि चिडलेलेही. प्रवासातच आपण आजारी पडल्याचं त्यांनी सांगितलं. पण हाताच्या बँडेजवरून त्यांना कोणी तरी जुना शत्रू भेटल्याचंच स्पष्ट होत होतं. त्यांचा आजार कोणता असावा ? नेमका कोणता शत्रू त्यांना भेटला असावा ? मी तर्क लढविले. आणि हो, मला सारं काही उमगलं ! वडील एका शब्दानेही आईशी काही बोलले नाहीत. की मी कुठेय तेही त्यांनी विचारलं नाही. त्यांनी फक्त आपल्या कामगारांना बोलावलं आणि काम बंद करून घराचं रक्षण करायला सांगितलं. ही चिन्हंही काही बरी नव्हती. रात्र पडेपर्यंत आम्ही नुसते वाट पहात राहिलो. आणि तीही एक भयंकर वादळी रात्र होती. माझं म्हणशील तर मी खोलीतली खिडकी उघडली आणि तिथेच रडत बसले. माझ्या अंतरंगालाच जणू आग लागली होती..."

" जगाच्या अगदी दूर टोकाला जिथे सूर्यप्रकाश नि वादळं जन्माला येतात, तिथेच पळून जावंसं वाटत होतं. माझी कुंवार छाती प्रक्षुब्ध होऊन धपापत होती. मी डुलक्या काढत असणार आणि विचार करता करता भलतीकडेच भरकटत गेले असणार ! रात्री उशिरा, खिडकीबाहेर टकटक ऐकू आली. कुणी तरी म्हणत होतं खिडकी उघड, खिडकी उघड !"

" मी बाहेर बघितलं तर एक माणूस दोरीच्या सहाय्याने खिडकीकडे चढून येत होता. ह्या अनपेक्षित पाहुण्याला मी तात्काळ ओळखलं. खिडकी उघडून मी त्याला आत घेतलं. टोपी न काढताच तो खुर्चीत कोसळला. पाठलाग करणाऱ्यांना चुकवीत तो पळत आला होता. आणि पळाल्यामुळे

धापा टाकीत होता. मी दूर झाले. का कोण जाणे पण माझाही चेहरा उतरला.

"'तुझे वडील घरी आहेत?' त्यानं विचारलं."

"हो."

"'आणि आई?'"

"'तीही आहे.'"

"'आता फक्त माझं ऐकायचं. एक शब्दही उच्चारायचा नाही. ऐकतेयस ना?'"

"'ऐकतेय'!"

"'काय ऐकतेयस?'"

"'खिडकीबाहेर वारा घोंघावतोय ना, ते. ऐकू येतंय मला.'"

"'छान. माझ्या सौंदर्यवती, तुला तुझ्या ह्या शत्रूचा निःपात करावयाचा आहे ना? मग बोलव तुझ्या वडिलांना आणि कर माझी निर्भत्सना. मी तुला शरण आलोय. हवं तर हाच दोर घे नि बांधून ठेव त्यानं मला! सूड घ्यायची चांगली संधीच तुला चालून आलीय!'"

'मी काहीच बोलले नाही.'

"'बोल. काही तरी बोल!' तो म्हणाला."

"'काय हवंय तुला?'"

"'मला माझ्या पूर्वीच्या प्रेयसीपासनं सुटका करून घ्यायचीय. तिची मला आता मुळीच गरज नाहीयेय! ह्या स्त्रीचा मला अखेरचा निरोप घ्यायचाय. मला माझं हृदय एका नव्या, अधिक तरुण प्रियतमेला बहाल करायचंय!'"

'मी खदखदा हसत सुटल्ये. त्याची ती कुत्सित भाषा मला इतकी स्वच्छ समजली तरी कशी?'

"'छान! छान!' तो पुढे म्हणाला.

'पण त्या आधी घरात येऊन मला मालकांना अभिवादन तरी करू देत की!'"

'माझ्या मनाचा थरकाप झाला. दात वाजायला लागले. मी दार उघडून त्याला घराच्या आतल्या भागात घेतलं. त्यानं उंबरठा ओलांडला

तेव्हाच कुठे मी भानावर आल्ये. म्हणाले—'

" ' घेऊन टाक तुझे हे हिरे. यापुढे माझ्यासाठी असल्या काही भेटी आणीत जाऊ नकोस ! ' एवढं म्हणून मी हिऱ्याची ती छोटीशी पेटी सरळ त्याच्या अंगावर भिरकावली."

ह्या क्षणी कॅथरीन दम घ्यायला म्हणून थांबली. ती गवताच्या पात्या-सारखी थरथरत होती. पण तिचे गाल पुन्हा एकदा आरक्त झाले होते. अश्रूंनी पाणावलेले डोळे चमकत होते. आणि श्वासांचे फुत्कार कानावर येत होते. तिचा चेहरा पुन्हा एकदा पांढरा पडला. मग कापऱ्या आवाजात ती हळूहळू पुढे बोलायला लागली. तिचा आवाज दुःखानं क्षुब्ध झाला होता.

" माझा तो पाहुणा परत गेला. मग मात्र मला अगदी एकटं एकटं वाटायला लागलं. जणू कुठलं तरी वादळ मला चोहीकडून घेरू पाहत होतं. अचानक एक किंकाळी नि पळत जाणाऱ्या पावलांचे आवाज माझ्या कानावर आले. कोणी तरी त्याहून जोरात ओरडत होतं, ' फॅक्टरीला आग लागलीय. आग ! ' "

' मी माझ्या खोलीच्या कोपऱ्यातच दडी मारली. बाकी सगळेच दारातून पळत बाहेर पडले. मी आणि आईच काय त्या घरात राहिलो. तिचं मरण जवळ आल्याचं मला दिसतच होतं. गेले तीन दिवस ती मृत्युशय्येलाच खिळून होती. आणि आजच काय ती जरा उठली होती... मी शापित आहे हे मला नक्कीच ठाऊक होते !... मग पुन्हा एकदा आवाज आला. हा आवाज खोलीच्या खालच्याच बाजूने येत होता. स्वप्नात असलेल्या मुलाच्या तोंडून यावी तशी एक हलकीशी किंकाळी होती ती ! मग पुन्हा एकदा सारं काही शांत झालं. मी मेणबत्ती विझवली. माझं सारं रक्तच जणू गोठून गेलं होतं. हाताच्या ओंजळीत मी आपलाच चेहरा लपविला. डोळे उघडून पहायचं धैर्यच जणू माझ्यात उरलं नव्हतं.'

" मग अचानक अगदी जवळ कुठे तरी गलबला सुरू झाला. आता कामगार फॅक्टरीतून परत येत होते. मी खिडकीतून वाकून पाहिलं. माझ्या वडिलांसारख्या कुणाला तरी ते उचलून आणत होते. त्यांचा देह निष्प्राण होता ! ते कामगारच आपापसांत बोलत होते,

'तोल गेला आणि शिडीवरून कोसळले ते थेट जळत्या तळघरात! सैतानानेच जणू त्यांना ढकललं असावं!' मी अंथरुणावर अंग टाकलं. भीतीनं थरकापत पडून राहिले. मी कुणाची वाट पाहत होते? कशासाठी? माझं मलाच कळत नव्हतं. तशा अवस्थेतही मी किती काळ पडून होते कोण जाणे! आता काहीच आठवत नाहीयेय. आठवतंय ते एकच— असह्य उत्कंठेनं माझा मेंदू अगदी बधिर झाला होता. डोकं भणभणत होतं. जळत्या फॅक्टरीच्या धुराने माझे डोळेही चुरचुरत होते. दुखतही होते. आपण मरून जावं हा विचार मला अस्वस्थ करण्यापेक्षा सुखदच वाटायला लागला. आणि अचानक कुणी तरी खांदे धरून मला उचललं. धुराच्या पडद्यातून मी डोळे ताणून ताणून पाहिलं. तर 'तो'च होता तो! त्याचे कपडे ठिणग्यांनी जणू पेटल्यासारखे वाटत होते."

"'माझ्या सुंदर जिवलगे, मी तुझ्यासाठीच आलो होतो.' तो म्हणाला, 'तूच माझा नाश केलायस, आणि तुझ्याकडेच माझा जीव मी गहाण टाकलाय! आता तूच मला ह्यातून वाचव! पण ह्या शापित रात्रीची भरपाई मी कशी करू शकेन? समज आपण दोघांनी मिळून परमेश्वराची प्रार्थना केली तर?'"

"तसा तो भीतिदायक भयंकर माणूस हसला व म्हणाला, 'ह्या घरातून आता बाहेर कसं पडायचं, नि पळून कसं जायचं, ते मला सांग.'"

"माझ्याकडे सगळ्याच दारांच्या किल्ल्या होत्या. मी हात धरून त्याला खोल्यांना जोडणाऱ्या जागेमध्ये नेलं. आम्ही एका अंधेऱ्या कपाटाशी आलो. बागेच्या बाजूला उघडणारी एक खिडकी मी त्याला दाखविली. त्यानं आपल्या बळकट बाहूंत मला घट्ट पकडलं आणि माझ्यासकट खिडकीबाहेर उडी टाकली. खूप वेळ हातात हात घालून आम्ही पळत होतो. शेवटी आम्ही एका घनदाट रानात येऊन पोहोचलो. तिथे तो क्षणभर थांबला नि त्यानं कानोसा घेतला."

"'कॅथरीन, पाठलाग होतोय आपला!' तो म्हणाला. 'पाठलाग होतोय, पण माझी घटका अजून भरायचीय म्हटलं! माझ्या सुंदरी, मला आता आलिंगन दे. आपल्या सुखाच्या निरंतर प्रेमाच्या गौरवार्थ तू मला आलिंगन दे!'"

" ' पण तुझे हात असे रक्तानं का माखलेयत ? ' "

" ' तुझ्या वडिलांच्या कुत्र्याचे गळे कापणं भागच पडलं मला, लाडके ! भुंकत होते साले ! चल भरभर आता ! ' "

" आम्ही पुन्हा पळत सुटलो. रस्त्यात एका वळणावर मला माझ्या बाबांचाच एक घोडा दिसला. ज्वाळांपासून जीव वाचवण्यासाठी तो दावं तोडून, तबेल्यातून पळाला होता. ' कात्या, चढ घोड्यावर ! ' माझा माझा प्रियकर मला म्हणाला, ' देवानेच जणू पळून जायला मदत म्हणून हे साधन पाठविलं आहे ! चढत्येयस ना तू ? की माझीच भीती वाटत्येय तुला ? मी नास्तिक नाही. पण दुराचारीही नाही ! तुला हवी तर छातीवर हातांनी क्रूसाची खूण करतो मी ! ' "

' आणि त्यानं तसं केलंही. मगच मी घोड्यावर चढले. त्यानं मला छातीशी धरलं. मग तर स्वप्नात असल्यासारखी मी सारं काही विसरून गेले. भानावर आल्यावर पाहिलं तर आम्ही एका विशाल नदीच्या काठावर येऊन पोहोचलो होतो.'

' काठावरून आम्ही उंच उंच लव्हाळ्यात उतरलो. एक लहानशी होडी माझ्या जोडीदारानं आधीच तिथे लपवून ठेवली होती.'

" ' शूर घोड्या, तुला सलाम असो ! ' तो म्हणाला, ' बरंय आता. तुझा जुना मालक तर मेलाच आहे. तर नवीनच मालक शोध तू आता ! ' "

" मी धावतच बाबांच्या घोड्याजवळ गेले. त्याला अखेरची मिठी मारली. आम्ही बोटीत बसलो. माझ्या जोडीदारानं वल्ही मारायला सुरुवात केली आणि काही क्षणात किनाराही दिसेनासा झाला. मग मध्येच त्यानं वल्हवायचं थांबवलं आणि चहूकडे पाहत म्हणाला, ' व्होल्गा माते, माझ्या सुंदर पण उग्र सरिते, तुझ्या पाण्याच्या अक्षय्य साठ्यानं परमेश्वराच्या ह्या पोरांची तहान भागू देत ! माते, माझ्या अनुपस्थितीत माझ्या मालमत्तेचं रक्षण करतेयस ना तू ? माझा व्यापार-उदीम ठीक चाललाय ना ? हे वादळी, लोभी सरिते हवं तर सारं घेऊन टाक तुला... आणि ' तो मग मला म्हणाला, ' सुंदरी, माझ्याशी निदान चार शब्द तरी बोल. माझ्या सूर्या, माझ्यातला अंधार उजळून टाक ! माझ्या दीपस्तंभा, माझ्या आयुष्यातल्या काळ रात्रीचा नाश करून टाक ! ' "

'मला विश्वास देण्यासाठी एकाच वेळी तो हसत होता, नि बोलतही होता. मी लाजेने चूर झाले होते. एक शब्दही उच्चारू शकत नव्हते की त्याच्या नजरेला नजर देऊ शकत नव्हते. तो ते समजला.'

"'ते जाऊ देत!' त्याच्या आवाजांत हळूवारपणा आला होता. 'सक्तीविरुद्ध धडपडणं व्यर्थ असतं, लाडके! माझ्या अभिमानी, सुंदर प्रिये, परमेश्वरच मला माफ करो! अजूनही तिरस्कार करत्येयस तू माझा? अजूनही मी आवडत नाही तुला?' "

'हे सारं ऐकतानाच माझ्या मनांत भावनांचं वादळ उठलं, मात्र आता ह्या भावना म्हणजेच प्रेम होतं!'

"'मी तुझा तिरस्कार करो वा न करो,' मी म्हणाले, 'मला तुझी गरज आहे हे नक्की, नाहीतर भररात्री तुला आपल्या खोलीत घेण्याइतकी कोणती मुलगी अविचारी झाली असती? एका घोर पापाकरता मी माझा आत्माच तुला विकलाय. माझं मन अनावर झालं. स्वतःवरचा ताबा सुटला. दुःख तर मी पुरेपूर सोसलंय. तरीही तू दुसऱ्यांच्या दुर्दैवांवर डोळा ठेवून असावंस हे काही बरं नव्हे. आणि तू एखाद्या तरुण मुलीच्या भावनांशी खेळ मांडणंही योग्य होणार नाही.' "

'हे सारं सांगताना मी स्वतःलाच विसरले होते. नंतर मात्र मला हुंदके आवरेनात. तो शांतपणे माझ्याकडे पाहत राहिला. त्याची ती नजर पाहूनच मी शहारले.'

"'सुंदर पोरी, ऐक तर आता!' त्याचे डोळे अमानुष तेजाने पेटून उठले होते. 'आता मी जे काही सांगणारेय ते काही पोकळ शब्द नव्हेत! जोवर तू मला सुख देत राहशील तोवर तू माझीच असशील. आणि जर तुझं माझ्यावरलं प्रेम संपलंच तर ते सांगण्यासाठी तू एकही शब्द खर्च करायची गरज नाही. तुझ्या आणि माझ्या संबंधांत कसलंच दडपण असता कामा नये. अशा वेळी तू फक्त खाली मान घालायचीस, तुझे ते काळेभोर डोळे मला पाहताच दूर न्यायचेस. नाहीतर आपलं छोटंसं बोट उंचावून मला फक्त खुणवायचेस. बस्स. त्याक्षणी मी तुझं स्वातंत्र्य आणि प्रेमही मी तुला परत बहाल करायचं! अग, आकस्ताळ्या सौंदर्यवती, तो दिवस तर माझ्या आयुष्यातला अखेरचा दिवस असेल!' "

'त्या शब्दांनी माझं जणू रक्तच गोठलं !' भावनेच्या भरात कॅथरीनचे संभाषणच थांबले. आठवर्षांच्या ह्या नव्या लोटाबरोबर तिच्या मनाची उलाघालही थांबली. तिच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा स्मितहास्य झळकू लागले. ओर्दिनोफ उत्सुकतेनं तिच्याकडे पहात होता. त्याच्या नजरेकडे ती न पाहती तर तशीच पुढे बोलत राहिली असती. पण ओर्दिनोफकडे पहाताच ती विलक्षण शहारली. तिने पुढे बोलायचा प्रयत्न केला. पण तिचे गाल फक्त लाल झाले. एखाद्या भ्रमिष्टासारखा तिचा चेहरा उजळून निघाला. आणि तो तिने उशीआड दडवला. ओर्दिनोफलाही भरून आले. त्याच्या रक्ताचे जणू विष होत होते. आणि ते विषच त्याला वेदना देत होते. कॅथरीनच्या प्रत्येक शब्दाबरोबर त्याचे ते दु:ख कमी होण्याऐवजी वाढतच गेले. अमर्याद तिरस्कार आणि दडपता न येण्यासारख्या निरर्थक भावनांनी त्याचे मन भरून गेले. ह्या सुखसंवादात असेही काही क्षण आले जेव्हा तो कॅथरीनला गप्प रहायलाही विनवू शकला असता. त्याने तिच्या पायांवर लोळण घेतली असती. त्यांचा परिचय नव्हता त्या काळातल्या त्याच्या मनोयातनांचे ते सुख परत प्राप्त करून द्यावे म्हणून तिला विनंती केली असती. आपले पूर्वीचे वाळून गेलेले अश्रूही त्याने तिच्याकडे परत मागितले असते. आता पुन्हा एकवार ते अश्रू वाहायचे थांबल्यावर, आपले रक्त भयंकर वेगाने हृदयाकडे वाहात असल्याचा त्याला भास झाला. क्षणभर कॅथरीन काय म्हणत्येय तेही त्याला कळेनासे झाले. इतकेच काय त्याला तिची एकप्रकारची भीती वाटायला लागली. त्या तासाभरात त्याने आपल्या प्रेमाच्या नावाने किती शिव्या–शाप मोजले असतील ! पण आता मात्र आपल्या नसांतून रक्त नव्हे तर शिशाचा उष्ण रस वाहतोय, त्यामुळे आपला श्वास कोंडून गेलाय हाच भास त्याला होत होता.

'तरीही ती काही माझी सर्वात मोठी समस्या नव्हे' उशीतून डोके वर करीत ती त्याला म्हणाली, 'ती माझी समस्या नाहीच !' तिने आपलेच शब्द वेगळ्या आवाजात पुन्हा उच्चारले. तिचा चेहरा आक्रसला होता. आणि डोळ्यांत चमक होती. 'नाही. मुळीच नाही. एखाद्याला आई नसू शकते. त्या घटनेनंतर मलाही आई उरली नव्हती. पण नसलीच आई तर काय बिघडणारेय त्यानं? आपल्या अखेरच्या घटकेला आईनं उच्चारलेली

शापवाणी, माझं पूर्वायुष्य, मनाची शुद्धता, माझा शीलभ्रंश, माझ्या आत्म्याचा विक्रय, मनाचा पालट, क्षणभराच्या सुखासाठी मी केलेलं चिरंजीवी पाप ह्या साऱ्या गोष्टी-खरं तर असं काय वाकडं होणार होतं माझं? नाही. खरं तर ह्याच गोष्टी माझ्या विनाशाला कारण ठरल्या होत्या पण त्याबद्दलही मला फारसं काही वाटत नाही. पण स्वत:बद्दल सातत्याने वाटणारी लाज हीच माझ्या मनात सलणारी सर्वांत मोठी गोष्ट आहे. माझ्यावरच्या लज्जास्पद कलंकांशी मी गुलामाप्रमाणे जखडली गेलेय. माझ्या विनाशाच्या आठवणींना मी वरदान म्हणून कवटाळते. पण हेच विचार माझं मन अधिक घायाळ करतात. माझं मन एवढं दुर्बळ असावं, त्याला स्वतःच्याच विकृतीबद्दल चीडही व्यक्त करता येऊ नये हेच माझं दुर्दैव!'

तिला पुन्हा धाप लागली होती. एक भयंकर हुंदका तिच्या गळ्यात दाटून आला होता. तिचे थरथरणारे ओठ शुष्क झाले होते. अधून मधून तिची छाती धपापत होती. आणि एक विलक्षण अंगार तिच्या डोळ्यांत पेटला होता. तरीही तिचा चेहरा मोहक वाटत होता. तिच्या चेहऱ्यावरची रेषन्‌रेष सुंदरपणे थरारत होती. भावनावेगाने सजीव बनली होती. ते पाहून ओर्दिनोफचे विचार कुठल्याकुठे पळाले. त्याच्या मनात आता फक्त एकच एक इच्छा उरली होती. त्या तरुण मुलीला कवटाळणे, तिच्या हृदयाच्या वादळी कंपनात सारं काही विसरून जाणे. आणि त्या दोघांच्या नजरा भिडल्या. ती हसली. आगीच्या दोन नद्यांमध्ये सापडल्यासारखी त्याची अवस्था झाली.

'कृपा कर कॅथरीन, दया कर!' तो धापा टाकत तिला म्हणाला. तो तिच्या आणखी जवळ आला. दोघांचे श्वास एकमेकांत मिसळून गेले.

'तू मला झपाटून टाकलंयस कॅथरीन. तुझं नेमकं दुःख काय आहे ते मला ठाऊक नाही. माझी मनःशांती मात्र मी कायमची गमावून बसलोय, एवढंच मला ठाऊक आहे. तुझी ती दुःखं जरा बाजूला ठेव आणि तुझ्या मनात नेमकं काय आहे ते तू मला सांग. मला तू आज्ञा कर. मी ती पाळीन. तू फक्त माझ्या संगतीत रहा. मला एकटंच इथे खितपत ठेवू नकोस.'

कॅथरीनने त्याच्याकडे पाहिले. पण त्यावर ती काहीच म्हणाली नाही. तिने ओर्दिनोफचा हात आपल्या हातात घेतला आणि त्याला थांबवायचा

प्रयत्न केला. पण तिच्याही तोंडून शब्द फुटेना. कुतूहलमिश्रित हास्य किंवा मिस्किलपणासारखंच काहीतरी तिच्या चेहऱ्यावर झळकले.

'नाही, मी सगळंच काही तुला सांगितलं नाही अजून!' तिने पुढे सुरुवात केली. तिचा आवाज काहीसा वर गेला होता. आणखी पुष्कळ गोष्टी तुला सांगायच्यायत मला! ऐकायच्यायत त्या तुला? माझ्या गरीब नि भावनाशील प्रियकरा, तुला माझं हे कथन ऐकायचंय का? ऐक तुझ्या बहिणीची पुढची हकीगत. तिच्या संकटाच्या परिसीमा खरं तर तुला अजून उमगलेल्याच नाहीत. मी माझ्या रक्षणकर्त्याबरोबर पुढचे एक वर्ष कसे काढले तेही तुला सांगू शकेन. पण तेही मी करणार नाहीयेय. त्या वर्षा-अखेरीस तो आपल्या मित्रांबरोबर नदीपार निघून गेला. तो परतण्याची वाट पाहत एका बाईच्या घरात मला मागे ठेवलं होतं. त्या स्त्रीला तो आपली आई म्हणत होता.

'महिना, दोन महिने मी त्याची वाट पाहिली. आणि एके दिवशी शहरात माझी एका तरुण व्यापाऱ्याशी गाठ पडली. त्याला पहाताच, माझ्या सुखी दिवसांतल्या आठवणी पुन्हा एकदा मनांत जाग्या झाल्या.'

"'लाडके!' थोडीफार शाब्दिक देवाणघेवाण होताच तो म्हणाला. 'मी आल्येशा, तुझा एकेकाळचा नियोजित वर! तुला आठवतंय म्हातारी माणसं आपली कशी चेष्टा करायची, आपल्याला छेडायची? आठवतंय तुला? की सारं काही विसरलीस? जरा आठवून बघ तुझ्या गावचा आहे मी!'"

"'काय म्हणतात आपल्या भागातले लोक माझ्याबद्दल?' मी त्याला विचारलं."

'आल्येशा हसला.'

"'तुझं आयुष्य वाया चाललंय असं म्हणतात ते!' तो उत्तरला. 'तू आपलं नाव घालवलयस एका लुटारू जवळ रहातेस असंही म्हणतात ते!'"

"'पण तुला काय वाटतंय माझ्याबद्दल?'"

'तो हादरलाच.'

"'तुझ्याबद्दल चांगलं बोलण्यासारखं काही नाही. तरीही आपली अखे-रची भेट झाल्यापासून मी तुझ्याबद्दल कधीच वाईट असं काही बोल्लो नाही.

छे ! तू माझं जन्माचं नुकसान केलंस. माझ्या प्रेमाची तू अवहेलनाही केलीस. आता ह्या जगांत एकटा आहे मी. माझाच स्वामी आहे मी. माझा आत्मा माझा स्वतःचा आहे. त्या मुलीनं आपल्या आठवणी मारून टाकल्या. पण मी नाही तिच्यासारखा वागलो. मी काही माझा आत्मा विकला नाही. आत्मा ही काही विकायची वस्तू नाही हे समजल्यावर मी कशाला उगीच कुणाला म्हणावं ‘ विकत घ्या तो म्हणून ! ’ नाही कसलीही अपेक्षा न ठेवता मी तुला तो देऊन टाकीन. आणि तो परत विकायचा झाला तरी बाजारांत त्याला काही किंमत येत नसते. ’ ”

“ मी हसत सुटले. तो आपल्या व्यापाराकडे, मित्रांकडे दुर्लक्ष करून आणखी महिनाभर तिथेच राहिला. एकदाच काय अनेकदा तो ह्या पद्धतीने माझ्याशी बोलला. त्याच्या त्या एकटेपणानं मीच व्यथित होईपर्यंत तो तिथं राहिला. अखेरीस एके दिवशी सकाळी मी त्याला म्हणाले,

‘ आल्येशा, संध्याकाळी नदीवर येऊन भेट. आपण दोघं तुझ्या घरी जाऊयात. माझ्या आयुष्यातल्या ह्या हालअपेष्टा आता पुरे झाल्या ! ’ ”

‘ रात्र पडताच मी कपड्यांचे गाठोडं बांधलं. आनंद नि दुःख एकाच वेळी माझ्या मनात उफाळून आले. आणि अचानक माझा रक्षणकर्ता येताना दिसला. खरं तर तो तसा येईल अशी मला मुळीच अपेक्षा नव्हती.’

“ ‘ गुड इव्हिनिंग ’ तो म्हणाला, ‘ चल लौकर. नदीकडनं वादळ येतंय. वेळही थोडा आहे ! ’’’

‘ मी उठले. त्याच्या-मागे चालत राहिले. आम्ही नदीकडेच निघालो होतो. वाट संपता संपत नव्हती. अखेर आम्हाला एक लहानशी होडी दिसली. नावाडी आतच बसला होता. तो माझ्या चांगल्याच परिचयाचा होता. त्याच्या बसण्याच्या पद्धतीवरूनच तो कोणाची तरी वाट पहातोयसं दिसत होतं ! ’

“ ‘ गुड इव्हिनिंग आल्येशा ! ’ माझा रक्षणकर्ता त्याला म्हणाला. ‘ देव तुझं भलं करेल बघ ! तुला आज उशीर झालाय वाटतं. तुझी होडी परत घेऊन जायच्याच तयारीत आहेस तर तू आता ! भल्या गृहस्था, मग मला नि माझ्या ह्या बायकोला नदीपलीकडे घेऊन चल की, आम्हाला लांब तिकडे नदीपलीकडे आमच्या मित्राकडे जायचंय बघ. माझी होडी मी आधीच परत

पाठवून दिलीय. आणि नदी पोहून जाणंही आमच्या कुवतीपलीकडचं आहे ! ' "

" ' चला तर ! ' आल्येशा म्हणाला. त्याच्या त्या शब्दांसरशी माझ्या तर हृदयातच क्षणभर धडकी भरली. ' बसून घ्या ! ' त्यानं सांगितलं. ' साऱ्यांसाठीच वहातोय हा वारा. मग सगळयांनाच माझ्या ह्या सुंदर नावेतून प्रवास करूद्यात ! ' "

' आम्ही होडीत उतरलो, रात्र काळोखी होती. आकाशांत तारे लुकलुकत नव्हते. हवाही वादळीच होती. लाटा उंच उसळ्या मारत होत्या. आम्ही किनारा सोडला. फर्लांगभर जाईपर्यन्त कुणीच काही बोललं नाही.'

" ' काय भयंकर आहे हे वादळवारं ! ' माझा रक्षणकर्ता म्हणाला. ' निदान माझ्या आठवणीत तरी ह्या नदीवर असलं वादळ मी कधी पाहिलं नव्हतं. आता लौकरच तेही चक्रीवादळाचं रूप घेईल ! नाव तर आत्ताच जड झालीय. यापुढे आपण तिघेही एकाच वेळी ह्यातून प्रवास करू शकणार नाही ! ' "

" ' खरंय. आपण तिघेही एकदम ह्या नावेतून जाऊ शकणार नाही. आपल्यातल्या एकाचा भार नावेला पेलत नाहीयेय ! ' आल्येशाचा आवाज वायलीनच्या तारांसारखा निनादत होता.' "

" ' आल्येशा, तुझ्या लहानपणापासनं ओळखतोय मी तुला. खरंतर मी तुझ्या वडिलांचा मित्र. आपण एकेठिकाणी खाल्लंय प्यालोय ! मग मला एकच सांग आल्येशा, पोहून, तू पलीकडच्या किनाऱ्याला जाऊ शकशील की नाही ? का नावेतच राहून हकनाक आपला जीव घालवशील ? ' "

" ' मी मुळीच ही बोट सोडून जायचा नाही.' आल्येशा उत्तरला. ' पण महाशय, आपलं काय ? जर आपणावरच बुडून जायची आफत ओढवली तर ? निष्कारणच इथे आपणात तणाव तेवढा निर्माण होईल ! ' "

" ' मीही ही होडी सोडून जाणार नाही ! ह्या पाण्यात आपला काही निभाव लागायचा नाही. थांब कॅथरीन, माझ्या जीवाच्या सर्वस्वा, तूही जरा ऐक. अशीच एक रात्र आठवतेय मला. तेव्हा लाटा काही एवढ्या उंच उसळत नव्हत्या. आकाशात तारेही चमकत होते. विसरलीस ती रात्र तू ? ' "

" ' नाही. मी नाही विसरलेय ! मी उत्तरले.' "

" ' आणि तुला ती छोटीशी पेटीही आठवतेय ? प्रेमात पडलेला एक तरुण एका देखण्या तरुणीला सांगत होता, तुझ्या डोळ्यांतला होकार संपेल त्या दिवशी तुझं स्वातंत्र्य तुला परत दिलं जाईल, आठवतंय ? ' "

" ' हो. हो. तेही आठवतंय मला.' "

" ' तेही आठवतंय ? छान ! आता ह्या होडीत असलेल्यांपैकी एक जण अधिक आहे. आम्हा दोघा पुरुषांतल्या एकाची घटका नक्कीच भरत आलीय. तर आम्हा दोघांपैकी कुणी काळाला सामोरं जायचं ते लाडके, तूच आता ठरव ! आणि न बोलता फक्त खुणेनंच काय ते सांग ! ' "

" ' मी नाही उत्तर देऊ शकणार ! ' "

× × ×

ह्याच्या पुढे कॅथरीन बोलूच शकली नाही. घोगऱ्या नि खोल आवाजात मागच्या बाजूनं तिला कुणीतरी हाक मारली. ओर्दिनोफ भयंकर दचकला. मूरीन दारातच उभा होता. त्याने फरचा कोट चढवला होता नि त्याचा चेहरा पांढरा-फटक पडला होता. काहिशा वेडसर नजरेनं तो त्या युगुलाकडे पहात होता. कॅथरीनचा, चेहराही खरकन् उतरला. त्याच्या नजरेला नजर देत ती तिथेच बसून राहिली.

" कॅथरीन, खोलीत चल पाहू आपल्या ! "आजारी मूरीन तिला म्हणाला. त्याचा आवाजही अगदी क्षीण होता. मग तसाच तो तिथून निघून गेला.

कॅथरीन दाराकडे पाहात राहिली. जणू म्हातारा मूरीन अद्याप दारातच उभा होता. मग अचानक तिचे गाल आरक्त झाले. मनाशी कसला तरी विचार करत ती हळूहळू उठली. तिच्याकडे पहात असताना त्यांच्या पहिल्या भेटीचा प्रसंग ओर्दिनोफला आठवला.

" जिवलगा, उद्या भेटूयात तर आता " ती विचित्रपणे हसत हसत त्याला म्हणाली, " मी तुला शेवटचं काय सांगत होते ते जरा लक्षात ठेव. ' माझ्या प्रिये, आमच्यातल्या एकाची निवड कर. आमच्यातला कोण हवाय तुला, नि कोण नकोय ते तू ठरव ' ही जागा नेमकी लक्षात राहील ना तुझ्या ? की नाही ? उद्या रात्रीपर्यंत वाट पहाशील मग ? " हे म्हणत असतानाच तिने त्याच्या खांद्यावर हात टेकले.

'कॅथरीन, जाऊ नकोस तू! परत नको जाऊस त्याच्याकडे! अगऽ वेडा आहे तो! वेडा!'

'कॅथरीन!' पार्टिशन पलीकडून मूरीन ओरडला.

'पण त्याचं काय एवढं?' तसेच विचित्र हसत ती म्हणाली. 'त्याने मला मारलंच तर काय असं बिघडणारेय? माझ्या बिचाऱ्या छोट्या भावा, ठीक आहे! खरं तर तू मला कधी भेटायलाच नको होतास!' क्षणभर तिचं डोकं ओर्दिनोफच्या छातीवर विसावलं. डोळे पाझरू लागले.

'हे माझे अखेरचे अश्रू!' ती कुजबुजली....प्रियतमा, आता साऱ्या समस्या बाजूला ठेवून शांत झोपून जा तू. उद्या सकाळीच त्यावर विचार केलेला बरा.' एवढंच बोलून तिने त्याला आवेगाने मिठी मारली.

'कॅथरीन! कॅथरीन!' ओर्दिनोफ तिला थांबवण्यासाठी गुडघे टेकत ओरडला. तिने हसून मान हलवली, आणि ती खोलीबाहेर पडली. मग ती मूरीनच्या खोलीत शिरल्याचे त्याने ऐकले. आणि श्वास रोखून त्याने कान टवकारले पण म्हाताऱ्या मूरीनचा एकही शब्द त्याला ऐकू आला नाही! की पुन्हा एकदा तो स्वतःच विस्मृतीत बुडून गेला होता?

ओर्दिनोफनं उठून तिकडे जायचा प्रयत्न केला. पण त्याच्या पायातच त्राण उरले नव्हते. मग तो तसाच घरी येऊन अंथरुणात कोसळला.

: ५ :

ओर्दिनोफ जागा झाला. पण किती वाजले असावेत ह्याचा काही त्याला अंदाज येईना. बाहेरचा संधिप्रकाश सूर्योदयाआधीचा होता की सूर्यास्ता-नंतरचा? केव्हापासून झोपून राहिला होता तो? ओर्दिनोफ स्वतःलाच विचा-रत राहिला. त्याला वाटले काही झाले तरी आपली ही एवढी झोप म्हणजे

तब्येत बरी नसल्याचीच लक्षणं असावीत.

रात्रीची पिशाच्च झटकून टाकण्यासाठी जणू त्याने आपल्या चेहऱ्यावरून हात फिरवला. त्याने जरा उठून उभं रहायचाही प्रयत्न करून पाहिला. पण आपल्या पायांतच काही त्राण नसल्याचे त्याला जाणवले. तो थंडीने काकडला होता. त्याचं डोकंही विलक्षण ठणकत होतं पण तो भानावर येत गेला तसतशा आठवणीही त्याच्या मनात परत गोळा होत गेल्या. आणि आदल्या रात्रीची आठवण त्याच्या मनात चमकून गेली तसा त्याचा विलक्षण थरकाप उडाला. रात्रीच्या घटनांचे अगदी हुबेहूब ठसे त्याच्या मनावर उमटले होते. त्यांच्या आठवणी अगदी ताज्या होत्या. स्पष्ट होत्या. त्यामुळेच त्या घटनेला पुष्कळ तास होऊन गेलेयंत यावर त्याचा स्वतःचा विश्वासच बसत नव्हता. आता येवढ्यांतच ते सारे घडलं नव्हे ? कॅथरीन ही आत्ताच खोली बाहेर गेली नव्हे ? तो स्वतःलाच विचारत राहिला. तसे त्याचे डोळेही भरून आले. कालच्या भयंकर रात्रीच्या भावखुणा म्हणून तर त्याच्या डोळ्यांतून ते अश्रू ओघळले नव्हते ? की ते अश्रूही अगदीच नवे-निराळे होते ? आपल्या दुर्बल शरीरांत पुन्हा एकवार असल्या काही भयंकर दिव्याला तोंड द्यायची ताकद उरलेली नाही ह्याची ओर्दिनोफला जाणीव होती. तरीही विचित्र म्हणजे कालच्या त्या यातनाच आता त्याच्या मनाला विलक्षण सुखावह वाटत होत्या. एका क्षणी तर तो आपल्या आठवणी बरोबर इतका भरकटत गेला ! आपला मृत्यूच जणू जवळ आल्याचा त्याला भास झाला. आणि तो मृत्यूही पण एखाद्या स्वागतार्ह पाहुण्यासारखा यावा असंच त्याच्या मनाला वाटत राहिलं. पण दुसऱ्याच क्षणी त्याला आनंदाचा उमाळा यायचा. त्याचे सारे जीवन-चैतन्यच जणू त्याच्या देहातून उफाळून बाहेर पडायचे. त्याचे अंतःकरणही कायमच नष्ट होण्यासाठीच जणू पेटून उठायचे.

आणि अचानक कुठूनतरी मधुर गाण्याचे स्वर ओर्दिनोफच्या कानावर आले. सुखाच्या सर्वोच्च क्षणी मनात उमटतात तसे ते सूर होते. त्याच्या उशाशीच, आपल्या मोकळ्या आवाजात, कॅथरीन नेहमीचंच नि हलकं फुलकं गीत गात होती. तिचा आवाज उंचावत होता. खाली उतरत होता. आणि सुरांच्या उदासवाण्या आरोह-अवरोहात हरवून जात होता. अंतःकरणाच्या कोनाड्यात बंदिवान करून ठेवलेल्या एका प्रखर पण दडपल्या गेलेल्या

जीवनेच्छेत गाण्याचे ते सारे सूर नाहीसे होत होते. मग पुन्हा ते शब्द, अविनाशी आकर्षणाचं खरंखुरं प्रतीक असलेल्या, कोकिळेच्या गाण्यासारखे हेलावत येत होते. तारुण्यातल्या प्रेम-स्वप्नांचं सारं चैतन्य सामावलेल्या सूरांच्या सागरात बुडून जात होते. त्या सूरांशी विलक्षण संगती साधणारं काही साधेच पण भावमय शब्द ओर्दिनोफला ओळखता येत होते. पण ते शब्द नव्हेत तर ते सूरच ओर्दिनोफच्या हृदयाला अधिक स्पर्श करून जात होते. कॅथरीनचे ते साधेसुधे पण अगदी अकृत्रिम शब्द तो आपल्या अंतःकरणात दडलेल्या सुप्त भावनावेगांशी जुळवून घेत होता. आणि ओर्दिनोफने गाण्यात घातलेले हे शब्द देखील कॅथरीनच्याच अस्तित्वाने भारून गेले होते. प्रथम त्याला ते गाणं आशारहित भावनेच्या अखेरच्या हुंदक्यासारखे वाटले. पण नंतर मात्र त्याला तेच शब्द सभोवतालचे साखळदंड तोडून, एका मुक्त प्रसन्न वातावरणात उदात्त समर्पणाला सामोरं जाणाऱ्या आनंदी हृदयाच्या चित्कारासारखे वाटले. ते स्वर म्हणजे प्रीतीचा पहिलावहिला उदगार होता. त्यात कुमारिकेच्या लज्जारंगात मिसळून गेलेली शालीनता होती. ते गाणं म्हणजे चमचमते अश्रू होते. आणि दबलेल्या आवाजातली कुजबूज होती. अखेरीस, स्वतःच्याच सौंदर्य सामर्थ्यावर खूष असणाऱ्या दिवसाउजेडी आपल्या नुसत्या दर्शनानंही इतरांची मनं चाळविणाऱ्या अभिमानी कुमारीकेच्या अतृप्त इच्छांचा तो उच्चार होता.

गाणे पुरते संपेपर्यंत देखील ओर्दिनोफला धीर धरवेना. तो जागेवरून उठणार तेवढ्यात ते संगीतच थांबले. 'आता तुला ना सकाळच्या शुभेच्छा देता यायच्या, ना दुपारच्या ! पण संध्याकाळच्या सदिच्छा द्यायची वेळ मात्र झालीय लाडक्या ! ' पार्टिशन पलीकडून तिचा आवाज आला ' उठ. आणि आमच्या खोलीत ये बघू ! आलास तर तुझ्या सहवासाचं सुख तरी निदान मला मिळेल ! मी आणि मूरीन, आम्ही दोघेही तुझीच वाट पहातोय बघ. तुझं आदरातिथ्य करायला अगदी उत्सुक आहोत आम्ही ! जर स्वतःचा अपमान झाल्यानं तुझं मन अजूनही दुखावलेलंच असेल तर कृपा करून तो राग मनातून काढून टाक. इकडे ये. आणि आमच्याशी जरा गप्पा-गोष्टी कर पाहू ! '

कॅथरीनच्या ह्या विनवण्यांनंतर मात्र ओर्दिनोफ उठला. ती बोलावत्येय

ह्या पलीकडे कुठलीच भावना त्याच्या मनात नव्हती. खरे तर तसा बळ्या-बळ्यानेच तो आपल्या मालकाच्या खोलीकडे जायला निघाला होता. आणि तेवढ्यात त्याच्या पुढ्यातले दार उघडले. त्याची विलक्षण सुंदर प्रियतमा, सूर्यप्रकाशासारखं स्वच्छ, सुंदर हसतच त्याला सामोरी आली. तिच्याशिवाय दुसरं काहीच आता त्याच्या नजरेला भावत नव्हतं. त्याचं अंतःकरण आनंदाने जणू विदीर्ण व्हायच्याच बेतात होते.

'काल आपण भेटल्यापासनं दोन सूर्योदय होऊन गेलैयत म्हटलं!' आपला हात त्याच्याकडे देत कॅथरीन म्हणाली. 'आणि ह्या तरुण मुलीच्या मनातही दोन सूर्योदय होताहेत बरं! पहिल्या सूर्योदयानं कुमारिकेच्या लज्जेची लाली तिच्या चेहऱ्यावर पसरतेय. आणि त्यानं तिचं अंतःकरण जागं होतंय. तर दुसरा सूर्योदय एका परिपक्व प्रेमाची गर्द रंगछटा तिच्या चेहऱ्यावर रंगवतोय! ये माझ्या प्रिय मित्रा, आत ये. असा दारातच का थांबून राहिलायस तू! आम्ही दोघं आमचं प्रेम नि आदर तुला देऊ करतोय. माझा रक्षणकर्ताही तुझं स्वागत करायला सिद्ध आहे.'

सप्तस्वरांसारखी ती सुरेल हसली. तिने ओर्दिनोफचा हात आपल्या हातात घेतला. आणि बळेबळेच त्याला आत नेले. मान खाली घालूनच तो त्यांच्या खोलीत शिरला. जणू तिच्या त्या विलक्षण सौंदर्याला तोंड द्यायचे सामर्थ्यही त्याच्यात नव्हते. तिचे अंग-प्रत्यंग झगमगत्या उत्साहाने चमकत होते. यापूर्वीही तिच्या सौंदर्याने तो क्वचितच एवढा मोहित झाला असेल! त्याच्या हातांत दिलेले तिचे हातही क्षणभर थरारले. त्याने तिच्याकडे पाहिले असते तर एक विजयी स्मितच तिच्या चेहऱ्यावर झळकताना त्याला दिसले असते!

'अहो म्हातारबाबा, आपणही जरा उठता का?' स्वतःला प्रयत्नपूर्वक सावरत कॅथरीन म्हणाली, 'मूरीन, तू आता ऊठ आणि आपल्या ह्या पाहुण्याचे स्वागत कर पाहू! ओर्दिनोफ आपल्या भावासारखा तर आहे. आपण उठूनच त्याचे स्वागत करायला हवं. आपल्या अतिथीला अभिवादन कर. आपल्या स्नेहाचा हात त्याला दे!'

हे ऐकताच ओर्दिनोफला प्रथमच मूरीनच्या तिथल्या अस्तित्वाची जाणीव झाली. वयस्क मूरीनच्या डोळ्यांतून वेदनेची पुसटशी चमकही डोकावत

होती. तो ओर्दिनोफकडेच रोखून पहात होता. त्याच्या नजरेत संताप होता तसाच एक वेडसर भावही. मूरीनच्या ह्याच नजरेनं ओर्दिनोफला त्याआधीही घायाळ केले होते. अपुऱ्या कपड्यानिशी तो अंथरुणावर पडून होता. पण दिवसा मात्र तो कुठे तरी जाऊन आला असावा. गळ्याभोवतालचा लालभडक मफलर नि पायातले बूट तो बाहेर जाऊन आल्याचे दाखवीत होते. त्याचा चेहरा अशक्त आणि निस्तेज वाटत होता. तो आजारातूनच उठला असावा ! कॅथरीन मूरीनजवळ गेली. एक हात टेबलावर टेकून तिने त्याच्याकडे रोखून पाहिले. त्याच्या चेहऱ्यावर स्मितहास्य झळकत होते. स्वतःच्या सुखासमाधानासाठी करायचे सर्व काही करून झाल्याचीच भावना मूरीनच्या नजरेतून व्यक्त होत होती.

'आपण आला आहात तर !' अंथरुणावरून उठत उठत मूरीन उद्गारला. पुन्हा खाली बसत तो म्हणाला, 'भाडेकरूसाहेब, आपण आहात तर ! महाशय, मी आपला शतशः अपराधी आहे. काहीही माहिती नसताना मी आपणाला दुखावलं आणि पिस्तुलानं धमकावलंही. पण मलाच अपस्माराचे झटके येतात यावर कोण विश्वास ठेवील ? अगदी सैतानाचाही त्यावर विश्वास बसायचा नाही !' मग त्याने जरा अनिच्छेनेच नजर दूर नेली. कपाळावर आठ्या पाडत घोगऱ्या आवाजात तो पुढे म्हणाला, 'हे बघा, माझ्यासारख्यांना अपस्माराचे हे झटके काही सांगूनसवरून येत नसतात. तो आजारच मुळी चोर पावलांनी नकळत तुमच्या आत प्रवेश करतो. एकदा तर अशाच आजारपणात मी कॅथरीनच्या छातीतच गोळी घालणार होतो ! थोडक्यात सांगायचं तर माझी प्रकृती तितकीशी ठीक नाहीयेत. अधून मधून अशा फीट्सही येत असतात. आतापर्यंत हे सगळे आपल्या कानावर आलंच असेल. आता आपण आमचे पाहुणे आहात. कृपा करून आपण बसा !'

ओर्दिनोफ मूरीनच्या तोंडाकडे पहातच राहिला.

'बसा ! खाली बसा !' मूरीन अस्वस्थ होत ओरडलाच. 'कॅथरीनचीच इच्छा असेल तर बसून घ्या ना आपण ! तुम्ही दोघं एकमेकांचे बहीण-भाऊ आहात तर ? एखाद्या प्रेम युगुलासारखं एकमेकांवर प्रेम करता. खरंय ?'

आता मात्र ओर्दिनोफ खाली बसला.

'बघा, बघा तुमच्या बहिणीकडे!' म्हातारा हसून पुढे म्हणाला. त्याच्या शुभ्र दंतपंक्ती उजेडांत चमकल्या. त्यातला एकही दात अजून गायब झाला नव्हता. 'उगाच नाराज होऊ नका! तुमच्या ह्या बहिणीचं व्यक्तिमत्त्व अगदी प्रसन्न आहे, असं नाही वाटत साहेब आपल्याला? तिच्या सौंदर्याचा सन्मान करा! आपलं हृदय तिच्यासाठी जखमी होऊन भळभळा वहातंय हे आम्हा-लाही जरा दाखवून द्या!'

ओर्दिनोफने संतापाने मूरीनकडे पाहिले. त्या नजरेनं मूरीनचे तर क्षणभर अवसानच गळून गेले. ओर्दिनोफ रागाने धुमसू लागला होता. त्याच्या संतापाला आता उकळी फुटली होती. पण कुठल्या तरी पाशवी प्रेरणेने त्याच्या मनाला धोक्याचा इशारा दिला.

मूरीनचे शब्द तो खोटं ठरवू शकत नसला तरी त्या शब्दांनीच त्याचे मन खुळे-पांगळे होऊन गेले होते. आपला भयंकर शत्रू आपणासमोर येऊन उभा ठाकल्याची आता त्याला जाणीव झाली.

'असा पाहू नकोस माझ्याकडे!' कॅथरीनचे शब्द ओर्दिनोफच्या कानावर पडले. त्याने वळून पाहिले.

'नाही. माझ्याकडे मुळीच पाहू नकोस तू, ओर्दिनोफ! कदाचित मला पहाताच दुष्ट शक्ती तुझ्या विचारांचा ताबा घेतील. मी तुला विनवणी करतेय तुझ्या ह्या प्रियतमेवर जरा दया कर!'

मग ती खदखदा हसली. अचानक पुढे आली. आपल्या तळहातांनी तिने ओर्दिनोफचे डोळे झाकले. आणि लगेच हात काढून घेत त्यांनीच आपलाही चेहरा झाकून घेतला. आपल्या गालावरचा लालिमा आपल्या बोटांच्या फटीतूनही डोकावतेय ह्याची कॅथरीनला निश्चितच जाणीव होती. म्हणूनच त्या दोघा पुरुषांच्या स्मित हास्याला, नजरांना नजरा मिळवण्याला तिचा फारसा आक्षेप नसावा. मूरीन आणि ओर्दिनोफ शांतपणे तिच्या ह्या हालचाली न्याहाळत होते. एखाद्या सुप्रसिद्ध सौंदर्यवतीकडे पहावे तसाच प्रेमळ भाव ओर्दिनोफच्या नजरेत होता. म्हाताऱ्या मूरीनच्या नजरेतून मात्र थंडपणाचीच भावना डोकावत होती. पण त्याचे ओठ मात्र आता निळे पडा-यला लागले होते, थरथरतही होते.

कॅथरीन टेबलाजवळ गेली. टेबलावरची पुस्तकं, कागद तिने आवरले. मग

टेबलच उचलून खिडकीजवळ ठेवले. मधूनच ती जोरजोरांत श्वासघेत होती. हवेतला प्राणवायूच जणू तिला पुरत नसावा. किनाऱ्याकडे येऊन फुटणाऱ्या लाटांसारखी तिची छाती हेलकावत होती. तिने पापण्या मिटून घेतल्या होत्या. पापण्यांचे केस गालांवर तीक्ष्ण सुयांसारखे उभे होते.

' झार महाराजांचीच पोरगी आहेस जणू तू ! ' मूरीन उद्गारला.

' माझी राणी ! ' ओर्दिनोफ पुटपुटला. पण हे शब्द उच्चारता क्षणी त्याचे मन भानावर आले. म्हाताऱ्या मूरीनची नजर त्याच्यावर खिळून होती. पराकाष्ठेचा मत्सर नि थंडा तिरस्कार त्या नजरेत भरून उरला होता. ओर्दिनोफने उठायचा प्रयत्न केला पण कोणत्यातरी पाशवी शक्तीने त्याचे पाय जमिनीला जणू खिळवून ठेवले होते. मुठी घट्ट आवळत तो पुन्हा खाली बसला तेव्हाच कुठे त्याला जरा बरे वाटले. समोरचे दृश्य खरे आहे यावरच त्याचा विश्वास बसत नव्हता. आपल्या पापण्यांवर उतरणाऱ्या एका दुष्ट भीषण स्वप्नातले आपण एक खेळणं आहोत हीच ओर्दिनोफची भावना होती. सगळ्यांत विचित्र म्हणजे ह्या स्वप्नातून जागे व्हायची त्याला मुळीच इच्छा नव्हती.

कॅथरीनने टेबलावरचा टेबलक्लॉथ काढून घेतला. ट्रंक उघडली आणि एक अधिक भारी कापड बाहेर काढले. ह्या कापडावर लाल नि सोनेरी रंगाच्या रेशमाने कशिदा काढला होता. ते सुरेख कापड तिने टेबलावर पसरले. मग एका जुन्याच पण वर सोनेरी नक्षीकाम केलेल्या कपाटातून तिने चांदीचे तीन पेले बाहेर काढले. त्यातला एक पेला अगदी गंभीरपणे नव्हे तर काहीशा स्वप्नाळूपणेच तिने ओर्दिनोफच्या हातांत दिला आणि दुसरा पेला मूरीनला दिला.

' आपल्यापैकी कोणा एकाच्या मनांत दुसऱ्या दोघांबद्दल सद्भावना नाहीयेय ? ' कॅथरीनने विचारले. ' ते काही असो, आपल्या ह्या अतिथीबद्दल निदान माझ्या मनात तरी चांगलीच भावना आहे आणि म्हणूनच आज रात्री तो माझ्या समवेतच मद्यपान करणार आहे. तुम्ही दोघंही माझे भाऊच आहात. तुम्हा दोघांतलं प्रेम आणि भावनांचं ऐक्य वाढीला लागावं यासाठी सदिच्छा म्हणून आपण सगळेच मद्यपान करूयात ! '

' खरंय. खरंय ते ! ' म्हातारा मूरीन उद्गारला. ' आपण सारे मिळून

मद्य घेऊयात आणि आपल्या साऱ्याच कथा नि व्यथा ह्या दारूच्या पेल्यांत बुडवून टाकूयात ! कॅथरीन, भर पेला आता ! '

' आणि मी पेले भरावेत असं तुला..,तुला देखील वाटतंय, ओर्दिनोफ ?' कॅथरीनने विचारले. तिच्या प्रश्नाला उत्तर म्हणून ओर्दिनोफने आपला पेला तिच्यापुढे धरला.

' एक मिनिट ! ' मूरीन हात उंचावत ओरडला.

' आपल्यापैकी ज्याची एखादी इच्छा अतृप्त राहिली असेल त्याला इच्छापूर्तीचं भाग्य लाभू द्यात ! '

' आता ह्या नंतरचा पेला तुझ्या आणि माझ्यासाठीही होऊन जाऊद्यात बाबा ! ' कॅथरीन मूरीनला म्हणाली. ' तुझ्या अंतःकरणाच्या कानाकोपऱ्यात माझ्यासाठी काही माया असेल तरच माझ्या ह्या विनंतीला तू मान द्यावास, मूरीन ! एकेकाळच्या आपल्या सुखांसाठी, मागे राहिलेल्या वर्षांसाठी सदिच्छा म्हणून मद्य पिऊयात आपण ! तुझं माझ्यावर खरंखुरं प्रेम असेल तरच मला पुन्हा एकदा पेले भरायला सांग तू ! '

' बच्चे, तुझी दारू भलतीच कडक आहे बरं ! त्यानं—त्यानं फक्त ओठच काय ते ओले होऊ शकतात ! ' आपला पेला कॅथरीनकडे परत देता देता हसत हसतच मूरीनने तिचा टोला परतवला.

' माझ्या सहवासाची गोडी निदान मद्यासारखी तरी असेल पण तू—तू तो पेला पुरता पिशील तर ना ! आपापली दुःखं जपतच एकमेकांच्या सह-वासात कशाला रहायचं म्हातारबुवा ? उदास विचारांनी मन तेवढं खिन्न होतं. विचार करणं म्हणजेच आणखी दुःखी होणं म्हणून तर सुखानं जगायचं असेल तर माणसानं आयुष्यात विचार करायचं सोडून द्यायला हवं. मनसोक्त मद्य पिऊन घे म्हाताऱ्या ! तुझ्या साऱ्याच विवंचना मद्याच्या पेल्यांत बुडवून टाक तू ! '

' जीवनातल्या कथा-व्यथांशी तुझा एवढा परिचय आहे कॅथरीन ? त्या मनांतून दूर करायचा उत्तम उपायही तुला ठाऊक आहे ? चल तर कॅथरीन, माझ्या शुभ्र कबूतरा, तुझ्यासाठी म्हणून पितो आता मी हा मद्याचा पेला ! आणि आपण साहेब,' त्याने ओर्दिनोफला विचारले, ' जरा धाडस करूनच विचारतोय. पण आपण तरी आपल्या आयुष्यात दुःख-वेदना सहन केल्यायत

का कधी ? '

'आयुष्यात मी काही सुखं दुःखं अनुभवली असली तरी ती माझी माझ्याजवळ राहूद्यात ! ' ओर्दिनोफ स्वतःशीच पुटपुटला. त्याची नजर अद्यापही कॅथरीनवर खिळून होती.

'ऐकलंस का म्हाताऱ्या, तो काय म्हणतोय ते ? ' ती मूरीनच्या अंगावर ओरडली.

'मलाही आत्मनिरीक्षण वगैरे फारसं ठाऊक नाही. एक काळ असा होता, तेव्हा मी भूतकाळाचा फारसा विचारच केला नव्हता. पण मग अशीही एक वेळ आली की तेव्हा पूर्वीचं सारं काही अचूक आठवायला लागलं. माझ्या आयुष्यात घडलेलं सारं काही अधाशासारखी मी पुन्हा एकदा जगले.'

'ओह. पण भूतकाळातल्या घटनांबद्दल एखाद्याचं अभिनंदन करणं हेही औचित्याचं कृत्य असणार नाही.' मग काही निराशेने मूरीन उद्‌गारला, 'भूतकाळ म्हणजे आपण पिऊन टाकलेली दारू ! त्यात चांगलं असं काय असतं ? जुन्यापुराण्या कोटासारखा फेकून द्यायच्याच लायकीचा असतो तो ! '

'पण भूतकाळदेखील आपलं रंग रूप पालटू शकतो की ! ' बळेबळेच हसत कॅथरीननं उत्तर दिलं. तसे दोन अश्रू तिच्या डोळ्यांत गोळा झाले. हिऱ्यांसारखे चमचमत पापण्यांच्या कडांवर ओथंबून आले. 'कुणीच आपलं आयुष्य एकट्यानं जगू शकणार नाही.तरुण मुलीचं मन नेहमीच आनंदी असतं. तिच्या एवढ्या आवेगानं तुमचं अंतःकरण कधीच धडधडू शकणार नाही, तिच्या भावनांची तीव्रता तुम्हांला कधीच कळणार नाही म्हातारबुवा ! मी काय म्हणतेय ते तुला कळतंय का, म्हाताऱ्या ? बघ !...बघ ! माझ्या डोळ्यांतला अश्रू तुझ्या पेल्यांत सांडला बघ ! '

'पण त्या दुःखाच्या मोबदल्यात नंतर निदान सुख...भरपूर सुख तरी वाट्याला आलं का तुझ्या ? ' ओर्दिनोफने कॅथरीनला विचारले. त्याचा स्वर भावनावेगानं कातर झाला होता.

'साहेब, आपणाकडे सुखाचं भरघोस पीक तर आलेलं नाही ना ? अगदी दुसऱ्यांना विकण्याइतकं ? ' मूरीनने मध्येच तोंड घातलं. 'आपणाशी कुणीही

बोलत नसताना उगाच कशाला आमच्यामध्ये आपलं नाक खुपसताय?' तो कडवटसं हसला. त्याने ओर्दिनोफकडे एक उद्दट कटाक्ष टाकला.

'माझ्या दुःखाच्या मोबदल्यात मला थोडं फार सुख मिळालंय हे खरंय.' काहीशा नाराजीने कॅथरीनने ओर्दिनोफला उत्तर दिले. 'अर्थात एखाद्याला जे सुख भरपूर वाटेल तेच दुसऱ्याच्या दृष्टीने अगदी थोडेही असू शकेल. एखाद्या माणसाला दुसऱ्यांकडून काही घेण्यापेक्षा दुसऱ्याला काही देण्याचीच इच्छा असते. काहींना दुसऱ्याकडून नुसतं घ्यायचंच असतं तर दुसऱ्याला कधी काही द्यावंसं वाटत नाही.' हे सारं सांगताना तिची नजर कठोर झाली होती. 'मला रागवायचा अधिकार निदान तुला तरी नाहीयेय. एखादा माणूस एक प्रकारचा तर दुसरा दुसऱ्याच प्रकारचा असू शकतो. ज्याचं आयुष्य सर्वार्थानं सुखी आहे असा कुणी कधी तू पाहिलायस?... तर म्हाताऱ्या, पेला भरभरून पी! अगदी अखेरच्या थेंबापर्यंत पीत रहा! अगदी स्वेच्छेनं तुझी कायमची गुलामगिरी पत्करलीय मी. तुझ्या ह्या प्रियतमेच्या सुखासाठी सदिच्छा म्हणून पी तू! भर पुन्हा पेला आणि पिऊन टाक तो!'

'तर होऊन जाऊ देत तुझ्या मनासारखं कॅथरीन! पण माझ्याबरोबर तूही मद्य घ्यायला हवंस!' तिच्याकडून मद्याचा पेला घेता घेता मूरीन म्हणाला.

'जशी तुझी इच्छा! पण जरा थांब. त्या आधी मला तुला काही सांगायचंय.' टेबलावर कोपरे टेकत कॅथरीन म्हणाली. आता तिने मूरीनच्या नजरेला नजर भिडवली होती. एक निश्चयी भाव तिच्या चेहऱ्यावर उमटला होता. तिच्या सर्वांगाचा जणू भडका उडाला होता. तिच्या एकूण हालचाली असंबद्ध वाटत होत्या. तिची मनःस्थिती तर निश्चितच पालटली होती. ह्या नव्या चैतन्याने तिच्या मूळच्या सौंदर्यात भरच घातली होती. स्मित हास्याने तिचे ओठ विलग झाले होते. त्यातून तिचे शुभ्र दात चमकत होते. तिचा श्वासोच्छ्वास धपापत येत होता. त्याबरोबरच तिच्या नाकपुड्या आकुंचन-प्रसरण पावत होत्या. तिच्या कानशिलांवर बारीक बारीक घर्मबिंदू गोळा झाले होते. आत्तापर्यंत तिपेडी वेणीत व्यवस्थित बांधलेला तिचा केशसंभार आता अस्ताव्यस्त होत तिच्या डाव्या कानावर विसावला होता.

‘म्हातारबाबा, आता मला माझंच भविष्य सांगा तुम्ही !’ ती मूरीनला म्हणाली, ‘तुझी सारी बुद्धी मद्याच्या पेल्यात बुडून जाण्याआधी माझं भविष्य मला समजून घेऊ देत. हा माझा हात बघ. लोक उगाचंच काय तुला अंतर्ज्ञानी म्हणत नाहीत ! पुस्तकांचा अभ्यास केला नाहीयेस तू ? सगळी गूढविद्या तू जाणतोस की नाही ? माझा हा हात बघ. कोणत्या दुष्ट शक्ती माझ्या भवितव्याला धमकावतायत तेही मला सांग. उगाच असत्य सांगू नको. तुला जे काही समजतंय तेवढंच मला सांग. ह्या आयुष्यात कधी काळी तरी मी सुखी होईन काय ? कधी काळी तरी तू मला क्षमा करशील काय ? की माझ्या आयुष्याचा मार्ग नेहमीच काट्या-कुट्यांनी भरलेला असावास तुला वाटतंय ? कधी काळी तरी मला आयुष्यात आश्रयस्थान मिळेल काय ? की वाटेवरच्या पक्ष्यांसारखी मलाही जिथे डोकं टेकीन तोच आपला निवारा समजून एकाकी दिवस काढावे लागतील ? माझ्यावर कोण प्रेम करतं ? कोण माझा द्वेष करतं ? कोण मला विव्हळ करील ? की माझ्या ह्या तरुण नि उत्साही मनाला नेहमीच एकाकी तळमळत रहाणं भाग पडेल ? मग सारं तारुण्य एकाकी काढल्यावर अकालीच मृत्यूला सामोरं जायची आपत्ती माझ्यावर कोसळेल ? पण त्याचबरोबर आणखी नवीन संकटं चालून येईपर्यंत तरी ज्याच्या सहवासात धुंद व्हावे, सुखासमाधानानं दिवस घालवावेत असा कुणी जोडीदार माझं मन शोधून काढील काय ? माझा खराखुरा प्रियकर कोणत्या निळ्याभोर आकाशाखाली वस्ती करतो ? तो कोणत्या समुद्रतटावर रहातो ? कोणत्या जंगलांत त्याचे वास्तव्य असते ? तो माझ्यावर मनापासून प्रेम करील ? की मलाच कंटाळून जाईल ? म्हातारबाबा, ह्या अंधाऱ्या जागेत, तुझ्या जादूच्या पुस्तकांच्या ढिगाऱ्यांत आपण दोघे आणखी किती दिवस असे एकत्र रहाणार आहोत ? मी तुला अखेरचं अभिवादन करीन, दीर्घायुरोग्य चिंतीन आणि तुझा कधी कायमचा निरोप घेईन ? आजवर तू मला पुरवत आलेल्या अन्न-वस्त्राबद्दल, माझ्या आयुष्याशी संबंध जोडत तू सांगितलेल्या मनोरंजक गोष्टींबद्दल मी तुझे आभार मानायची वेळ येणारेय की नाही ? माझ्याकरता म्हणून तू ह्या भविष्यकथनांत जास्त लक्ष घाल. तुझं सारं कौशल्य पणाला लावून सत्य काय ते मला सांग !’

ह्या क्षणापर्यंत तरी तिचा उत्साह वाढतच गेला. पण हे सारं सांगून होताच

तिचा आवाज बसला. तिचे डोळे मात्र विलक्षण चमकत होते. आणि वरचाच ओठ तेवढा थरथरत होता. तिच्या शब्दांतून बोचरा उपहास व्यक्त होत होता. तिचा आवाज भरून आला होता. टेबलावर रेलून तिने मूरीनकडे पाहिले. तिच्या नजरेत भेदकपणा होता. हृदयाचे ठोकेही जलद पडत होते.

ओर्दिनोफ असह्य वेदनेने ओरडला. त्याने उठायचा प्रयत्न करून पाहिला. पण मूरीनच्या एकाच ओझरत्या कटाक्षासरशी तो पुन्हा एकदा खुर्चीलाच खिळून राहिला. त्या नुसत्या कटाक्षानेच ओर्दिनोफला लटपटायला झाले. त्याचा संतापही जागच्या जागी थंड झाला. मूरीनच्या नजरेत उपहास होता तसाच तिरस्कारही. त्यात अस्वस्थता आणि मत्सरयुक्त कुतूहलही मिसळून गेले होते.

कॅथरीन बोलायची थांबली तसा मूरीन अगदी निर्विकारपणे हसला. त्या हास्यालाही काहीशी स्वप्नीलतेची झाक होती. कॅथरीन बोलत असताना क्षणभरही मूरीनची नजर तिच्यावरून हलली नव्हती. मग मात्र कॅथरीनच्या शब्दांनी त्याच्या अंतःकरणावर जणू वज्रघात केला. तिचे ते दुर्दैवी बोलणे ऐकून घेतल्यावर मग मात्र त्याने उत्तर द्यायला सुरुवात केली.

'पुष्कळशा गोष्टींची माहिती तुला आत्ताच्या आता हवीय तर कॅथरीन ! अगं लहानग्या पक्षिणी, तुला उडण्यासाठी पंख हवेयत आणि त्याचवेळी जाळून त्याचा उपयोगही करायचाय तर ! ठीक आहे. भर माझ्यासाठी मद्याचा आणखी एक पेला ! म्हणजे तुझ्याच स्वतंत्रतेला सदिच्छा म्हणून मला आणखी एक पेला पिता येईल ! एरवी माझ्या इच्छाशक्तीलाही नजर लावणाऱ्या दुष्ट शक्तीला दूर ठेवता यायचं नाही मला ! सैतान प्रभावी आहे आणि दुष्ट शक्तीही आपल्यापासनं फार दूर नाहीयेत हेही ठाऊक आहेच तुला !'

बोलता बोलता मूरीनने मद्याचा पेला उंचावला, आणि तोंडाला लावत रिकामाही केला. जेवढं अधिक मद्य तो पीत गेला, तेवढा त्याचा चेहरा अधिक निस्तेज होत गेला. त्याचे दोन्ही डोळे निखाऱ्यांसारखे पेटून उठले. चेहराही विलक्षण फिक्का पडत गेला. नव्याने फीट येण्याचीच सगळी लक्षणे जणू त्याच्या नजरेतून डोकावीत होती. ओर्दिनोफच्या दृष्टीने ती दारू भलतीच कडक होती. खरेतर मद्याचा एकच पेला त्याच्या नजरेपुढे अंधेरी आणायला,

त्याच्या नसांतले रक्त पेटवून द्यायला, त्याची मनःशक्ती दुबळी करायला पुरेसा ठरला असता. म्हणून तर मद्याचा दुसरा पेला स्वीकारताना आपण तो का घ्यावा हेच त्याला कळेनासे झाले होते. कदाचित मद्य पिऊनच आता त्याला आपल्या मनातला प्रक्षोभ शांत करावयाचा होता. पण एक घोट घेता क्षणीच रक्तप्रवाह त्याच्या नसानसांतून बेभानपणे वहायला लागला. त्याला घेरी आली. खूप प्रयत्न करूनही अवतीभोवती काय चाललंय तेच त्याला कळेनासे झाले.

आपला पेला टेबलावर आदळत म्हातारा ओरडला, 'कॅथरीन, पुन्हा भर तो! अग दुर्दैवी स्त्री, भर पुन्हा तो पेला! मी अगदी मरेस्तोवर मला पाजीत रहा. ह्या म्हाताऱ्याला अखेरची प्रदीर्घ झोप लागेल आणि त्याच्या तावडीतून तुझी सुटका होईस्तोवर तू मला मद्य पाजत रहा. निदान आत्ता तरी आपण सगळे मिळूनच मद्य घेऊयात. पण तू का पीत नाहीयेस, कॅथरीन? माझं तुझ्याकडे लक्षच नाहीयेयसं वाटलं की काय तुला?'

पण ह्यावर कॅथरीन काय उत्तरली ते ओर्दिनोफला ऐकायलाच मिळाले नाही. बहुधा मूरीननेच तिला पुढे बोलू दिले नसावे. मूरीनचाच स्वतःवर ताबा न राहिल्याने त्याने कॅथरीनचा हात धरला. त्याचा चेहराही अगदी उतरला होता. मूरीनचे डोळे मधून चमकून जात होते तर मधून निस्तेजही होत होते. आणि पुढे काही बोलू पहाणारे त्याचे ओठही जागच्याजागी नुस्तेच थरथरत होते.

'लहानग्या सुंदर पोरी, दे! तुझा हात माझ्या हातात दे! हो. आता मी तुला तुझं भविष्य सांगणार आहे. कारण तू म्हणालीस तसा मी खरोखरीचाच अंतर्ज्ञानी आहे. भविष्यवेत्ताही आहे मी. मी संपूर्ण आणि निर्भेळ सत्य सांगू शकेन असं तुझं मन जेव्हा तुला सांगतं, तेव्हा नक्कीच ते तुला चुकीच्या मार्गानं नेत नसतं. कॅथरीन, पण एक गोष्ट तू विसरतेयस. एखाद्या स्त्रीला कुणी संपूर्ण सत्य सांगू शकला तरी बुद्धिमत्ता आणि शहाणपण ह्या गोष्टी काही तो तिला देऊ शकत नाही. बुद्धिमत्ता हा खरं तर कुणा तरुण मुलीचा प्रांतच नव्हे. ती सत्य काय ते ऐकून घेऊ शकेल पण त्याचा अर्थ समजू शकणार नाही. तिच्या मनात भले धूर्ततेचा साप दडून बसला असेल. पण तिचं हृदय म्हणजे जणू प्रेमाश्रूंचा झराच असतो. ती आपली वाट नेहमी आपली

आपण शोधून काढते. आणि कोणत्याही आपत्तीतून बिनबोभाट बाहेर पडते. हो. खरंय मी म्हणतोय ते. हुशार स्त्री नेहमीच यशस्वी होते. काहीसं अंतःस्फूर्तीमुळे तर काहीसं सौंदर्याच्या सामर्थ्यावर तिला एखादी गोष्ट सहज साध्य करता येते. नुसत्या कटाक्षानं देखील ती दुसऱ्याचं मन बेहोष करू शकते. सौंदर्य हे नेहमीच सामर्थ्यावर मात करीत असतं. हेही खरंय. एखादं पोलादी हृदयदेखील सौंदर्याने दुभंगून जाऊ शकेल. संकट आणि यातना तुला ठाऊक आहेत म्हणतेस तू कॅथरीन ! खरंखुरं दुःख तक्रार करत असल्याचे कधी कानावर यायचं नाही. अग तरुण पोरी, तुझे दुःख वाळूवरच्या पाऊलखुणांसारखे आहे. पाऊस त्या वाहून नेईल. सूर्य त्या नाहीशा करील. वारा देखील त्या पुसून टाकू शकेल...तुझ्यावर कधी कुणी प्रेम करेल म्हणत्येयस ? पण एक मात्र खरं की तुझ्यावर प्रेम करणाऱ्या पुरुषाची गुलामी तू कधीच सहन करणार नाहीस. उलट तूच त्या पुरुषाचं स्वातंत्र्य हिरावून घेशील आणि त्या गुलामीतून तू त्याला पुन्हा कधीही मुक्त करायची नाहीस. तू बी पेरावंस आणि दुसऱ्याने येऊन पीक कापून न्यावं असंच तुझ्या बाबतीत नेहमी घडत राहील.'

'एवढंच काय तू एखादा प्रियकर मिळवू पहाशील तर तोही तुला कधी शोधून सापडायचा नाही. सूर्यप्रकाशात वावरणाऱ्या नाजूक बालिके, आत्ताचंच बघ ना, आत्ता तूच तर आपला" अश्रू माझ्या पेल्यात सांडू दिलास. आणि तुझ्या ओठांतून पुढचा शब्दही बाहेर पडायच्या आतच त्या एका अश्रूमुळे तुझ्या भवितव्यातले आणखी हजारो अश्रू तू इथे पेरून ठेवलेयस. हो. एके दिवशी त्याच अश्रूंनी तुझे डोळे भरभरून वाहू लागतील. निराशेच्या न संपणाऱ्या रात्री, जेव्हा तू दुःखी होशील, हृदयात जखमेप्रमाणे चरत जाणाऱ्या आठवणीत स्वतःला गुंतवून घेशील तेव्हाच ते अश्रू वाहायला लागतील आणि तेव्हाच तुला आज ह्या पेल्यात तू सांडलेल्या अश्रूची याद येईल. तेव्हा तोच अश्रू तुला अपरिचित वाटेल. विषयुक्तही वाटेल. पाण्याचा तो लहानसा थेंबही तेव्हा शिशाहून जड झालेला असेल. तुझ्या गोऱ्यापान उरोजांच्या आत रक्तात तो जळत राहील. मग रात्रीच्या रात्री, अगदी नव्या दिवसाची तीच ती कंटाळवाणी पहाट होईस्तो, तू जागून काढशील. दिवसेन् दिवस, भरून न येणाऱ्या जखमेच्या वेदनांनी तू अंथरुणात तळमळत

रहाशील.... कॅथरीन, माझ्या कबूतरा! पुन्हा एकदा भर तो पेला. माझ्यासाठी म्हणून भर! ओत त्यात मद्य, माझ्या ह्या साऱ्या भविष्य कथनाचा मोबदला म्हणून! आणि हे निरर्थक बोलणेही आपण आता येथेच संपवूयात!'

मग हुंदक्यासारखा आर्त चित्कार मूरीनच्या तोंडातून बाहेर पडला. त्याने पेला उचलून एकाच घोटांत तो संपवला आणि पेला टेबलावर आदळला. त्याची नजर विलक्षण चमकत होती.

'प्रत्येक जण मन चाहेल तसा जगू देत!' मूरीन म्हणाला. 'उतरून टाक भूतकाळाचं ओझं तुझ्या खांद्यांवरून कॅथरीन, आणि भर पेला परत! आत्म्याचा जरी नाश झाला तरी ह्या म्हाताऱ्याच्या लटलटत्या डोक्यावर काय परिणाम होतोय ह्याची तू मुळीच फिकीर करू नकोस कॅथरीन! फार तर काय ह्या म्हाताऱ्याला आपली अखेरची स्वप्नशून्य नि स्मृती विरहित निद्रा येईल यैवढंच ना! म्हातारा आपलं ऊर्वरीत आयुष्य जगला तरी तो असा पीतच जगणार नाही काय? मग खुशाल मरू देत त्याला! आणि माल देखील ह्या व्यापाऱ्याच्या गोदामात खूप काळ पडूनच आहे नव्हे? मग तो त्याला मोफत देऊन टाकू देत! एक काळ असा होता की ह्या मालाची पुरेपूर किंमत वसूल करण्यासाठी त्याने आपल्या शत्रूंचेच काय पण मित्रांचेही रक्त सांडायला कमी केलं नसतं. अशा वेळी त्याच्या गिऱ्हाईकालाही आपला जीव गमावूनच चालू व्यवहार संपवावा लागला असता... कॅथरीन, भर पेला तो!'

मूरीनने मद्यासाठी हात पुढे केला पण हातच लुळा होऊन पडला. मोठ्या मुश्किलीनेच तो श्वास घेत होता. त्याची मान मरगळली होती. पुन्हा एकदा त्याने भेदकपणे ओर्दिनोफकडे पाहिले. पण मूरीनच्या नजरेतली आग आता विझत आली होती. त्याच्या पापण्या मिटल्या. एक मर्त्य अवकळा त्याच्या देहावर पसरली. परत काही तरी बोलण्यासाठी म्हणून त्याचे ओठ हलले. पापण्यांखाली दाटून आलेले अश्रू आता त्याच्या गालांवरून ओघळू लागले.

ओर्दिनोफला ते दृश्य पाहावेना. तो जागेवरून उठला. धडपडत पुढे होत त्याने कॅथरीनचा हात धरला. तिने नजर वर करून पाहिलेही नव्हते. ओर्दिनोफ तिथे आहे हेही ती विसरली होती. जणू तिचा त्याच्याशी कधी परिचयच

झाला नव्हता ! मुख्यतः तिचे वास्तवाचे भानच हरवले होते. कुठल्यातरी ठाम कल्पनेची ती भक्ष्य झाली होती. बेशुद्ध मूरीनशेजारीच ती गुडघे टेकून बसली. त्याला आपल्या मिठीत घेत एकटक ती मूरीनकडे पहात राहिली. जणू तिचे हातच त्याच्या देहाशी जखडले गेले होते ! ओर्दिनोफनं आपला हात धरलाय हेही कॅथरीन क्षणभर विसरली. पण मग मात्र तिने ओर्दिनोफकडे एक दीर्घ पण भेदक कटाक्ष टाकला. त्यावेळी तिच्या वक्राकार ओठांवर एक कडवट हास्य डोकावत होते.

'जा ! चालता हो इथून !' श्वास रोखून घेत कॅथरीनं म्हणाली. 'प्याला-यस तू ! ह्यापुढे तू आमचा पाहुणा राहिलेला नाहीस ! एक खलनायक झालायस तू !'

पुन्हा एकदा ती म्हाताऱ्या मूरीनकडे वळली. त्याच्या छातीची धडधड ऐकत राहिली. निराशा आणि संतापाने ओर्दिनोफचे अंतःकरण चिरडले गेले.

कॅथरीन ! कॅथरीन !' तिचा हात हलकेच दाबत तो कुजबुजला. तसं ती आकसली. मान वर करून तिने त्याच्याकडे पाहिले. तिच्या नजरेत उपहास, उद्दामपणा, तिरस्कार भरून उरला होता. ओर्दिनोफ तिच्या नजरेला नजर देऊ शकला नाही. मग कॅथरीन मूरीनकडे वळली. आपल्या बालपणीच्या शत्रूच्या नजरेतला तिरस्कार नि द्वेष ओर्दिनोफला आता तिच्याही नजरेत दिसायला लागला होता.

संताप अनावर होऊन तो कॅथरीनला म्हणाला, 'म्हातारा फक्त मारून टाकील तुला !'

अचानक एक दुष्ट विचार ओर्दिनोफच्या मनात चमकून गेला. जणू सैतानच त्याच्या कानात कुजबुजला. आणि त्याच वेळी नेमका तोच विचार कॅथरीनच्या मनातही डोकावून गेला. 'तुला विकत घेणाऱ्याला भले आपले प्राण गमावूनच व्यवहार संपवावा लागला तरीही ह्या व्यापाऱ्याकडून मी तुला विकत घेईनच घेईन ! आणि तशी वेळ आलीच तर मूरीन तुझ्यासाठी थोडंच आपलं रक्त सांडणार आहे ?' असेच काहीसे ओर्दिनोफ तिला सांगणार होता.

एक प्रकारचे स्मितहास्य इतका वेळ कॅथरीनच्या चेहऱ्यावर पसरले होते. त्या हास्यातही एक निश्चय होता. खरे तर हे हास्यच ओर्दिनोफचे मन

घायाळ करीत होते. कसलाही विचार न करता ओर्दिनोफने हात उचलला. आणि खुंटीवरची कट्यार काढली. कॅथरीन आश्चर्यचकित झाली. प्रथमच एक प्रकारची आव्हानाची भावना तिच्या नजरेत उतरली. पण अचानक कुणीतरी जणू ओर्दिनोफचा हात धरला आणि ते मूर्ख कृत्य करायला जणू बळ दिले. ओर्दिनोफने म्यानातून कट्यार काढली. कॅथरीन श्वास रोखून त्याच्याकडे पहात होती. तिची नजर तणावपूर्ण होती.

पुन्हा एकदा ओर्दिनोफने मूरीनकडे पाहिले. म्हाताऱ्याचा एकच डोळा काहीसा किलकिला झाला. त्याने कुत्सितपणे हसतच ओर्दिनोफकडे पाहिले ! हो ओर्दिनोफ हेही अगदी खात्रीपूर्वक हे सांगू शकला असता. मग नजरेला नजर भिडली. आणि ओर्दिनोफ जागच्या जागी खिळून गेला. मग तेच स्मितहास्य ऊतू गेल्यासारखे मूरीनच्या सगळ्याच चेहऱ्यावर पसरले. मग मूरीनचे एक थंड मरणहास्य साऱ्या खोलीभर निनादले. ओर्दिनोफ विलक्षण दचकला. त्याच्या हातातली कट्यार जमिनीवर गळून पडली. त्या आवाजाने कॅथरीन किंचाळली. जणू तीही एका भीषण स्वप्नांतून जागी होत होती.

मूरीनही हळूहळू उठला. कट्यार त्याने खोलीच्या कोपऱ्यात लाथाडून दिली. कॅथरीनने क्षणभर डोळे गच्च मिटून घेतले. तिचे सारं शरीर थरथरत जमिनीवर गुडघे टेकून, ती पुतळ्यासारखी स्तब्ध बसली होती. मग तिने दोन्ही हातांनी आपले डोके गच्च आवळून धरले, आणि ती पुढच्यापुढे कोसळली. हृदयविदारक स्वरांत ती किंचाळत होती ' आल्येशा ! आल्येशा!'

क्षणार्धात मूरीनने तिला आपल्या बळकट बाहूमध्ये उचलून धरले. आणि विश्वासही न बसावा अशा धसमुसळेपणाने तिला छातीशी कवटाळली. कॅथरीननेही आपला चेहरा त्याच्या छातीत दडवला. मग निर्लज्जपणे दात विचकत मूरीन एका विकृत उपहासाने खदखदा हसला. ओर्दिनोफचे सर्वांग शहारून निघाले. मूरीनच्या त्या हास्यांत लबाडी होती. कपट होते. मत्सर होता. इतकच नव्हे तर एक हिशोबी जुलूमही धीटपणे प्रकट होत होता.

' ही स्त्री वेडी आहे !—वेडी ! ' घाईघाईने खोलीबाहेर पडताना ओर्दिनोफ स्वतःशीच पुटपुटला.

: ६ :

दुसऱ्या दिवशी सकाळचे आठ वाजले होते. आदल्या रात्रीच्या घटनांमुळे ओर्दिनोफचं मन अजूनही ताळ्यावर नव्हते. अशाच मनःस्थितीत त्याने आपल्या जुन्या मित्राच्या, यारोस्लाव इल्यीचच्या घरात प्रवेश केला. कोणत्या तरी अज्ञात शक्तीने जणू तरंगत तरंगत त्याला तिकडे नेले होते. पण आपल्या आधीच मूरीन तेथे पोहोचलेला पहाताच ओर्दिनोफ तर क्षणभर दचकलाच. त्याचा जणू दगड बनला. तो दारातच उभा राहिला. ताठपणे उभे रहायची शक्तीदेखील मूरीनच्या अंगात नव्हती. तरीही खुर्चीवर बसायची यारोस्लावची विनंती झिडकारून तोही उभाच होता. ओर्दिनोफ आलेला पहाताच यारोस्लाव आनंदाने ओरडलाच पण त्याचा हा आनंदही फार काळ टिकून राहिला नाही. दुसऱ्या क्षणी यारोस्लाव गोंधळून गेला. पुढे काय करायचे, काय बोलायचे तेच त्याला कळेनासे झाले. खुर्ची आणि टेबलामधल्या मोकळ्या जागेत तो उगाचच घुटमळत राहिला. पण अशा वेळी आपल्या पाहुण्यांना आपण धूम्रपान करीत ताटकळत ठेवणे हेही त्याला अनुचित वाटत होते. पण तो स्वतःच आतून अस्वस्थ झाला होता. आपले सारे बळ एकवटून पाईप ओढीत रहाण्याखेरीज त्याच्यापुढे पर्यायच उरला नव्हता. धूम्रपानांतूनच जणू तो पुढची कृती करण्याची प्रेरणा मिळविणार होता.

आत शिरताच ओर्दिनोफने मूरीनकडे तिरकस कटाक्ष टाकला. आदल्या रात्रीसारखेच दुष्ट हास्य अजूनही त्याच्या चेहऱ्यावर पसरले होते. ते पहाताच ओर्दिनोफ तर क्षणभर चरकलाच. पण पुढच्याच क्षणी ते दुष्ट भाव मूरीनच्या चेहऱ्यावरून नाहीसे झाले. आपल्या पोटभाडेकरूला, ओर्दिनोफला, अभिवादन करताना मात्र मूरीनचा चेहरा नेहमीसारखाच अगम्य नि अनाकलनीय बनला होता.

भेटीतल्या निःशब्दतेमुळेच ओर्दिनोफला भानावर यायला जरा अवसर मिळाला. एकूण परिस्थितीचा अंदाज घेण्यासाठी त्याने यारोस्लावकडे पाहिले तर तो ह्या अनपेक्षित घटनेतून तो अजूनही पुरता सावरला नव्हता.

'यावं. यावं, ओर्दिनोफ नमस्कार.' यारोस्लाव मोठ्यांदा म्हणाला. 'माझ्या प्रिय मित्रा व्हासिली मायखेलोव्हिच, तुझे स्वागत असो. तुझ्या इथल्या उपस्थितीमुळे आमच्याही ज्ञानात जरा भर पडू देत! ह्या खोलीतल्या चार सर्वसामान्य वस्तूंवरही तुझ्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटू देत!' अस्वस्थपणे यारोस्लावने खोलीच्या कोपऱ्याकडे हात केला. मग मात्र त्याचा चेहरा पॉपीच्या फुलांसारखा लालीलाल झाला. एक तर स्वतःच्याच अशा विचित्र वागण्याने तो गोंधळला होता. आणि त्याच्या मनातले शब्दपुष्पच जणू असं अचानक तुडवलं गेल्यामुळे तो स्वतःवरच नाराज झाला होता. खडखड आवाज करीतच त्याने दुसरी खुर्ची पुढे ओढली.

'मी तुला अडचणीत तर टाकत नाहीयेय ना?' ओर्दिनोफ त्याला म्हणाला. 'मला फक्त दोन मिनिटंच तुझ्याशी बोलायचं होतं!'

'हवं तेवढं बोल की!' यारोस्लाव त्यावर मोठ्यांदा उद्गारला.

'आणि काय रे, तू मला कसा काय अडचणीत टाकणारेस बुवा? चहा तर घेशील थोडा. हरकत नाही ना? ए वेटर, वेटर मला वाटतं आपणही आणखी एक कप चहा घ्याल ना?' यारोस्लावने मूरीनकडे पहात विचारले. मूरीननेही त्याची ही विनंती लगेच मान्य केली.

'आणखी तीन कप चहा!' वेटर येताच यारोस्लावने त्याला आवाज चढवून फर्मावले. मग तो स्वतः ओर्दिनोफ शेजारीच बसला. पुढची काही मिनिटे, चिनी मातीच्या कुत्र्यासारखी आपली मान मूरीनकडून ओर्दिनोफकडे. मग ओर्दिनोफकडून मूरीनकडे अस्वस्थपणे हालवीत राहिला. तो नक्कीच एका विचित्र परिस्थितीत सापडला होता. आपण काहीतरी बोलत रहायला हवे हे त्याला जाणवत होते. पण जे काही बोलायचे ते बोलणेच त्याला जड वाटत होते. त्यासाठी योग्य शब्द त्याला सापडत नव्हते. त्याने आणि ओर्दिनोफने एकदमच बोलायला सुरवात केली. आणि आतापर्यंत विलक्षण कुतूहलाने त्यांच्या हालचालींचे निरीक्षण करत बसलेला मूरीन ते पाहून अचानक दांत विचकत खिदीखिदी हसायला लागला.

‘ काही दुर्दैवी घटनांमुळे, मला माझी जागा सोडून जाणं भाग पडतंय !’ ओर्दिनोफ, मूरीनला म्हणाला. ‘ आणि हे आपल्या कानांवर घालण्यासाठी आत्ता मी इथे आलोय. ’

‘ काय विलक्षण योगायोग आहे पहा ! ’ यारोस्लाव मध्येच उद्गारला. ‘ मला आश्चर्य वाटतंय पण आज सकाळीच ह्या गृहस्थांनी तुझा निर्णय मला सांगितला !’

‘ त्यांनी तुला सांगितला ? ’ ओर्दिनोफ मूरीनकडे पहातच आश्चर्याने त्याला म्हणाला. मूरीनने फक्त एकदाच दाढीवरून हात फिरवला. त्याला स्वतःचीच गंमत वाटत होती.

‘ हो. खरंच ’ यारोस्लाव पुढे सांगायला लागला. ‘ माझं बाकीचं सगळं चूक असेल. पण एक गोष्ट मात्र तुला अगदी स्पष्टपणे सांगायलाच हवी ओर्दिनोफ. माझ्या माहितीप्रमाणे ह्या सन्माननीय सद्‌गृहस्थांनी तुझ्याबद्दल अनादराचा शब्दही उच्चारलेला नाही. मी अगदी खात्रीपूर्वक सांगेन तुला हे ! ’

गोंधळलेल्या मनःस्थितीतून प्रयत्नपूर्वक स्वतःला सावरता सावरता, ओर्दिनोफचा चेहरा गोरामोरा झाला. मनसोक्त हसून घेतल्यावर आता आपण आपलं वल्हं टाकायची वेळ आलीय हे मूरीनने ओळखले.

‘ खानदानी सद्‌गृहस्था, यारोस्लाव म्हणतोय ते खरंय.’ सभ्यपणे अभिवादन करत मूरीन म्हणाला. ‘ आम्ही आपणाबद्दल बोलत होतो हेही खरंय. आतापर्यंत गोष्टी जशा चालल्या होत्या तशाच त्या पुढे चालू रहात्या, तर मला नि माझ्या पाल्येला, आनंदच वाटला असता. तुमच्याबद्दल आमच्या तोंडून तक्रारीचा शब्दही उच्चारला गेला नसता, हेही आपण समजून घ्यावं. माझं आयुष्य कसंय ते आपण जाणताच. त्यातला काही भाग आपण आपल्या डोळ्यांनी पाहिलायत. अनुभवलायत. पण आपण माणसं आयुष्यांत ह्या साऱ्या गोष्टींच्या पलीकडे पहातो, आणि ते सुखासमाधानानं जावं म्हणून परमेश्वराची प्रार्थना करत असतो. त्याच्याकडे तसं मागणं मागत असतो, तर साहेब, आता आपणच विचार करून पाहा, की डोळ्यांत अश्रू आणून, गुडघे टेकून मी आपणाकडे याचना करावी काय ? त्याशिवाय दुसरं काय करू शकतो मी ? ’

मूरीन परत दाढी कुरवाळायला लागला. ओर्दिनोफही अगदी अस्वस्थ झाला होता.

' खरंय ते म्हणतात ते. ' यारोस्लाव मध्येच म्हणाला. ' मी देखील तुला हेच सांगणार होतो. एक तर मूरीन महाशयांची तब्येत तशी बरी नसते. ' सेत ल मालअर. माफ कर. पण जाणकार नसलो तरी अधून मधून मी फ्रेंच मध्ये बोलून जातो. म्हणजे मला असं म्हणायचं होतं–'

' हं ?'

' मला म्हणायचं होतं की...तर... ठीक आहे तर...'

ओर्दिनोफ आणि यारोस्लाव दोघेही जागचे न उठताच एकमेकांकडे पाहात समजून काहीसे झुकले. मग आपला हा विचित्रपणा लपविण्यासाठी जणू ते हसायला लागले. मुळात गंभीर असलेला यारोस्लाव सर्वांत आधी त्या हसण्यातून सावरला. ' हे सारं ऐकल्यावर उपस्थित असलेल्या आपल्या ह्या चांगल्या मित्राला, मूरीनना, मी त्या साऱ्याचे तपशील विचारले. तर तर त्यांनी सांगितलं त्यांची ती स्त्री—'

आपल्या मनातला गोंधळ टाळण्यासाठी की काय यारोस्लावने प्रश्नार्थक नजरेनं मूरीनकडे पाहिले.

' हो, माझी पाल्या ' मूरीननं अनुमोदन दिले. मग यारोस्लाव सहजपणे पुढच्या मुद्द्याकडे वळला. म्हणाला,

' हं, आपली पाल्या. तर तेच म्हणायचं होतं मला. तुमची ती प्रौढ पाल्या आजारी असते म्हणूनच, महाशय ' तो ओर्दिनोफकडे वळत म्हणाला, ' मूरीन म्हणतात ते स्वतः आणि ती स्त्री ह्यांच्यामुळेच तुझ्या कामात अडथळा निर्माण होतोय. एक महत्त्वाचा प्रसंग मात्र तू मला सांगितला नाहीस वासिली ! '

' कोणता प्रसंग ? '

' पिस्तुलाचा ! ' हे शेवटचे शब्द मात्र यारोस्लावनं अगदी हळूच–उच्चारले होते. आपल्या स्नेहपूर्ण आवाजाच्या ओघात तो रागाची लहानशी छटाच जणू काही मिसळू इच्छीत होता.

' तरीपण ' तो उत्साहाने पुढे म्हणाला, ' तो सारा प्रसंगच मला आता माहिती झालाय. मूरीननीच अथपासून इतिपर्यंत ती घटना मला सांगितली.

त्यावेळी तू अगदी धीरोदात्तपणे वागलास म्हणे, वासिली मायकेलोव्हीच ! क्षमाशीलता ही किती चांगली गोष्ट आहे नाही ! तुला सांगतो बघ, आज ह्या घटनेबद्दल सांगताना मूरीनसाहेबांच्या डोळ्यांत अश्रू आले होते ! '

यारोस्लावचा चेहरा नव्याने तांबारला. तो अस्वस्थपणे खुर्चीत बसून होता. त्याची नजरही चमकत होती.

' साहेब, ' मूरीन मध्येच म्हणाला 'मी...आम्ही, म्हणजे मी आणि माझी पाल्या तुम्हा दोघांसाठीही परमेश्वराजवळ प्रार्थना करू ! यारोस्लाव एकाग्रतेनं मूरीनकडे पहात होता. मूरीनचा हा भावनावेग त्याला अपरिचित होता.

' माझी पाल्या आजारी आहे. तसंच ती अशिक्षित स्त्री आहे हेही आपण जाणता.' मूरीन ओर्दिनोफला पुढे म्हणाला ' आणि माझंच म्हणाल तर मला दोन पायांवर धड उभंही रहाता येत नाही. '

' मला मान्य आहे हे !' ओर्दिनोफ अस्वस्थपणे म्हणाला. ' माझी आपणाला एकच विनंती आहे, कृपा करून, त्या मुद्द्यावर आता परत बोलू नका. आपली इच्छाच असेल तर त्या दिवशी जे काही घडलं ते सारं प्रकरण अगदी ह्या क्षणापासून आपण विसरून जाऊया. '

' तसं नव्हे. आपणाला ठेवून घेतलं ह्याचं आम्हाला समाधानच वाटतंय.' मूरीन अदबीने वाकून म्हणाला. ' मला ह्याबद्दल नव्हे तर अगदी वेगळ्याच विषयावर खरं तर आपणाशी बोलायचं होतं. कॅथरीन माझ्या नात्यातलीच आहे. अगदी लांबून लांबून ती माझी भाची का काही तरी लागते असं म्हणतात. खरं तर आपणाला हे आधीच ठाऊक असायला हवं होतं. गैरसमज करून घेऊ नका साहेब ! पण आम्ही आपली साधी भोळी माणसं. आपण आज पहाताय ना, अगदी लहानपणापासून ती अगदी तश्शीच आहे म्हणजे डोक्यानं थोडीशी कमी. व्होल्गेवरच्या कोळ्यांनीच तिला वाढवलं. खरं तर ती एका शेतकऱ्याची पोर. एकदा घराला आग लागली आणि त्यात तिचे आई-वडील जळून गेले, तिनं तुम्हाला वेगळंच काही सांगितलं असेल म्हणून तर ही वस्तुस्थिती मी आपल्या कानावर घालतोय. तिच्या मनाला बरं वाटेल ते सांगायला कधी तिला मी आडकाठी करत नाही. काही दिवसांपूर्वीच मॉस्कोच्या डॉक्टर मंडळींनी तिची तपासणी केली.

आणि थोडक्यात सांगायचं तर तिच्या डोक्यात काही तरी कमी आहे असंच त्यांनी सांगितलं. मी तिला आश्रय दिलाय. आम्ही एकत्र राहातो. परमेश्वराची प्रार्थना करतो. आणि त्याच परमोच्च शक्तीवर आमचा सारा भार सोपवितो. कुठल्याही बाबतीत मी स्वतःहून कधीच तिला अडवीत नाही.'

मूरीनचं हे बोलणं ऐकत असताना ओर्दिनोफचा चेहरा हळूहळू बदलत गेला. यारोस्लाव उत्सुकतेने त्या दोघांकडे आळीपाळीने पहात होता.

' पण साहेब, आपणाला हे देखील सांगायचं नव्हतं मला ! ' मूरीन मान डोलवीत म्हणाला, ' ज्या मुलीबद्दल मी तुम्हांला सांगतोय ती म्हणजे एक कायमचं तुफान आहे ! विलक्षण तिखट आहे ती पोर ! तिच्या कुणा एका मित्राची, प्रियकराची आठवण येत असते तिला. खरं तर त्या पायीच डोकं बिघडलंय तिचं. मी काय, चार गोष्टी सांगून तिचं समाधान करायचा प्रयत्न करू शकतो. ह्या पद्धतीनं तिच्यासाठी मी खूप काही केलंय हेही खरंय.' मग मूरीनने बाहीने आपली दाढी पुसली. आणि अदबीने वाकून तो म्हणाला, ' स्पष्ट बोलतोय म्हणून माफ करा. पण आपण खरंच तिला आवडता. आणि साहेब, आपणदेखील तिच्या मोहात पडूनच आमच्याकडे रहायला आलात ह्याबद्दल माझ्या मनात मुळीच शंका नाही ! '

यारोस्लावने काहीशा नाराजीनेच मूरीनकडे पाहिले. असल्या असंबद्ध संभाषणात मुळीच रस नसल्याचेच यारोस्लावच्या नजरेतून स्पष्ट होत होतं. ओर्दिनोफही त्या संभाषणाबद्दल फारसा समाधानी नव्हता.

' पण मला तुम्हाला काही निराळंच सांगायचं होतं ! ' मूरीन पुढं बोलतच गेला ' साहेब, खरं तर मी एक साधासुधा शेतकरी. ती आणि मी – आम्ही दोघंही गरीब माणसं.' इथे तो पुन्हा कमरेत वाकत म्हणाला, ' काही असलं तरी मी नि माझी पाल्या आम्ही दोघंही तुमच्यासाठी परमेश्वराची प्रार्थना करीत राहू तसं सांगायचं तर मला नि तिला असं काय लागणार आहे ? अन्न नि आरोग्य, बस्स एवढंच ना ? आणि अशा परिस्थितीत आम्ही दोघांनी करावं तरी काय ? मी काय स्वतःलाच गळफास लावून घ्यावा ? तुम्हीच विचार करा साहेब ! अगदी साधी बाब आहे ही. तिनं समजा एखादा प्रियकर शोधून काढलाच तर आमची काय अवस्था होईल ? हेही अगदी स्पष्ट शब्दात सांगतोय मी आपणाला. आपण माफ कराल ना मला ?

मी एक शेतकरी, एका सभ्य गृहस्थांशी बोलतोय हेही इथे आपण लक्षात घ्यावं! साहेब, आपण अजून तरुण आहात. जीवनेच्छुक आहात. आपल्या नसानसांतून तारुण्य सळसळतंय. आणि साहेब, तीही एक वयात आलेली अननुभवी पोर आहे. आयुष्यात भरकटत जायला कितीसा वेळ लागणारेय तिला? ती सुंदर आहे. रसरशीतही आहे. सशक्तही आहे. आणि उत्साहीही. उलट मी मात्र फीट्स येणारा एक म्हातारा. तरी देखील साहेब आपण इथून गेल्यावर चार गोष्टी सांगून तिची समजूत कशी काढायची तेही मला चांगलं ठाऊक आहे. दोघं मिळून परमेश्वराची प्रार्थना कशी करायची तेही ठाऊक आहे मला. ती प्रौढतेकडे झुकलेली एक रांगडी शेतकरी स्त्रीच काय ती असू शकते. आपण भले तिच्या प्रेमात पडला असलात तरी त्या शेतकरी स्त्रीची आपणाशी कसलीच बरोबरी होऊ शकत नाही, संबंधही असू शकत नाही. तरीही साहेब, आम्ही आपल्या भल्यासाठी प्रार्थना करीत राहू. निश्चितच प्रार्थना करीत राहू!'

मूरीन पुन्हा एकदा कमरेपर्यंत वाकला. आणि त्याही स्थितीत तो आपली दाढी कुरवाळत होता. वातावरणातला ताण कसा कमी करावा हेच यारोस्लावला कळत नव्हते.

'काय छान गृहस्थ आहेत नाही हे!' जरा धाडस करीतच तो म्हणाला, कदाचित त्या शब्दांतून तो आपली अस्वस्थताही लपवू पहात असावा. 'वासिली, तर ह्या परिस्थितीत तुझा मूरीनबद्दल गैरसमज कसा काय होऊ शकतो, बुवा? ... तू पुन्हा एकदा आजारी पडला होतास म्हणे? मूरीनच म्हणाले मला.खरंय का हे?' ओर्दिनोफला असे काही विचारताना यारोस्लावचे डोळे पाणावले होते. आणि आवाजातूनही काळजी दिसून येत होती.

'मूरीन म्हणतात ते खरंय, यारोस्लाव! मी परत आजारी पडलो होतो.' ओर्दिनोफ उत्तरला. मग मूरीनकडे वळत त्याने विचारले, 'किती पैसे द्यायचेत मी आपल्याला?'

'अरे देवा, साहेब, साहेब हे काय भलतंच बोलताय आपण! प्रत्यक्ष परमेश्वरालाही विकायला निघालेले लोक नाही आम्ही, साहेब! गुन्ह्याची जबाबदारी उगाच का म्हणून स्वतःच्या शिरावर घ्यावीत आपण? असं वागताना आपल्या मनाला काहीच का वाटत नाही? माझ्या आणि मुलीच्या

कोणत्या वागण्याने आपण एवढे दुखावले गेले आहात? सांगा तरी एकदा ?'

'पण आपण काय ह्या विषयावर बोलत नव्हतो. नाही !' मूरीनच्या वागण्यातलं अनौचित्य दाखवून द्यायच्या हेतूनं यारोस्लाव मध्ये पडला. 'माझ्या ह्या मित्रानं आपणाकडून जागा भाड्यानं घेतली होती. त्याबद्दल बोलणं चाललं होतं आपलं !'

'ओर्दिनोफ महाशय,' यारोस्लावकडे दुर्लक्ष करत मूरीन पुढे म्हणाला, 'मी आपणाला पुन्हा एकदा विचारू इच्छितो की कोणत्या गोष्टीत आम्ही आपणाला दुखावलं आहे? सांगा? उलट आपलं रहाणं सुखाचं व्हावं म्हणून किती त्रास घेतला आम्ही ! खरं तर त्या त्रासानंच शिणून गेलोयत आम्ही ! अर्थात आपणाला आमच्याकडून जायचंच असेल तर खुशाल जाऊ शकता आपण ! परमेश्वरच आपली साथ करो ! पण त्यामुळे आम्ही दोघेजण लबाड नि अश्रद्ध कसे काय ठरतो ? तुम्ही निश्चितच आमच्याकडे आणखी राहू शकला असता. आमच्या भाड्यातला लहानसा वाटाही देऊ शकला असतात, आणि आम्ही आमच्या तोंडातून ब्रही काढला नसता ! पण सैतानच तुमच्या मनात शिरला ! मीही आजारी पडलो आणि माझ्या पाल्येची कॅथरीनचीही तीच अवस्था झाली ! मग ह्या स्थितीत करायचं तरी काय ? आपण यापुढे जरी आमच्याकडे राहिलात तरी आपणाकडे लक्ष कोण देणार ? आपली उठबस कोण करणार ? खरं म्हणजे आपण आणखी राहाता तर तेच आम्हाला अधिक आवडलं असतं. मी नि माझी पाल्या आपल्यासाठी नेहमीच परमेश्वराची प्रार्थना करत राहूं !'

मग पुन्हा एकदा आदराने तो कमरेत झुकला.

अतिउत्साहाच्या भरातील त्या बोलण्याने यारोस्लावच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. तो म्हणाला, 'किती उदात्त वृत्ती ही ! रशियन राष्ट्राचे केवढं पवित्र आदरातिथ्य हे !'

ओर्दिनोफने रागाने यारोस्लावकडे पाहिले.

'खरंय साहेब !' यारोस्लावच्या त्या उद्गारांचाच धागा पकडत मूरीन पुढे म्हणाला, 'ज्याला आतिथ्य नाहीं तो रशियनच नाही ! स्वाभाविकच आणखी थोडा काळ तरी आपण आमच्याकडे राहावं अशी माझी आपणाला विनंती आहे.' आपली दाढी शर्टाच्या बाहीत लपवीत मूरीन पुढे

म्हणाला, ‘ तुम्ही थांबायलाच हवं !’ तो ओर्दिनोफ जवळ आला. म्हणाला, ‘ तुम्ही आमच्याकडे रहायलाच हवं. मघापासून आपणाला तेच तर सांगायचं होतं मला. आणखी एकदोन दिवस तरी निदान थांबावं आपण. तसं राहिलात तरी आपणाकडून अधिक भाडंही घेणार नाही आम्ही. पण माझी पाल्या आजारी आहे,हेही आपण लक्षात घ्यायला हवं.ती जर आजारी नसतीच तर मालक म्हणून किती काळजी घेऊ शकलो असतो मी आपली ! मी आपणावर सुखसोयींचा नुसता वर्षाव केला असता. ठीक आहे. पण आता तुम्ही आम्हाला सोडून जाऊ नका. आपणास आमच्याकडे कायम रहाता यावं अशी काहीतरी व्यवस्था करू शकेन म्हणा मी ! अगदी ईश्वराशप्पथ सांगतोय हे. तुम्हाला ठाउकेय, तुम्ही आमच्याकडे कायमचं राहू शकलात ना जर —’

‘ पण अजूनही ओर्दिनोफ आपणाकडे राहू शकेल ना !’ एवढंच मत देऊन यारोस्लाव गप्प बसला.

मघाशी यारोस्लावकडे रागारागानं पहाण्यातही ओर्दिनोफचं खरे तर काहीतरी चुकलेच होते. कारण यारोस्लाव अगदी मनमोकळा आणि सरळवृत्तीचा होता. पण आत्ता मात्र यारोस्लावची मनःस्थिती अगदी अवघडल्यासारखी झाली होती. अगदी पोट धरून हसायची वेडी ऊर्मी त्याच्या मनात दाटून आली होती. तिथे ते दोघेच तेव्हा गप्पागोष्टी करत असते तर यारोस्लाव नक्कीच खदखदा हसत सुटला असता. मग आपल्या जिवलग मित्राचा, ओर्दिनोफचा हात हातात घेत यारोस्लाव त्याला अगदी मनापासनं म्हणाला असता, ‘ मला तुझ्याबद्दल अत्यंत आदर आहे ओर्दिनोफ... मी तुला माफ केलंय. तारुण्यातल्या तुझ्या अविचारी वागण्याबद्दल लोक म्हणतात म्हणून काही मी तुला दोष देणार नाही. पण त्या स्थितीत यारोस्लावला आपल्या अतिसभ्यपणामुळे धड मनासारखे वागता येत नव्हते की तिथून बाहेरही पडता येत नव्हते.

‘यातून पुढे मार्ग कोणता असंही आपण मला विचाराल,’ मूरीननेच पुढे बोलायला सुरुवात केली. पण यारोस्लावच्या प्रश्नाने त्याचा चेहरा मात्र खर्रकन उतरला होता. ‘माझ्या रांगड्या पद्धतीने मला ओर्दिनोफला असे म्हणायचे होते की आपण पुष्कळ पुस्तकं वाचलीयत. खूप ज्ञान मिळवलंयत. आमच्या रशियन शेतकऱ्यांत एक वाक्प्रचार प्रचलित आहे की माणूस

जसजसा ज्ञानी होत जातो तसतसा तो मूर्खही होत जातो !'

'तर आता –' यारोस्लाव अगदी गंभीरपणे काहीतरी म्हणायला लागला.

'तर आता मीच आपली रजा घेतोय. धन्यवाद.' ओर्दिनोफच त्याला पुढे म्हणाला, 'तू घेतलेल्या तसदीबद्दल आभारी आहे मी तुझा. येईन परत कधी तरी, तुला भेटायला.' तो मध्येच निघून जाऊ नये म्हणून यारोस्लावने केलेल्या नम्र पण अयशस्वी प्रयत्नाबद्दल कृतज्ञता म्हणून ओर्दिनोफने हे अखेरचे उद्‌गार काढले होते. 'चलतो तर आता' ओर्दिनोफ मूरीनला म्हणाला.

'बरं तर साहेब अच्छा! आम्हा शेतकऱ्यांना पुन्हा भेटायला विसरूं नका मात्र.' मूरीन त्याला म्हणाला. ओर्दिनोफ अगदी भ्रमिष्टासारखा झाला होता. आणि विलक्षण दमलाही होता. त्याचा श्वासच जणू कोंडला होता. त्याच्या मनातला गारठा त्याच्या छातीवर आतून दडपण आणीत होता. ओर्दिनोफ आतल्या आत गोठून गेला असला तरी निदान त्या क्षणी तो मृत्यूलाही अगदी आनंदाने सामोरा गेला असता. पण अचानक त्याचे पाय भयंकर लटलटायला लागले. इतके की वाटेतल्या एका कठड्याचा आधार घेणे त्याला भाग पडले. त्याच्या भोवती गर्दी गोळा झाली. त्या जमावाकडे, त्याच्या चौकश्यांकडे त्याने मुळीच लक्ष दिले नाही.

त्या गलबल्यातूनच अचानक मूरीनचा आवाज त्याच्या कानावर आला. त्याने मान वर करून पाहिले. तर म्हातारा मूरीन त्याच्या पुढ्यातच उभा होता. त्याचा पारदर्शी चेहरा गंभीर आणि चिंतातूर वाटत होता. यारोस्लावच्या खोलीवर आपली टिंगलटवाळी करणारा हाच तो मूरीन हे ओर्दिनोफला ओळखता देखील येईना. ओर्दिनोफ उठला. मूरीनने हात धरून त्याला गर्दीबाहेर काढले.

'तुम्हाला अजून माझ्या घरून तुमचं सामान न्यायचंय.' ओर्दिनोफकडे हळूच कटाक्ष टाकत मूरीन म्हणाला, 'उगाच जीवाला त्रास करून घेऊ नका साहेब. आपण अद्याप तरुण आहात. पण एखादी गोष्ट मनाला एवढी का लावून घ्यायची?'

ओर्दिनोफ गप्प राहिला.

'आपण दुखावले गेलायत साहेब. रागावलातही. पण का म्हणून ? शेवटी प्रत्येकानं आपापलं भलं पहावं हेच खरं.'

'मी आपल्याला फारसा ओळखत नाही. आणि आपल्या खाजगी गोष्टीत डोकवायचीही मला मुळीच इच्छा नाही !' ओर्दिनोफने प्रत्युत्तर दिले.

'पण ती...ती...'

त्याने हातानेच आपले अश्रू अडवायचा प्रयत्न केला. पण ते डोळ्यांतून ओघळलेच. त्याची नजर, त्याचा एकूण आविर्भाव, पांढऱ्या पडलेल्या ओठांची थरथर पाहता त्याला वेडाचा झटका आल्याचाच कुणाचा समज झाला असता.

'आधीच सांगितलं होतं मी आपणाला.' भिंवया वाकड्या करीत मूरीन म्हणाला, 'ती जवळजवळ वेडीच आहे. का आणि कशामुळे ? तुमचा काही संबंध नाहीयेय त्याच्याशी. कशी का असेना ती, पण मी तिच्यावर प्रेम करतो– अगदी जिवापाड प्रेम करतो. दुसऱ्या कुणालाही देणार नाही मी तिला. समजलं ना आता ?'

ओर्दिनोफची नजर चमकून उठली.

'मी मरून तर गेलो नाही ना असं का वाटावं मला ?' तो मोठ्यांदा म्हणाला 'कशामुळे एवढ्या यातना होतायत माझ्या मनाला ? आणि दैवानं तरी कॅथरीनशी माझी का गाठ घालून द्यावी ?'

'का म्हणून ?' मूरीन स्वतःशीच हसत म्हणाला. मग लगेच गंभीर झाला. , का म्हणून ? मला कसं कळणार ते ? स्त्रीचं हृदय काही समुद्रासारखं खोल असत नाही. एक ना एक दिवस तुम्हालाही समजून येईल ते. एक वेळ तर अशी आली होती, की तुमच्यासाठी मला सोडून द्यायचं देखील तिच्या मनात होतं. पण साहेब, हा म्हातारा तिलाही कधी कळलाच नाही. शक्यता अशी आहे, की सुरुवातीपासूनच तुम्ही तिला खूश ठेवलंत. तिला बदलही हवा असेल. मी तिला उघड उघडपणे विरोध तर केलाच नाही. तिने जरी कबूतराचं दूध मागितलं असतं, तर तेही मी तिला आणून दिलं असतं ! ती स्वाभिमानी आहे स्वातंत्र्याची तिला हौस आहे. पण ते स्वातंत्र्य मिळाल्यावर त्याचं काय करायचं हे मात्र तिला मुळीच कळणार नाही. तर गोष्टी चालल्यायत तशाच ठीक आहेत. साहेब, तुम्ही तर तरुण आहात. आणि वाजवीपेक्षा जास्त

सहृदय आहात. आत्तादेखील आपल्या बाहीने डोळे पुसताना तुम्ही थेट एखाद्या टाकलेल्या स्त्री सारखे वाटताय ! जगाचा अनुभव नाही तुम्हाला. तिच्यासारखं दुबळं मन स्वतःची काळजी घ्यायला देखील असमर्थ असते हे ठाऊक नाही तुम्हाला. ह्या मनाला काहीही द्या ते अखेर आपल्या मालका-कडेच परत येतं. त्याला राजाचं राज्य का द्या ना ? ती व्यक्ती पुन्हा तुमच्या दाराशी हजर होते. तुमच्या सादाला प्रतिसाद देते. असलं दुबळं हृदय स्वतः होऊन कुठलीच कृती करू शकत नाही. त्याला त्याचं स्वातंत्र्य द्या, ते हृदय स्वतःसाठी नवी बंधनं तयार करील. तुम्ही तरुण आहात म्हणून सगळं सांगतोय तुम्हाला. नाहीतर तसा तुमचा माझ्याशी काय संबंध आहे ? तुम्ही काय आज आलात नि उद्या जाणार. तुमच्याशी काय घेणं देणं आहे मला ? तरी असं काही तरी होणार हे सुरुवातीपासूनच ताडलं होतं मी. ज्या स्त्रीबरोबर कायम सुखानं जन्म काढायचा, तिला दुखवू नये हे कळतयं मला. शिवाय तुम्हाला इशारा देणं हे काही माझं काम नव्हतं. पण— ' मूरीनं तत्ववेत्त्याच्या अभिनिवेशात पुढे म्हणाला ' पण काही गोष्टी गृहीत धरता येतातही. खरंतर घडलं त्याहून वेगळं काय घडणार होतं ? संतापाच्या भरात एखादा माणूस कट्यारही उचलू शकतो. अर्थात तुम्हाला स्वानुभवानं हे ठाऊक आहेच ! शिवाय एखादा माणूस आपल्या झोपलेल्या शत्रूवर हल्लाही करू शकतो, त्याचेच दात त्याच्याच घशात घालू शकतो हेही आपण जाणताच ! पण त्याचबरोबर कोणी आपणहून त्याच्या हातात, कट्यार दिली. किंवा शत्रूनं आपणहून आपली मान त्याच्यापुढे केली, तर मात्र तो माणूस त्या कृत्यापासून माघारच घ्यायची शक्यता असते.'

थोड्याच वेळात ते दोघे मूरीनच्या घराच्या आवारात आले. त्यांना पाहाताच तार्तर नोकराने टोपी अदबीनं हातात काढून घेतली. पण ओर्दिनोफकडे पहात तो खुनशीपणे हसला.

' तुझी आई आत्ता आमच्याकडेच आहे ?' मूरीनने त्या तार्तर नोकराला प्रश्न केला.

' हो. '

' मग ह्या गृहस्थांचं सामान बांधायला सांग तिला. त्यांना मदत कर म्हणावं. तूं स्वतःही काही लागलं-सवरलं तर बघ. '

दोघेही जिना चढून वर आले. घरातली म्हातारी मोलकरीणच त्या तार्तर नोकराची आई होती. कोणतीही तक्रार न करता ओर्दिनोफचे सामान आवरायला मूरीनने तिला फर्मावले.

'एक मिनिटात आलोच!' मूरीन ओर्दिनोफला म्हणाला. 'तुम्हाला काही तरी द्यायचंय मला.' आणि तो आपल्या खोलीत गेला. आणि कशिदा काढलेला एक सुंदर पण भारी टेबलक्लॉथ घेऊन आला. पहिल्यांदा ओर्दिनोफ आजारी झाला होता तेव्हा तोच टेबलक्लॉथ कॅथरीनने त्याच्या उशाला दिला होता.

'तिनं तुमच्यासाठी दिलाय हा!' मूरीन म्हणाला. 'आता निमूटपणे आपण इथून निघून जावं हे बरं. आपलं सर्व सामानही बरोबरच न्या! पण एक काळजी मात्र घ्या. ह्या भागात परत कधी फिरकूही नका! अन्यथा त्याचे परिणाम तुम्हालाच भोगावे लागतील!' तो काहीशा मृदू स्वरातच हे सारं म्हणाला. जणू ओर्दिनोफ दुखावला जाण्याची भीतीही त्याला वाटत असावी! निघून जाणाऱ्या ह्या भाडेकरूकडे अखेरचा कटाक्ष टाकताना फक्त अमर्याद तिरस्कारच काय तो त्याच्या नजरेत होता. अत्यंत तिटकाऱ्यानेच त्याने दरवाजा बंद करून घेतला.

नंतर दोन तासांच्या आतच ओर्दिनोफ मिस्टर श्पिस ह्या जर्मनाच्या घरात रहायला आला होता. ओर्दिनोफ आलेला पहाताच त्याची मुलगी टिंचेन उद्गारली,

'किती आनंद होतोय मला परत भेटताना तुला!' मग तिने त्याची विचारपूस केली. त्याची तब्येत बरी नसल्याचे ऐकताच, शक्य ती सारी मदत करायचे आश्वासन तिने त्याला दिले. तर श्पिस महाशय 'खोली भाड्याने देणे आहे' ही पाटी, तो पुन्हा येणार म्हणूनच, अजून न लावल्याचे त्याला सांगत होते. ओर्दिनोफने त्यांच्याकडे भरलेल्या आगाऊ रकमेची मुदत टळून गेल्यावर एक दोन दिवसांनी मात्र श्पिसने ती पाटी नक्कीच पुन्हा दारावर टांगली असती. मग जर्मनांच्या प्रामाणिकपणाची आणि व्यवस्थितपणाचीही श्पिसने त्या निमित्ताने भलावण करून घेतली.

आणि त्याच दिवशी ओर्दिनोफ परत एकदा आजारी पडला. पुढचे तीन महिने मग त्याने अंथरूण धरले. नंतर मात्र हळूहळू त्याची प्रकृती

सुधारली. तो फिरायला म्हणून बाहेर पडायला लागला. श्पिसकडचे त्याचे जीवन सरळ, संथ नि घटनाविरहित होते. हा जर्मन मुळातच सुस्वभावी होता. त्याची मुलगी टिंचेन देखील साऱ्या अपेक्षा पुऱ्या करणारी नि स्वभावाने सालसह होती. पण ओर्दिनोफच्या दृष्टीने जीवनातले सारे स्वारस्य आता संपले होते. तो चिडचिडा झाला होता. त्यातच त्याची मनःस्थिती बिघडली आणि अखेरीस तर त्याला रोगभ्रम जडला. आजारातून उठल्यावरही आपण अद्याप आजारीच आहोत असा त्याला भास व्हायचा. कित्येकदा आठवडेच्या आठवडे तो पुस्तकाला हातही लावीत नसे. आपल्या भविष्याबद्दल तो बेफिकीर रहात असे. उद्याची काळजी न करताच पैसे खर्च करीत असे. कित्येकदा स्वतःचा एकेकाळचा उत्साह, त्याने तेव्हा घेतलेले परिश्रम, त्याची तेव्हाची स्वप्नं त्याला आठवत असत. पण त्या विचारांचे आता कृतीमध्ये रूपान्तर होत नसे. आपल्या विचारांचं शुद्धिकरण होतंय हीचं त्याची भावना होती. आपली स्वतःची निष्क्रियता डिवचण्यासाठीच जणू भूतकाळातली स्वप्नं, विचार मनात जागे होतायत असेच त्याला वाटत होते. शिवाय त्याच्या निष्क्रियतेनंही त्याच्या कल्पनेप्रमाणे आता एक भयंकर रूप धारण केले होते. निराशेच्या अशा क्षणी तो स्वतःची, एखाद्या जादूगाराच्या बेवकूफ सहाय्यकाबरोबर तुलना करीत असे. हा सहाय्यक पाण्याला आपल्या खोलीत येण्याची आज्ञा दिल्यावर स्वतःच त्या पाण्याच्या लोंढ्यात बुडून जातो, कारण पाणी थांबण्याचा जादूतला मंत्रच त्याला ठाऊक नसतो. ओर्दिनोफला कदाचित काही नव्या विचार-कल्पना सुचल्या असत्या किंवा भविष्यकाळात सुचतीलशी आशा वाटली असती, तरी त्याच्या पूर्वीच्या श्रद्धा टिकून राहिल्या असत्या. आणि प्रामाणिक श्रद्धा आयुष्यात नेहमीच दुष्ट शक्तींपासून आपले रक्षण करतात हीच त्याची धारणा होती. पण आता मात्र ओर्दिनोफला आपल्याच ठाम कल्पनांचेच हसू आले. मग एकेकाळी सुंदर वाटणाऱ्या त्या कल्पनांमध्ये रस घ्यायचेच त्याने सोडून दिले.

सहा महिन्यांपूर्वी तो आपल्या कल्पना-विश्वातच काय तो जगत होता. त्यांच्या सहाय्याने त्याचे तरुण मन आशांचे उंच उंच इमले उभारत होते. त्यावेळी चर्चच्या इतिहासावर संशोधन व लिखाण करण्याच्या कामात तो दंग होता. केवढ्या धर्मप्रेमाने, उत्साहाने त्या प्रकल्पाची रूपरेषा आखली

होती त्याने ! पण आता मात्र तो फक्त आपली कच्ची टिपणं पुन्हा वाचीत होता. दुरुस्त करीत होता. आणि त्यामध्ये काही किरकोळ सुधारणाही करत होता. शेवटी त्याने आपला तोही प्रकल्प अर्ध्यावरच सोडून दिला. ओर्दिनोफला त्यात नवीन असे काही सापडलेच नाही. दैववादातल्या गूढ-गोष्टींनी त्याचे अंतःकरण घेरले होते. तो फक्त यातनाच काय त्या सहन करू शकत होता आणि त्या संप व म्हणून परमेश्वराकडे याचनाच काय ती करू शकत होता. एक श्रद्धाळू बाई तिथे नोकर म्हणून कामाला होती. ओर्दिनोफ चर्चमध्ये जाऊन कशी प्रार्थना करतो आणि मग चर्चच्या फरशीवर तासन् तास मेल्यासारखा पडून कसा राहतो याची चविष्ट वर्णने ती इतरांजवळ करीत असे.

कोणत्याही जिवंत प्राणिमात्राला विश्वासात घेऊन ओर्दिनोफने आपले अंतःरण त्याच्याकडे उघड गेले नव्हते. आपल्या कथा-व्यथाही कुणाला सांगितल्या नव्हत्या. पण संध्याकाळी चर्चच्या घंटा वाजायला लागल्या की त्याच्या जुन्या आठवणी जाग्या होत. कॅथरीन शेजारी गुडघे टेकून उभा आहे नि तिच्या हृदयाची स्पंदने ऐकतोय. आपल्या नव्या आशांना अश्रूंनी सचैल स्नान घालतोय, हे त्याला आठवत असे. मग त्याच्या मेलेल्या मनातही भयंकर वादळ उठत असे. त्याच्यातला चैतन्य स्रोत नव्याने उफाळून येत असे. विरहाच्या वेदनांनी तो पुन्हा एकदा पिळवटून निघत असे. केवढ्या यातना होत तेव्हा त्याला ! ह्या यातनांतूनच आपले प्रेम वाढत जातंय असा त्याला भास होत असे. भोवतालचे सारे उदास जग, आणि त्यात उदास असे त्याचे अस्तित्व; सारं काही विसरून तासनूतास तो खुर्चीमध्ये निश्चल बसून राही. कधी तो स्वतःकडे पाहूनच रडत असे. कधी स्वतःशीच कुजबुजत असे, 'कॅथरीन, माझ्या एकुलत्या एक बहिणी !'

ह्या भयंकर मनोयातना एका विचारामुळे विलक्षण धारदार होतं. त्याला चिकटलेला हा विचार दिवसेंदिवस वाढतच गेला. आणि अखेर तो एक 'सत्य' बनला. कॅथरीन वेडी नसावीसं त्याला वाटायचे. तिच्या दुबळ्या मनाला वेडं ठरविण्यामागे मूरीनचा काही सुप्त हेतू असेल. उघड न करता येण्यासारख्या गोष्टीमुळे ती त्या म्हाताऱ्याला धरून आहे. अशी त्याच्या मनाची खात्री पटायची. तिच्या विवेक बुद्धीने कुठलाच गुन्हा केला नसेल, मूरीनच्या दादागिरीला ती निरागसपणे बळी पडली असावी. नाहीतर त्यांचा

एकमेकांशी असा काय संबंध होता ? त्या गरीब पोरीला दडपून टाकणाऱ्या मूरीनच्या जुलमी वृत्तीने त्याच्या मनात संताप उफाळून यायचा. हळूहळू पण अगदी घातकीपणे घडवून आणलेला तिचा हा अधःपात ओर्दिनोफला आपल्या मनःचक्षूपुढे दिसायचा. त्या दुबळ्या हृदयाला यातना दिल्या जात आहेत, बायबल मधले दाखले देऊन तिचे दुबळे मन दिपवले जातंय. तिच्या स्वाभाविक उत्साहाचा गैरफायदा घेतला जातोय. एकेकाळी मुक्तपणे विहार करणाऱ्या तिच्या आत्म्याचे पंख, जीवनाच्या लढाईला एकाकी तोंड देताना दुबळे ठरावेत म्हणून छाटले जात आहेत, हीच ओर्दिनोफची भावना होती.

तरीही तो आणखीनच अलिप्त होत गेला. जर्मन मालकाने, श्पिसने मात्र त्याच्या जीवनक्रमात जराही हस्तक्षेप केला नाही. कधी निर्जन रस्त्यावरून निर्हेतुकपणे ओर्दिनोफ तसान तास भटकत राही. वसंत ऋतुतल्या एका संध्याकाळी, अशाच एका निर्जन जागी त्याची यारोस्लावशी भेट झाली. यारोस्लावची तब्येत चांगलीच खालावली होती. एकेकाळी त्याच्या नजरेत स्नेहाचा ओलावा असे. पण आता त्याच्या एका डोळ्यात निस्तेजता आली होती. चेहऱ्यावर खिन्नताही दाटलेली होती. पूर्वी यारोस्लाव नेहमीच कसल्या ना कसल्या गडबडीत असायचा. आता त्याचे कपडे मळलेले दिसत होते. त्यावर जागजागी चिखलाचे डागही पडले होते. संध्याकाळीच पडलेल्या पावसानं त्याला सर्दी झाली होती. नाक लालबुंद झाले होते आणि वहातही होते. त्याचे केस विस्कटलेले होते. आता यारोस्लावचा कल जुने मित्र टाळण्याकडे झुकला असावा. म्हणूनच की काय ओर्दिनोफचेच आधी त्याच्याकडे लक्ष गेले. ओर्दिनोफला दुसऱ्या कुणाच्याही सहानुभूतीची गरज वाटत नव्हती. तरीही यारोस्लावच्या अशा वागण्याने मात्र तो काहीसा दुखावला गेला. यारोस्लाव पहिल्यासारखाच साधा पण प्रांजळ, अनभिज्ञ पण प्रामाणिक असावासं ओर्दिनोफला वाटत होते. ह्या अनभिज्ञपणासाठीच तर तो यारोस्लाववर प्रेम करीत आला. आणि आता अचानक यारोस्लाव शहाणा झाल्याचं पहाण्यासारखी दुसरी तापदायक गोष्ट कोणती असणार ? पण यारोस्लावचा तो संकोचीपणाही फार वेळ टिकला नाही. त्याला जीवनाबद्दल फारसे प्रेम नसले तरी त्याचा खरा स्वभाव कधीच लपून रहात नसे.

स्वभावाचे वस्त्र माणसे थडग्यातच टाकून देऊ शकतात. पूर्वी इतक्याच हळूवारपणे त्याने आपल्या मित्राच्या मनाची चाचपणी केली. आधी आपण घाईत असल्याचे त्याने दर्शविले. मग मात्र आपण दोघं खूप दिवसात भेटलो नाहीं ह्या पातळीवर तो उतरला. संभाषणाने वेगळंच वळण घेतले. कारण, एकंदरीतला लोकांचा ढोंगीपणा, जगातले कुठलेही सुख मिळवण्यातला पोकळपणा, आणि 'आयुष्य' नावाची व्यर्थता ह्यावरच यारोस्लाव बोलत राहिला. संभाषणाच्या ओघात त्याने नेहमीप्रमाणे पुष्किनचे नावही आणले. पण त्यावेळी त्याच्या बोलण्यात एक प्रकारची अलीप्तता होती. मग 'मित्र' ह्या संकल्पनेची त्याने टिंगल केली. मित्र म्हणून आव आणणाऱ्या, ज्याच्याशी खरी मैत्री कधी अस्तित्वातच असू शकत नाही, त्यांच्या खोटेपणावर त्याने तोंडसुख घेतले. यारोस्लाव खरोखरच 'हुषार' झाला होता तर! ओर्दिनोफने त्याच्याशी कुठल्याच मुद्द्यावर मतभेद दर्शविला नाही, पण तो निरुत्साही मात्र झाला. आपल्या सर्वोत्कृष्ट सहकाऱ्याचे एके काळचे उमदे व्यक्तीमत्व गाडायला आपण कारणीभूत होतोय हीच त्याची भावना होती.

'थांब. जरा विचार करू देत हं!' यारोस्लाव त्याला म्हणाला, जणू प्रयत्नपूर्वक काहींतरी तो आठवू पहात होता. एक महत्त्वाची बातमी तुला सांगायची विसरलो बघ! अगदी खात्रीपूर्वक सांगतो. पूर्वी तू रहायचास ते घर आठवतंय तुला? की नाही आठवत?'

ओर्दिनोफ थरारला. फिका पडला.

'नुकतीच तिथे एक गुन्हेगारांची टोळी सापडली! त्यांची एक चक्क संघटना होती. निश्चितच एक जाळे होते. तस्कर, भामटे, ठग, खुनी सर्व प्रकारची माणसे त्यात होती. त्यातले काही जण हाती लागलेयत. बाकीच्यांचा तपास चालू आहे. त्यांनाही पकडण्याचा सक्त हुकूम आहे. पण सगळ्यात खटकणारी गोष्ट वेगळीच आहे. त्या घराचा मालक आठवतोय तुला? अगदी पापभीरू धार्मिक वृत्तीचा, निरपराध वाटणारा तो म्हातारा?'

'हूं, त्याचं काय मग?'

'तर, तोच त्या टोळीचा म्होरक्या होता म्हणे! अरे हे सगळं सांगितल्यावर तरी माणुसकीची तुझी व्याख्या बदल तू आता!'

हे सांगतानाही यारोस्लाव अत्यंत अस्वस्थ होता. या घटनेवरूनच

आपल्याच लोकांचे, समाजाचे खरेखुरे मूल्यमापन करू शकणार होता तो! आणि त्याच्या जीवनक्रमानुसार असे मूल्यमापन केल्याखेरीज तो पुढेच जाऊ शकणार नव्हता!

'आणि बाकीची टोळी? मूरीन?'

ओर्दिनोफने हळूच त्याला विचारले.

'मूरीन. हो, हो, तो आदरणीय म्हातारा!... माफ कर. पण माझ्या डोक्यात अगदी अचानक नवीनच कल्पना घुसवलीस बघ तू?'

'कल्पना? म्हणजे तोही त्या टोळीपैकीच होता की काय?' ओर्दिनोफने अगदी उतावीळ होत विचारले. क्षणभर त्याच्या हृदयाचे ठोकेच पडणे बंद झाले होते.'

'छे! छे! भलतंच काय बोलतोयस तू!' आपल्या मित्राकडे रोखून पहात यारोस्लाव म्हणाला, पण तोही निश्चितच विचारात पडला होता. 'मूरीन त्यातला असणेच शक्य नाही. तीन आठवड्यांपूर्वीच तो आपल्या बायकोबरोबर त्याच्या गावाकडे निघून गेला आहे. त्या तातर नोकराकडून ऐकलं मी हे. त्याची आठवण तुला नक्कीच असणार!'

मराठीतील दस्तयेवस्की

देव जागा आहे : स. अ. शुक्ल
(क्राईम ॲण्ड पनिशमेंटचा अतिसंक्षिप्त अनुवाद)

इडियट : र. गो. विद्वांस
(इडियटचा अनुवाद)

जुगारी : जयंत दीक्षित
(गॅंबलरचा अनुवाद)

शापित कोझाकीण : अशोक डांगे
(दि लॅण्डलेडीचा अनुवाद)

चिकित्सक लेख : अनिरुद्ध कुलकर्णी
(' नवभारत ' मासिकातून प्रकाशित झालेले लेख)

करमाझफ बंधू : भाऊ धर्माधिकारी
(' ब्रदर्स कारमाझोव 'चा अनुवाद)